# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
# Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai



२५ वा
वार्षिक
अहवाल
२००९-२०१०

25 th
ANNUAL
REPORT
2009-2010




यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारल्यानंतर मनोगत व्यक्त करतांना मा.प्रो.यश पाल. व्यासपीठावर मा.श्री.अजित निंबाळकर,विश्वस्त सौ.यश पाल, राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीच्या अध्यक्षा मा.न्यायमूर्ती (निवृत्त) श्रीमती सुजाता मनोहर, कार्याध्यक्ष मा.अरुण गुजराथी व सरचिटणीस मा.श्री.शरद काळे.




'यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य/कला व क्रीडा पारितोषिक २००९' श्रीमती किशोरी आमोणकर यांना प्रदान करतांना मा.ना.छगन भुजबळ,उपमुख्यमंत्री. सोबत मा.ना.आर.आर.पाटील, गृहमंत्री व मा.न्यायमूर्ती (निवृत्त) श्रीमती सुजाता मनोहर.



'यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य/कला व क्रीडा पारितोषिक २००९' च्या सत्कारमुर्ति श्रीमती किशोरी आमोणकर यांचे स्वागत करतांना मा.ना.छगन भुजबळ,उपमुख्यमंत्री. सोबत मा.खासदार सौ.सुप्रिया सुळे,विश्वस्त.

# २५ वा
# वार्षिक अहवाल
# २००९ - २०१०

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई**

जन. जगन्नाथराव भोसले मार्ग,

मुंबई - ४०० ०२१

दूरध्वनी क्र. २२०२८५९८, २२८५२०८१, २२०४५४६०, २२८५२३४५.

फॅक्स : २२८५२०८१, २२८५२०८२

Email : ybchavan@bom.vsnl.net.in

Visit us : ybchavanpratishthan.org

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## वार्षिक अहवाल २००९-२०१०

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे विश्वस्त मंडळ, कार्यकारिणी मंडळ, कार्यकारी समिती, प्रतिष्ठानचे विभाग प्रमुख, प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्रांचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापन | ३-५ |
| २ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्रातील उपक्रम | ५-९ |
| ३ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या केंद्रात झालेले महत्वाचे कार्यक्रम | ९-९ |
| ४ | यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार व इतर उपक्रम | ९-१० |
| ५ | विशेष कार्यक्रम - उपक्रम | १०-१३ |
| ६ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | १३-१५ |
| ७ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम / उपक्रम | १५-१५ |
| ८ | प्रतिष्ठानमार्फत देण्यात आलेली व मिळालेली अनुदाने | १६-१६ |
| ९ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम / उपक्रम | १६-४२ |
| १० | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची विभागीय केंद्रे | ४२-८४ |
| ११ | प्रतिष्ठानच्या वैधानिक लेखा परीक्षकाचे प्रमाणपत्र | ८५-८५ |
| १२ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची हिशोबपत्रके व संबंधित परिशिष्टे | ८६-९६ |
| १३ | प्रतिष्ठानची प्रकाशने व व्हि.डी.ओ. कॅसेटस् | मागील कवर |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि.नं.एफ.१०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि.नं.एम.एम.एच/वी.ओएम-५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१

**विश्वस्त मंडळ सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. हुसेन दलवाई | उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. अरुण गुजराथी | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. डॉ. रवींद्र बापट | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. मोहन धारिया | |
| ७. | मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ८. | मा. प्रा. पी. बी. पाटील | |
| ९. | मा. श्री. राम प्रधान | |
| १०. | मा. श्री. लक्ष्मण माने | |
| ११. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| १२. | मा. श्री. ज्ञानेश्वर खैरे | |
| १३. | मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे | |
| १४. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| १५. | मा. श्री. अजित निंबाळकर | |

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६. मा. श्री. नितीन करीर,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.

१७. मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग

**कार्यकारिणी मंडळ सदस्य**

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. हुसेन दलवाई
३. मा. श्री. अरुण गुजराथी
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. डॉ. रवींद्र बापट
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धो. महानोर
९. मा. श्री. बापूसाहेब काळदाते
१०. मा. श्री. रा. सु. गवई
११. मा. श्री. एन.के.पी. साळवे
१२. मा. श्री. के. बी. आवाडे
१३. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१४. मा. श्री. श्रीनिवास पाटील
१५. मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे
१६. मा. श्री. वसंतराव पवार
१७. मा. श्री. सा.रे.उर्फ अप्पासाहेब पाटील
१८. मा. श्री. अंकुशराव टोपे
१९. मा. श्री. शामराव पा. पाटील
२०. मा. श्री. यशवंतराव गडाख - पाटील
२१. मा. श्री. माणिकराव पाटील, अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. (पदसिध्द)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२२. मा. श्री. नितीन करीर,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.

## कार्यकारी समिती

१ मा. श्री. शरदराव पवार
२ मा. श्री. हुसेन दलवाई
३ मा. श्री. अरुण गुजराथी
४ मा. श्री. श. गं. काळे
५ मा. डॉ. रवींद्र बापट
६ मा. श्री. श्रीनिवास पाटील
७ मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे
८ मा. श्री. अजित निंबाळकर

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

**प्रतिष्ठानचे विभाग**

| | | |
|---|---|---|
| १. मुख्य कार्यालय | आर्थिक सल्लागार | श्री. एल. आर. खुपराव |
| २. यशवंतराव चव्हाण ग्रंथालय | ग्रंथपाल | श्री. अनिल पाझारे |
| ३. कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |
| ४. महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजिका | श्रीमती ममता कानडे |
| ५. नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| ६. कृषी व सहकार व्यासपीठ | निमंत्रक | श्री. बी. डी. पवार |
| ७. सांस्कृतिक विभाग | निमंत्रक | श्री. विनय नेवाळकर |
| | | श्री. सुनिल वालावलकर |
| ८. यशवंतराव चव्हाण सभागृहे | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| ९. रंगस्वर - सृजन | सृजन प्रमुख | सौ. सुप्रिया सुळे |
| १०. वार्तापत्र | मानद संपादक | श्री. दत्ता बाळसराफ |
| ११. यशवंतराव चव्हाण माहिती व | संचालक | ब्रिगेडीअर श्री. सुशील गुप्तन |
| तंत्रज्ञान प्रबोधिनी | मुख्य विपणन अधिकारी | श्री. विक्रम वासुदेव |
| १२. शिक्षण विकास मंच | प्रमुख संयोजक | श्रीमती कुमुद बन्सल |
| | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| १३. अपंग हक्क विकास मंच | समन्वयक | श्री. विजय कान्हेकर |
| १४. 'वसुंधरा कक्ष' (पर्यावरण संवर्धन अभियान) | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| १५. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | विधी सल्लागार | श्री. एम. बी. पवार |

**प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्रांचे मा. अध्यक्ष :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | विभागीय केंद्र, कराड | अध्यक्ष | श्री. राम प्रधान |
| २) | विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. राम ताकवले |
| ३) | विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| ४) | विभागीय केंद्र, नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| ५) | विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. नंदकिशोर कागलीवाल |
| ६) | विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. जनार्दन वाघमारे |
| ७) | विभागीय केंद्र, कोंकण | अध्यक्ष | श्री. राजाभाऊ लिमये |
| ८) | विभागीय केंद्र, अमरावती | अध्यक्ष | श्री. रा. सु. गवई |

**इतर**

| | | |
|---|---|---|
| १) | मानद वास्तुविशारद | मे. शशी प्रभु अँड असोशिएटस् |
| २) | सांविधिक लेखा परीक्षक | मे. सी.व्ही.के. अँड असोशिएटस् |
| ३) | अंतर्गत हिशेव तपासनीस | मे. वैशंपायन आणि पाध्ये |
| | | चार्टर्ड अकाऊटंट (दि.१.६.२००९ पासून) |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचा सन २००९-२०१० चा वार्षिक अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

## १. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे व्यवस्थापन :

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा व कार्याचा प्रसार करण्यासाठी प्रतिष्ठानतर्फे विविध प्रकारचे उपक्रम प्रतिवर्षी राबविण्यात येतात. उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी नेमलेल्या कार्यकारी समितीच्या १२ बैठका घेण्यात आल्या व विविध विषयांवर सांगोपाग चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या आर्थिक वर्षात विश्वस्त मंडळाच्या व कार्यकारिणी मंडळाच्या प्रत्येकी पुढीलप्रमाणे ३ बैठका झाल्या. दिनांक १२ सप्टेंबर २००९, दिनांक २५ नोव्हेंबर २००९ व दिनांक १२ मार्च २०१०.

तसेच कार्यकारी समितीच्या दिनांक ४ एप्रिल, २००९, २ मे, २००९, ६ जून, २००९, ६ जुलै, २००९, १ ऑगस्ट, २००९, ५ सप्टेंबर, २००९, ३ ऑक्टोबर, २००९, ७ नोव्हेंबर, २००९, ९ डिसेंबर, २००९, २ जानेवारी, २०१०, ६ फेब्रुवारी, २०१० व ६ मार्च, २०१० अशा एकूण १२ बैठका झाल्या.

प्रतिष्ठानच्या हिशेबाची तपासणी प्रत्येक महिन्याला अंतर्गत हिशेब तपासनीस मेसर्स वैशंपायन आणि पाध्ये, चार्टर्ड अकाउटंट यांचेमार्फत करण्यात आली व त्यांचे अहवाल कार्यकारी समितीपुढे ठेवण्यात आले. वार्षिक हिशेबाची तपासणी सांविधिक हिशेब तपासनीस मेसर्स सी.व्ही.के. असोसिएटस्, चार्टर्ड अकाउटंट यांच्याकडून झाली असून त्याचा अहवालही विश्वस्त मंडळ व कार्यकारिणी मंडळासमोर ठेवण्यात आला. वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास आधीन राहून प्रत्येक विभागीय केंद्रासाठी व मुख्य कार्यालयातील विविध विभागांना खर्चाचे अंदाजपत्रक दिले असून त्यांच्याकडून खर्चाचे तिमाही अहवाल मागवून तपासण्यात आले व कार्यकारी समितीपुढे सादर करण्यात येऊन त्रुटींची पूर्तता करुन घेण्यात आली. प्रतिष्ठानची वेबसाईट ybchavanpratishthan.org असून ती वेळोवेळी अद्ययावत करण्यात येत आहे.

**सभासद संख्या :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची निरनिराळया प्रकारच्या सभासदांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | संस्थापक सदस्य | ५९ |
| २. | आजीव सदस्य | २१६ |
| ३. | संस्था सदस्य | २८ |

महाराष्ट्र शासनाने मा. श्री. नितीन करीर, मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव व मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग हे दोन प्रतिनिधी विश्वस्त मंडळावर नेमलेले आहेत. त्यापैकी मा. श्री. नितीन करीर, मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव यांची कार्यकारिणी मंडळावरही नियुक्ती केलेली आहे.

## २. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्रातील उपक्रम :

२.१ - अ) **मुख्य सभागृह :** यशवंतराव चव्हाण केंद्रातील सभागृहाचा वापर, प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांसाठी तसेच निरनिराळया सामाजिक संस्था, शासनातर्फे आयोजित केलेल्या सभा, संमेलने, चर्चा, परिषदा, चित्रपट, सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी करण्यात आला. सभागृहामध्ये मराठी, हिंदी, गुजराती व इंग्रजी नाटके, संगीतसभा आदि कार्यक्रमही झाले.

ब) **सांस्कृतिक व रंगस्वर सभागृह :** सांस्कृतिक सभागृह व रंगस्वर सभागृह आता इमारतीच्या चवथ्या मजल्यावर स्थलांतरित करण्यात आले आहे. या सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. ही दोन्ही सभागृहे सर्व सोयींनी युक्त व अद्ययावत करण्यात आली आहेत.

## २.२ - यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय :

यशवंतराव चव्हाण ग्रंथालय हे 'संदर्भ ग्रंथालय' आहे. ग्रंथालय सर्वसोयी - सुविधांनी अद्ययावत व सुसज्ज करण्यात आलेले असून ग्रंथालयामध्ये विश्वकोश, विश्वचरित्रकोश, गॅझेटीअर, ॲटलास, इयरबुक, धर्मकोश हे संदर्भ ग्रंथ आहेत. तसेच कायदा, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, साहित्य, भूगोल इ. विषयांची पुस्तके आहेत. ग्रंथालयाच्या सभासदांना संदर्भ ग्रंथ, ग्रंथालयात वाचण्यासाठी / संदर्भासाठी देण्यात येतात तर कथा, कादंब-या, चरित्रे, आत्मचरित्रे, ललित साहित्य इ. पुस्तके सभासदांना घरी नेण्याकरीता देण्यात येतात. ग्रंथालयात विविध विषयांवरील एकूण १९८३९ इतकी ग्रंथ संपदा आहे.

अलीकडच्या काळात विज्ञान व तंत्रज्ञानाने जी प्रगती केली आहे त्यामुळे माहितीच्या क्षेत्रात लक्षणीय परिवर्तन झाले आहे. सध्याचे युग हे माहिती - तंत्रज्ञानाचे युग असून या तंत्रज्ञानाचा विकास झपाटयाने होत आहे. ग्रंथालय व माहिती केंद्रे हे माहिती तंत्रज्ञानाच्या जवळचे क्षेत्र असल्याने जास्तीत जास्त प्रगत माहिती - तंत्रज्ञानाचा वापर या क्षेत्रात होत आहे. विज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान युगात ग्रंथालयातून एखाद्या विषयावर विद्यार्थी, विद्वान व संशोधक यांना स्थूल अथवा सूक्ष्म माहिती सेवा ग्रंथालयांना द्यावी लागते. त्यामध्ये ऑटोमेशन आणि ग्रंथालयातील जाळे (नेटवर्क) यांनी ग्रंथालयातील साधन संपत्तीच्या आदान प्रदान करण्याला नवी दिशा दिली आहे. या अनुषंगाने वाचकांना माहिती सेवेकरिता आपल्या ग्रंथालयात विविध ग्रंथालयीन नेटवर्कच्या सुविधां पैकी **डेलनेट** ची (डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्क) सुविधा देण्याचा उपक्रम सुरु केला आहे.

**ग्रंथालयाचे सभासदत्व :**

१) **सर्वसाधारण सभासद :** सभासदत्वाकरीता रुपये २५०/- वार्षिक वर्गणी तसेच रुपये २५०/- अनामत रक्कम भरुन सभासदांना एकावेळी एक पुस्तक देण्यात येते तसेच या सभासदांना ग्रंथालयामध्ये संदर्भ ग्रंथ संदर्भाकरीता दिले जातात.

२) **महाविद्यालयीन व उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी / संशोधक, सभासद :** या सभासदांकरीता सवलत म्हणून नाममात्र वार्षिक वर्गणी रुपये ५०/- व अनामत रक्कम रुपये १००/- घेण्यात येत असून अशा विद्यार्थी / संशोधक सभासद यांना ग्रंथ, संदर्भग्रंथ, नियतकालिके ग्रंथालयामध्ये संदर्भाकरीता देण्यात येतात.

३) **संयुक्त संस्था सभासदत्व :** कार्पोरेट या शब्दाच्या व्याख्येत बसणारी संस्था या सभासदत्वासाठी पात्र आहे. त्यांचेसाठी एकावेळी ५ वर्षांसाठी रुपये ५०,०००/- इतकी वर्गणी आहे. एखाद्या दुर्मिळ व किंमती पुस्तकासाठी प्रतिष्ठान निश्चित करेल तेवढी रक्कम अनामत म्हणून घ्यावी व अशा सभासदांना एकावेळी १० पुस्तके देण्यात यावीत अशी तरतूद आहे.

४) **संस्था सभासद :** या सभासदत्वासाठी "शिक्षण व संशोधन संस्था" व "सांस्कृतिक संस्था" पात्र आहेत. शिक्षण व संशोधन संस्था हया यु.जी.सी., आय.सी.एस.एस.आर., आय.सी.सी.आर किंवा आय.सी.एच.आर. यांच्याकडून मान्यता प्राप्त असाव्यात तसेच सांस्कृतिक संस्था हया महाराष्ट्र शासन, केंद्र शासन किंवा मान्यता प्राप्त अधिघोषित विद्यापीठ यांनी मान्यता दिलेल्या असाव्यात.

संस्था सभासदासाठी प्रवेश फी रुपये १०००/- (ना परतावा), वार्षिक वर्गणी रुपये ५०००/-, दीर्घ कालावधीसाठी एकावेळी ५ वर्षांकरीता वर्गणी रुपये २०,०००/- अशी आहे. अशा संस्था सभासदांना एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देण्याची तरतूद आहे.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र यांच्या नियमाप्रमाणे ग्रंथालयाचे व्यवस्थापन व संगणकीकरण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे वृत्तपत्रात प्रसिध्द होणा-या महत्त्वाच्या घडामोडींची कात्रणे ठेवण्यात आली आहेत. २००९-२०१० मध्ये ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाकडून रुपये ६४,०००/- इतके अनुदान मिळाले आहे.

सन २००९-२०१० वर्षाकरीता प्रतिष्ठानने एकूण रुपये २ लाख इतकी रक्कम मंजूर केली होती व प्रत्यक्ष खर्च रुपये १,९८,५९९/- इतका झाला आहे. या रकमेतून वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, ग्रंथ, संदर्भ ग्रंथ खरेदी करण्यात आले. त्यामध्ये ६४९ ग्रंथ / पुस्तके खरेदीचा समावेश आहे.

दिनांक ३१.३.२०१० रोजी प्रमाणे ग्रंथालयाची सभासद संख्या पुढीलप्रमाणे आहे.

१) २००९-२०१० मध्ये सभासद झालेले महाविद्यालयीन विद्यार्थी/संशोधक/सभासद यांची संख्या ९३ आहे व २००९-२०१० मध्ये सभासद वर्गणी/अनामत रक्कम म्हणून रुपये १२,९७५/- इतकी रक्कम मिळाली आहे.

२) २००९-२०१० सर्वसाधारण सभासद संख्या ८२ आहे व २००९-२०१० या वर्षात सभासद वर्गणी व अनामत रक्कम म्हणून रुपये ३३,५००/- इतकी रक्कम मिळाली आहे.

२००९-२०१० या आर्थिक वर्षात ग्रंथालयासाठी खालील महत्त्वाची पुस्तके/ग्रंथ खरेदी करण्यात आली आहेत. त्यातील काही निवडक पुस्तकांची नांवे खालीलप्रमाणे.

(१) मी नाही कुणाची - सु. पगारिया, (२) माणसायुर्वेद - सु. शं. फणसळकर, (३) अगस्तीचे अंगण - वि. खोले, (४) मुद्रा महाराष्ट्राची - र. अंधारे, (५) आर्यभटीय - मो. आपटे, (६) भूमिपुत्र - मा. कोंडविलकर, (७) मास्तरांची सावली - कृ. ना. सुर्वे, (८) भारत आणि जग - गो. तळवलकर, (९) ओशो : ऐका सांगतो - प्र. ओक, (१०) धाकटया नजरेतून - अ. गोडे, (११) श्रीलंकेची संघर्षगाथा - श. चित्रे, (१२) माझा अल्बम - प्र. महाजन, (१३) शीतयुध्द सदानंद - श्या. मनोहर, (14) Global Jihad – R. Sharma, (15) A New Earth Creates a Better Life – E. Tolle, (16) Bombay then / Mumbai now/Bombay then – J. Masselas, (17) Oracles of Secience – K. Giberson, (18) Essays on India – A. Desai, (19) A Passage to infinity – G.G. Joseph, (20) Mumbai Human Development Report 2009 – Govt. of India, (21) Einstein for everyone – R. L. Piccioni, (22) The Checklist Manifesto – A. Gawande, (23) Secret Teachings of the Vedas – S. Knapp, (24) The Accidental Billionaries - B. Mezrich, (25) The Hindus : Alternatives History – W. Doniger, (26) Post – Hindu India – K. Ilaiah.

२.३ - **अनुबोधपट :** मा. चव्हाणसाहेबांच्या जीवनावर अनुबोधपट तयार करण्याचे काम नामवंत दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांचेकडे सोपविण्यात आलेले असून त्यांनी ग्रंथसामग्री, पत्रव्यवहार, छायाचित्रे, वर्तमानपत्रीय लेखन व मा. यशवंतराव चव्हाण यांच्या सहवासातील महाराष्ट्रातील समकालीन ज्येष्ठ मान्यवरांच्या मुलाखती घेण्याचे काम जवळ जवळ पूर्ण केले असून दिल्ली येथील मान्यवर एकत्रित जमवून मुलाखती पूर्ण करण्याचे काम चालू आहे. सदर अनुबोधपटासाठी महाराष्ट्र शासनाकडून आर्थिक अनुदान रुपये ३ कोटी (अक्षरी रुपये तीन कोटी मात्र) चा धनादेश मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते दिनांक २४ नोव्हेंबर २००९ रोजी सहयाद्री अतिथीगृह येथे देण्यात आला. मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावरील चित्रपटाच्या प्रगतीचा आढावा घेणेसाठी नियुक्त केलेल्या समितीच्या या वर्षात ७ वैठका झाल्या. त्यामध्ये चित्रपटाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. या चित्रपटाची पटकथा श्री. अरुण साधू लिहीत आहेत. हा चित्रपट दिनांक १ मे २०११ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**२.४ - मा. यशवंतराव चव्हाण यांचे चित्ररुप चरित्र प्रकाशन :**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांचे चित्ररुप चरित्र प्रकाशित करण्याचा निर्णय प्रतिष्ठानने घेतलेला आहे. महात्मा गांधी, पं. नेहरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजीव गांधी यांच्या

जीवनावर अशा स्वरुपाचे ग्रंथ प्रसिध्द झालेले आहेत. या चरित्र ग्रंथाची व्याप्ती, मांडणी, छपाई इत्यादी बाबींचा विचार करुन सर्वसाधारणपणे पं. नेहरु यांचे ग्रंथाप्रमाणे आकार व रचना ठेवण्यात येणार आहे. या चरित्र ग्रंथामध्ये अंदाजे २५० पृष्ठे असतील. त्यामध्ये मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनांतील महत्त्वाचे क्षण टिपणारे निवडक फोटो असतील. तसेच काही महत्त्वाचे दस्तऐवज, पत्रे वगैरेची छायाचित्रे ग्रंथात समाविष्ट करण्यात आलेली आहेत. तसेच या पुस्तकात मा. यशवंतरावांच्या जीवनावर व कर्तृत्वावर सविस्तर विवेचक प्रस्तावना समाविष्ट करण्यात येईल. पुस्तकात समाविष्ट करावयाची छायाचित्रे / दस्तऐवज कराड येथील संग्रहातून निवडण्यात आलेले आहेत. हा ग्रंथ छपाईसाठी मौज प्रिंटींग ब्युरो, मुंबई यांच्याकडे दिलेला आहे व या ग्रंथाचे प्रकाशन मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीदिनी दिनांक २५ नोव्हेंबर २०१० रोजी करण्यात येत आहे.

२.५ - **मा. न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड यांच्या नावाने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कृत न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड पारितोषिक' :**

भारताचे भूतपूर्व सरन्यायाधीश मा. न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कृत न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड पारितोषिक' प्रत्येक वर्षी देण्याचे मान्य झाले. त्यानुसार मुंबई विद्यापीठाच्या मार्च २००९ च्या एल.एल.एम.च्या अंतिम परिक्षेत विद्यापीठात पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या श्री. अफरोज शहा, मुंबई यांना महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री मा. श्री. आर. आर. पाटील यांच्या हस्ते परितोषिक देण्यात आले. रुपये १००००/- रोख असे पारितोषिकाचे स्वरुप आहे.

२.६ - **दि. १ मे २०१० मध्ये महाराष्ट्र राज्य स्थापनेला ५० वर्षे पूर्ण होतील व मा. यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी २०१३ मध्ये येत आहे याबाबत कार्यक्रम/उपक्रम आयोजित करण्याबाबत समिती स्थापन.**

दिनांक १ मे २०१० मध्ये महाराष्ट्र राज्य स्थापनेला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. मा. यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी २०१३ मध्ये येत आहे. महाराष्ट्र राज्याचा सुवर्णमहोत्सव व मा. यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी औचित्यपूर्णरीतीने साजरी करण्यासाठी प्रतिष्ठानतर्फे कोणकोणते कार्यक्रम/उपक्रम कार्यान्वित करता येतील ते ठरविणे/आयोजन करणे यासाठी प्रतिष्ठानने खालील सदस्यांची समिती नियुक्त केलेली आहे.

मा. श्री. अरुण गुजराथी, कार्याध्यक्ष

मा. श्री. राम प्रधान, विश्वस्त

मा. श्री. श. गं. काळे. सरचिटणीस

मा. डॉ. रवि बापट, कोषाध्यक्ष

मा. श्री. अजित निंबाळकर, विश्वस्त

मा. डॉ. जब्बार पटेल

२.७ - **मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पोस्टेज स्टॅम्प काढण्याबाबत.**

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विशेष तिकिट जारी करण्याचा प्रस्ताव भारत सरकारच्या पोस्ट खात्याकडे पाठविलेला असून तो प्रस्ताव पोस्ट खात्याने मान्य केलेला आहे. निळया पार्श्वभूमीवर काढलेले स्टॅम्पच्या आकाराचे चित्र मा. चव्हाणसाहेबांच्या देवनागरी लिपीतील स्वाक्षरीसह पोस्ट विभागास पाठविण्यात आले होते. पोस्ट विभागाने ते मान्य करुन मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विशेष टपाल तिकिट दिनांक २५ नोव्हेंबर २०१० रोजी जारी करण्याचे पोस्ट विभागाने कळविले आहे. या विशेष टपाल तिकिटाचे उद्‌घाटन मा. राष्ट्रपती, भारत किंवा मा. पंतप्रधान, भारत सरकार यांच्या हस्ते करण्याबाबतचे प्रयत्न चालू आहेत.

**२.८ - प्रतिष्ठानच्या कर्मचारी व अधिकारी यांचेसाठी स्वतंत्र सेवानियम तयार करण्यासाठी कार्यकारी गटाची नियुक्ती.**

दिनांक २०.९.२००८ रोजी झालेल्या प्रतिष्ठानच्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे कर्मचारी व अधिकारी यांचेसाठी स्वतंत्र सेवा नियम तयार करावे व त्यांना प्रतिष्ठानच्या कार्यकारी समितीने अंतिम स्वरुप द्यावे असा ठराव करण्यात आलेला आहे. त्यानुसार प्रतिष्ठानचे कार्यालयीन आदेश क्र.यचप्र/२६/०८/आस्थापना, दिनांक १८.१२.२००८ अन्वये श्री. एम. बी. पवार, सदस्य सचिव, कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम व विधी सल्लागार यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी गटाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या गटाने वेळोवेळी बैठका घेऊन सेवा नियम तयार करण्याचे काम जवळ जवळ पूर्ण केले आहे.

## ३. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या केंद्रात झालेले महत्वाचे कार्यक्रम :

**३.१ - मा. चव्हाणसाहेबांची पुण्यतिथि व जयंती :**

मा. चव्हाणसाहेबांच्या २५ व्या पुण्यतिथिनिमित्त दिनांक २५ नोव्हेंबर २००९ रोजी यशवंतराव चव्हाण केंद्र इमारतीच्या मुख्य सभागृहात झालेल्या कार्यक्रमास मा. ना. छगन भुजबळ, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. ना. आर. आर. पाटील, गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य उपस्थित होते. या कार्यक्रमात 'यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य - संस्कृती / कला क्रीडा राज्यस्तरीय पारितोषिक २००९' मा. श्रीमती किशोरी आमोणकर यांना प्रदान करण्यात आले. व 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २००९' भारतीय शास्त्रज्ञ व शिक्षण तज्ज्ञ प्रो. यश पाल यांना देण्याचे जाहीर करण्यात आले.

मा. यशवंतराव चव्हाण यांचा ९७ वा जयंती समारंभ दिनांक १२ मार्च २०१० रोजी चव्हाण सेंटरच्या मुख्य सभागृहात संपन्न झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. अरुण गुजराथी, कार्याध्यक्ष हे होते. या कार्यक्रमात 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २००९' भारतीय शास्त्रज्ञ व शिक्षण तज्ज्ञ प्रो. यश पाल यांना प्रदान करण्यात आला. समारंभाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत श्री. दत्ता बाळसराफ यांनी केले. सन्मानपत्राचे वाचन मा. श्री. शरद काळे, सरचिटणीस यांनी केले. तसेच राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीच्या अध्यक्षा मा. न्यायमूर्ती सुजाता मनोहर यांनी पुरस्कारासंबंधी मनोगत व्यक्त केले.

वरील दोन्ही कार्यक्रमांस प्रतिष्ठानचे विश्वस्त व सदस्य तसेच इतर प्रतिष्ठित मान्यवर मोठया प्रमाणावर उपस्थित होते.

## ४. यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार :-

**४.१ - यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक :**

प्रतिष्ठानच्या उद्दिष्टांतील एक भाग म्हणून खालील क्षेत्रात भरीव कार्य करणा-या मान्यवर व्यक्ति वा संस्थेला चक्रीयपध्दतीने पारितोषिक व सन्मानपत्र देण्यात येते.

१) यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना/व्यवस्थापन प्रशासन पारितोषिक
२) यशवंतराव चव्हाण सामाजिक एकात्मता/विज्ञान तंत्रज्ञान पारितोषिक
३) यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास पारितोषिक
४) यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संस्कृती/कला व क्रीडा पारितोषिक

२००९-२०१० यावर्षाचे पारितोषिक 'यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य - संस्कृती / कला, क्रीडा' या क्षेत्रासाठी होते. गेली अनेक वर्षे कला क्षेत्रामध्ये मोलाची कामगिरी केलेल्या श्रीमती किशोरी आमोणकर यांना मा. चव्हाणसाहेबांच्या २५ व्या पुण्यतिथिदिनी दि. २५ नोव्हेंबर २००९ रोजी मा. ना. छगन भुजबळ, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या वर्षापासून पारितोषिकाची रक्कम रुपये १ लाख वरुन रुपये २ लाख करण्यात आलेली आहे. त्यामुळे २ लाख रुपये व सन्मानपत्र असे या पारितोषिकाचे स्वरुप आहे.

### ४.२ - **यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार :**

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय एकात्मता, लोकशाहीमूल्ये, सामाजिक-आर्थिक विकास या क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करणा-या नामवंत व्यक्तीला 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार व सन्मानपत्र' देण्यात येते. सुयोग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी मा. न्यायमूर्ती (निवृत्त) श्रीमती सुजाता मनोहर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे. या समितीमध्ये (१) मा. श्री. चार्ल्स कुरिआ, प्रख्यात आर्किटेक्ट व राष्ट्रीय नागरी आयोगाचे भूतपूर्व अध्यक्ष, (२) मा. डॉ. आरमायटी देसाई, माजी अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, (३) मा. डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी महानिदेशक वैज्ञानिक तथा औद्योगिक अनुसंधान परिषद, (४) मा. डॉ. रुपा शहा, माजी कुलगुरु, एस.एन.डी.टी. विद्यापीठ (५) मा. डॉ. विजय खोले, माजी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, (६) मा. डॉ. नरेंद्र जाधव, सदस्य, योजना आयोग यांचा समावेश आहे.

या निवड समितीच्या शिफारशीनुसार नोव्हेंबर २००९ मध्ये जाहीर करण्यात आलेला यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार भारतीय शास्त्रज्ञ व शिक्षण तज्ज्ञ प्रो. यश पाल यांना मा. चव्हाणसाहेबांच्या ९७ व्या जयंतीदिनी दिनांक १२ मार्च २०१० रोजी मा. श्री. अजित निंबाळकर, विश्वस्त व माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते तसेच प्रतिष्ठानचे विश्वस्त व सभासद यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानपूर्वक देण्यात आला. पुरस्काराची रक्कम या वर्षापासून रुपये २ लाखावरुन रुपये ५ लाख करण्यात आलेली आहे. त्यामुळे रुपये ५ लाख व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्कार वितरण समारंभापूर्वी शालेय विद्यार्थ्यांचा मा. प्रो. यश पाल यांच्यावरोबर मुख्य सभागृहामध्ये प्रश्न - उत्तराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. सदर कार्यक्रमाला शालेय विद्यार्थ्यांचा अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. या कामात मराठी विज्ञान परिषदेचे मोलाचे सहकार्य मिळाले.

## ५. **विशेष कार्यक्रम / उपक्रम :**

### ५.१ - **यशवंतराव चव्हाण युवा फेलोशिप योजना :-**

नवमहाराष्ट्र युवा अभियानामार्फत 'यशवंतराव चव्हाण युवा फेलोशिप योजना' सुरु करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ५० व्या वर्षानिमित्त **'यशवंतराव चव्हाण युवा फेलोशिप योजना'** सुरु करण्याचा निर्णय प्रतिष्ठानने घेतला आहे. त्यासाठी नियमावली तयार करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये रचनात्मक कार्याच्या विविध क्षेत्रात तळमळीने कार्य करणा-या युवकांना आर्थिक पाठबळ व प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना तयार केलेली आहे. एका कार्यकर्त्याला जास्तीत जास्त दोन वर्षे फेलोशिप देण्यात येणार आहे. त्यानुसार पश्चिम महाराष्ट्र, कोंकण, विदर्भ व मराठ्वाडा या भागातील एक एक याप्रमाणे चार कार्यकर्ते या फेलोशिपसाठी निवडण्यात आलेले आहेत. या प्रत्येक कार्यकर्त्यास दरमहा रुपये ७५००/- मानधन देण्यात येणार आहे. तसेच पहिले सहा महिने पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक कार्यकर्त्यास रुपये १०,०००/- ठोक अनुदान, पुस्तके, साहित्य

खरेदीसाठी देण्यात येणार आहेत. त्यानुसार प्रचार/प्रसार माध्यमे वर्तमानपत्रे / दूरदर्शन / आकाशवाणी, विविध सामाजिक स्वयंसेवी संस्था यांचेमार्फत प्रसिध्दी देऊन प्रस्ताव मागविण्यात आले. या प्रस्तावांमधून योग्य उमेदवाराची निवड करण्यासाठी एक समिती गठीत करण्यात आली. या समितीतर्फे एकूण ७ उमेदवारांची मुलाखतीसाठी निवड करण्यात आली. त्यांची मुलाखत श्रीमती सुजाता खांडेकर (कोरो), श्री भीम रासकर (महिला राजसत्ता आंदोलन), श्री. संजीव चांदोरकर (टी.आय.एस.एस.) या अनुभवी व क्रियाशील कार्यकर्त्यांच्या समितीने घेऊन पश्चिम महाराष्ट्रातील श्री. मोहन म्हसकर पाटील, सातारा (विषय - पाणी प्रश्न), कोंकण विभागातून श्रीमती श्रेया भानप, ठाणे (विषय - पर्यावरण) मराठवाडा विभागातून श्री. शिवाजी गावंडे, (विषय - रोजगार हमी योजना), यांची निवड केली आहे. फेलोशिपसाठी निवडलेल्या व्यक्तींना सुरुवातीस दिशादर्शक प्रशिक्षण दिले जाईल. फेलो म्हणून निवडलेल्या कार्यकर्त्यांसाठी तज्ज्ञ व्यक्तीची मार्गदर्शक म्हणून नियुक्ती करण्यात येईल. निवडलेल्या फेलो कार्यकर्त्यांची नांवे मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी दिनांक १२ मार्च २०१० रोजी जाहीर करण्यात आली.

### ५.२ - महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवासाठी सभागृह आरक्षित :-

दिनांक १ मे २०१० ते ७ मे २०१० या कालावधीत केंद्र इमारतीतील सभागृहे महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सव समारोहाच्या कार्यक्रमासाठी राखून ठेवण्यात आले आहे व वरील कालावधीत रंगस्वरतर्फे उच्च दर्जाच्या कलावंताच्या सहकार्याने सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे या कालावधीत विशेष कार्यक्रम आयोजित करण्यासाठी विभागीय केंद्राना प्रत्येकी रुपये ५०,०००/- इतकी रक्कम एक विशेष बाब म्हणून देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्याप्रमाणे प्रतिष्ठानच्या सर्व विभागीय केंद्राना कळविण्यात आले.

### ५.३ - कु. कृष्णा पाटील, पुणे यांचा विशेष सत्कार :-

कु. कृष्णा पाटील, पुणे यांची एव्हरेस्ट व दक्षिण धुव्रावरील सर्वोच्च शिखर सर करण्याची कामगिरी विचारात घेऊन त्यांना विशेष पुरस्कार म्हणून रुपये ५१,०००/- सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देण्यात आले.

### ५.४ - 'महाराष्ट्र स्टेट इज लॉन्च्ड्' या महाराष्ट्र शासनाने सन १९६० मध्ये प्रसिध्द केलेल्या पुस्तकाचे पुनर्मुद्रण :-

'महाराष्ट्र स्टेट इज लॉन्च्ड्' या महाराष्ट्र शासनाने १९६० मध्ये प्रसिध्द केलेल्या पुस्तकाचे पुनर्मुद्रण करणेबाबत प्रतिष्ठानने प्रस्ताव पाठवून या पुस्तकाचे महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात पुनर्मुद्रण करावे याबाबत पाठपुरावा करण्यात आला. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालक यांनी या पुस्तकाचे पुनर्मुद्रण करुन या पुस्तकाच्या अधिक प्रतींची छपाई केली आहे. या पुस्तकाच्या ५०० प्रती प्रतिष्ठानने सदस्यांना देणेसाठी विकत घेतल्या आहेत.

### ५.५ - यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई 'ग्रंथोत्सव' :

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या २५ व्या पुण्यतिथि निमित्त चव्हाण सेंटरमध्ये दिनांक २३ नोव्हेंबर २००९ ते दिनांक २७ नोव्हेंबर २००९ या कालावधीत 'ग्रंथोत्सव' आयोजित करण्यात आला होता. या ग्रंथोत्सवात स्टॉलधारकांकडून कोणतेही शुल्क न घेता स्टॉल उभारण्यात आले. परंतु स्टॉलधारकांना ग्रंथावर आकर्षक सवलत देणे अपेक्षित असल्याचे सांगण्यात आले. याकामी ग्रंथाली वाचक चळवळीने मोलाचे सहकार्य केले.

**५.६ - सौ. वेणूताई चव्हाण यांचे चरित्र 'ही ज्योत अनंताची' लेखक श्री. रामभाऊ जोशी या पुस्तकाची सुधारित आवृत्तीचे प्रकाशनः-**

सौ. वेणूताई चव्हाण यांचे चरित्र 'ही ज्योत अनंताची' लेखक श्री. रामभाऊ जोशी यांनी सन १९८४ मध्ये प्रकाशित केलेल्या पुस्तकाची सुधारित आवृत्ती विभागीय केंद्र, कराड यांनी प्रकाशित केलेली आहे. पुस्तक छपाईचा खर्च रुपये ५०,०००/- प्रतिष्ठानने केलेला आहे. या पुस्तकाच्या १००० प्रती छापण्यात आलेल्या असून पुस्तकाची किंमत रुपये ५०/- ठेवलेली आहे.

**५.७ - मा.श्री.रामभाऊ जोशी यांनी लिहिलेल्या 'यशवंत स्मृतिसुगंध' या ग्रंथाच्या प्रती प्रतिष्ठानच्या सदस्यांना भेट :-**

मा. श्री. रामभाऊ जोशी यांनी लिहिलेल्या व विहंग प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या 'यशवंत स्मृतिसुगंध' या पुस्तकाच्या सवलतीच्या दरात ४०० प्रती विकत घेऊन प्रतिष्ठानच्या संस्थापक सदस्य, आजीव सदस्य व विभागीय केंद्राना भेट म्हणून पाठविण्यात आल्या.

**५.८ - प्रतिष्ठानने प्रकाशित केलेली पुस्तके व ग्रंथालयात अतिरिक्त उपलब्ध असलेली पुस्तके जिल्हा ग्रंथालये व राज्यातील विद्यापीठे यांना भेट :-**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने प्रकाशित केलेली पुस्तके व ग्रंथालयात अतिरिक्त उपलब्ध असलेली पुढील पुस्तके महाराष्ट्रातील जिल्हा ग्रंथालये व विद्यापीठे यांना भेट म्हणून देण्यात आली. (१) बाऊंटीफूल वनियन - डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे चरित्र खंड १ ते ४ (इंग्रजी), (२) सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट, (३) नवभारत : परिवर्तनाची दिशा, (४) महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल, (५) पार्लमेंटरी प्रिव्हिलेजीस, (६) विंडस् ऑफ सहयाद्री, (७) वाय.बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस - विधीमंडळ भाग-२, (८) सहयाद्रीचे वारे, (९) फ्रूट प्रिंटस् ऑफ कल्चर, (१०) गोपाळ गणेश आगरकर, (११) महेश एलकुंचवार परिसंवाद आणि मुलाखत इत्यादी. त्याशिवाय 'जोशी काका' या पुस्तकाच्या प्रती प्रतिष्ठानच्या संस्थापक सदस्य व आजीव सदस्यांना पाठविण्यात आल्या.

**५.९ - मा. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मघर देवराष्ट्रे जिल्हा सांगली :-**

मा. यशवंतराव चव्हाण यांचे देवराष्ट्रे जिल्हा सांगली येथे असलेल्या जन्मघराची पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून दुरुस्ती व देखभाल करण्यावाबत पत्रव्यवहार करुन सध्या जी वास्तु उभी आहे त्यासाठी वापरलेले बांधकाम साहित्य पूर्णतः खराब झालेले आहे, ते बदलून वास्तु जशीच्या तशी मजबूत स्वरुपात उभी करण्याबाबत विनंती करण्यात आली. त्यानुसार पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सदरची वास्तु जशीच्या तशी मजबूत स्वरुपात उभी करण्याचे काम सुरु केले आहे. तसेच इमारतीच्या मागील बाजूस पूर्वी असलेल्या खोलीच्या जोत्याचे अवशेष तुरळक स्वरुपात आढळून आले होते. त्याचा आराखडा तयार करुन त्याआधारे पुन्हा उभारणी करण्यात येत आहे. तसेच बाजूची सीमा भिंत व छोटी बाग यांचेही काम शासनामार्फत करण्यात येत आहे.

**५.१० - सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड यांच्या ग्रंथालयासाठी संगणक व इतर साहित्य भेट :-**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या वतीने सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड यांच्या ग्रंथालयासाठी नवीन दोन संगणक, एक स्कॅनर, विंडो-७ व एम एस ऑफीस ०७ या सॉफ्टवेअरच्या दोन लायसेन्सड् सी.डी. खरेदी करुन भेट म्हणून देण्यात आल्या.

**५.११ - ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा - २००९ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व फेस्कॉम यांच्या संयुक्त विद्यमाने चव्हाण केंद्राच्या मुख्य सभागृहामध्ये दिनांक ४ ऑक्टोबर २००९ रोजी (सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत) कुर्ला ते कर्जत-कसारा व नवी मुंबई या क्षेत्रामध्ये कार्यरत

असलेल्या ९० ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभासदांसाठी एका मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा. श्री. शरद काळे हे होते आणि डॉ. आर. डी. लेले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अंदाजे ३५० ज्येष्ठ नागरिक समारंभाला उपस्थित होते. समारंभामध्ये खाली दर्शविलेल्या दोन महिला व दोन पुरुष ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला.

१. श्रीमती स्मिता मोहंती, ६३ वर्षे, मुलुंड
२. श्रीमती सुमती मोरो राजे, ७६ वर्षे, कुळगांव बदलापूर
३. श्री. कृष्णा गोपाळ बेडेकर, ८१ वर्षे, कुळगांव बदलापूर
४. श्री. मधुकर प्रभाकर मंडलेकर, ७९ वर्षे, ठाणे

## ६. यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी :-

यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी ही सी-डॅक, पुणे यांचे संगणक प्रशिक्षणाचे अधिकृत केंद्र आहे. सी-डॅक हा वैज्ञानिक क्षेत्रातील माहिती व दूरसंचार तसेच माहिती व तंत्रज्ञान केंद्र शासनाचा भाग आहे.

६.१ - माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीकडे आधुनिक तंत्रज्ञानाच्या सुविधांसह उभारण्यात आलेली सध्याच्या तंत्रज्ञानावरील आधारित ही एक प्रयोगशाळा २४ तास कार्यरत आहे. प्रबोधिनीकडे शिकविणारे प्रशिक्षक हे औद्योगिक क्षेत्रातील सर्वोत्तम प्रशिक्षक आहेत. ही एकमेव प्रबोधिनी आहे, जिथे अपंगांसाठी विशेष सुविधा/इन्सेंटिव्ह आणि सूट दिली आहे. ज्यांना आय.टी. क्षेत्रात काम करायची इच्छा आहे अशा निवृत्त सरकारी कर्मचा-यांनाही विशेष फायदे व सुविधा दिल्या जातात.

६.२ - माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने शिक्षण दिले जाते. याशिवाय विद्यार्थ्यांना निष्णांत प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण देण्यात येते. तसेच बाहेरील इन्स्टिटयूटचे फॅकल्टीज् व्हिडीओच्या आधारावर लेक्चर देतात. विद्यार्थी व शिक्षक यांच्यात असाईन्मेंट, संगणकांच्या अभ्यासक्रमावर आधारित चर्चा होते. प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या क्षेत्रातील मोठी व छोटी पुस्तके, आंतरराष्ट्रीय जर्नल्स् तसेच अभ्यासक्रमावरील पाठयपुस्तके व सीडीज् अशी सामग्री ग्रंथालयात उपलब्ध आहे.

६.३. - माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी ही संगणकातील ॲडव्हान्स कोर्सेससाठी लोकप्रिय आहे, ते स्नातकोत्तर (पोस्ट ग्रॅज्युएट) डिप्लोमा इन ॲडव्हान्सड् कॉम्प्युटींग (PG-DAC) आणि स्नातकोत्तर (पोस्ट ग्रॅज्युएट) डिप्लोमा इन ॲडव्हान्सड् कॉम्प्युटर आर्टस् (PG-DACA). प्रबोधिनीने PG-DAC व PG-DACA वर्गात आतापर्यंत १५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना ॲडव्हान्स कॉम्प्युटरचे प्रशिक्षण दिले असून सदर विद्यार्थी दर्जेदार कंपनींच्या सेवेत कार्यरत आहेत. PG-DACA हा कोर्स सध्याच्या बाजारपेठेत प्रभावी अभ्यासक्रम आहे. या कोर्ससाठी तत्सम क्षेत्रातील इतर इन्स्टियटयूटमध्ये रु. १.५ लाख खर्च येतो तर माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीमध्ये हा कोर्स करण्यासाठी रु. ६६,०००/- खर्च येतो. अधिक शिकताना औद्योगिक क्षेत्रात काम करणा-या फॅकल्टींचे मार्गदर्शन मिळते. PG-DAC व PG-DACA हे नोकरीच्या भरतीसाठी अत्यंत महत्वाचे अभ्यासक्रम आहेत. विद्यार्थ्यांच्या मेहनतीमुळे तसेच अभ्यासक्रम महत्वाचा गाभा असल्यामुळे औद्योगिक व तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यातून विद्यार्थ्यांना मागणी आहे.

आधुनिक संगणक क्षेत्रात सतत वाढत असलेल्या गरजेकडे पाहता, माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीतर्फे नॉन-इंजिनिअर पदवीधारकांसाठी विशिष्ट संगणक अभ्यासक्रम चालविण्यात येतो. या संगणक अभ्यासक्रमाला 'सर्टिफिकेट कोर्स इन अॅडव्हान्सड् कॉम्प्युटींग' असे नांव देण्यात आले आहे. त्यातील काही माजी विद्यार्थ्यांनी त्यांना मिळालेल्या संगणक प्रशिक्षणाचा उत्तम फायदा घेऊन स्वतःचा दर्जा उंचावला आहे. त्यातील काही विद्यार्थी आज परियोजना प्रबंधक किंवा संचालक (प्रोजेक्ट मनेजर किंवा डायरेक्टर) म्हणून काम करीत आहेत तर काहींनी स्वतःची कंपनी सुरु केली आहे.

माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकासासंबंधी मोफत प्रशिक्षण देण्यात येते. ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यावहारिक भाषेचे ज्ञान वाढविता येते आणि मुलाखतीला योग्यरित्या सामोरे जाण्याचे धैर्य येते. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे म्हणून प्रबोधिनी काही कंपनीज्मधील CTO's/CEO's यांना बोलाविते. सर्टिफिकेट कोर्स इन प्रोग्रॅमिंग इन 'सी' केलेल्या विद्यार्थ्यांना PG-DAC कोर्ससाठी अॅडमिशन मिळण्यास मदत होते.

विद्यार्थ्यांच्या विनंतीनुसार निरनिराळे इमेज एडिटींग, एमएस डॉट नेट, पॉवरपॉईट, डेटाबेस टेक्नॉलॉजी, अॅडव्हान्सड् एक्सेल यासारखे मॉडयुलर कोर्सेस चालविण्यात येतात. २००९-१० या वर्षात प्रबोधिनीने नेव्हल आर्ममेंटच्या अधिका-यांना प्रशिक्षण देण्यासाठी 'डेटा कॉम्युनिकेशन आणि नेटवर्किंग व डिप्लोमा इन डेटाबेस टेक्नॉलॉजी' हे अभ्यासक्रम वर्ग चालविले.

प्रबोधिनीने नेव्हल डॉकयार्ड, डीजीक्यूए, विक्रोळी क्षेत्रातील अधिका-यांना व कर्मचा-यांना संगणक प्रशिक्षक देण्याचे आयोजन केले. प्रथम - मुंबई शिक्षण उपक्रम या संस्थेने यांच्या कार्यकर्त्यांना संगणक प्रशिक्षक देण्यासाठी सर्टिफिकेट कोर्स इन डेटाबेस टेक्नॉलॉजी आणि व्हिज्यूअल बेसिक या खास वर्गाचे आयोजन केले.
प्रबोधिनी पदवीधारक नसलेल्यांसाठी खालील अर्धवेळ अभ्यासक्रमाच्या वर्गाचे आयोजन करते.

| प्रशिक्षण वर्गाचे नांव | |
|---|---|
| १ | डिप्लोमा इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (DIT) |
| २ | डिप्लोमा इन मल्टिमिडिया क्रिएशन (DMC) |
| ३ | सर्टिफिकेट कोर्स इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (CCIT) |
| ४ | सर्टिफिकेट कोर्स इन मल्टिमिडिया क्रिएशन (CCMC) |
| ५ | सर्टिफिकेट इन डेटाबेस टेक्नॉलॉजीस् आणि व्हिज्युअल बेसीकस् (CCDBT & VB) |
| ६ | सर्टिफिकेट कोर्स इन वेब डिझायनींग (CCWD) |
| ७ | सर्टिफिकेट कोर्स इन पी. सी. असेंब्लींग |
| ८ | सर्टिफिकेट कोर्स इन कॉम्प्युटर ऑपरेशन अॅन्ड पीसी असेंब्लींग |
| ९ | सर्टिफिकेट कोर्स इन कॉम्प्युटर ऑपरेशन्स (CCCO) |
| १० | सर्टिफिकेट कोर्स इन कॉम्प्युटर अवेअरनेस (CAP) |

डोअर स्टेप स्कूल संस्थेच्या देखरेखेखाली विद्यार्थ्यांचे विशेष अधिकार यासाठी विशेष वर्गाचे आयोजन करण्यात आले. प्रबोधिनीने ज्येष्ठ नागरिकांसाठी दि. ३ मे २००९ रोजी एक दिवसाची कार्यशाळा आयोजित केली. मल्टिमिडिया ॲन्ड ॲडव्हान्सड् कॉम्प्युटर आर्टस् याविषयी विनामूल्य कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्यास योग्य प्रतिसाद मिळाला. २०१० मध्ये पहिले तीन महिने उत्पन्नात उत्साहवर्धक परिणाम दिसला. रिक्युटर्स यामध्ये इंटरेस्ट घेताना दिसून आले. नवीन प्रशिक्षण भवितव्यात आश्चर्यकारक आणखी प्रतिसाद देईल असे दिसते.

## ७. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम/उपक्रम :

**७.१ - प्रथम - मुंबई शिक्षण उपक्रम :** मुंबईत शहरात झोपडपट्टीवासियांच्या मुलांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून बालवाडया चालविणे, संगणकांचे प्रशिक्षण देणे, झोपडपट्टीतील स्थानिक रहिवाशांमधून उपक्रमाकरिता शिक्षक - शिक्षिका तयार करणे इत्यादी महत्वपूर्ण कामे प्रथम - मुंबई शिक्षण उपक्रम मार्फत डॉ. माधव चव्हाण व श्रीमती फरिदा लांबे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठया प्रमाणावर केली जातात. संस्थेच्या उपक्रमास प्रतिष्ठानकडून सहकार्य करण्यात येते. या उपक्रमास केंद्र इमारतीमधील चौथ्या मजल्यावर जागा देण्यात आलेली आहे.

**७.२ - युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्सचे संशोधन केंद्र :** युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या भारतीय विभागाचे सहकार्य प्रतिष्ठानच्या उपक्रमांना लाभत असून महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग व सहकार या सामाजिक क्षेत्रांच्या भरीव वृध्दीसाठी ते फार महत्वाचे आहे. युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स इन इंडियाद्वारे निरनिराळया क्षेत्रात प्रकल्प उभारण्यासाठी आर्थिक मदत कशी उपलब्ध करुन घेता येईल, याची माहिती प्रसिध्द केली जाते. या संशोधन केंद्रास तिस-या मजल्यावर जागा देण्यात आलेली आहे.

**७.३ - महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ :** महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ या संस्थेची स्थापना प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी सन १९५७ मध्ये केली. ही संस्था महाराष्ट्राचा आर्थिक व औद्योगिक विकास वेगाने आणि संतुलितपणे होण्यासाठी संशोधनाचे कार्य करते. महाराष्ट्रामध्ये उद्योग सुरु करण्यासाठी इच्छुक असणा-या उद्योजकांना सांख्यिकीय माहिती पुरविणे, योग्य निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयांची माहिती देणे. चिकित्सकपध्दतीने अधिकृत आकडेवारी पुरविणे तसेच महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या उद्योगसंधीविषयी माहिती देण्याचे काम ही संस्था करते. संस्थेतर्फे उद्योजकांसाठी परिसंवाद, परिषदा व कार्यशाळा आयोजित केलेल्या आहेत. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व सदरची संस्था परस्पर सहकार्याने काम करतात. या उपक्रमासाठी महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाला इमारतीतील तिस-या मजल्यावरील जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**७.४ - बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन (बॉम्बे फर्स्ट) :** बॉम्बे फर्स्ट ही संस्था बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रिज आणि बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन या संस्थांच्या पुढाकाराने व औद्योगिक / वाणिज्य क्षेत्रातील अनेक आस्थापनांच्या आर्थिक पाठबळावर १९९५ मध्ये अस्तित्वात आली. या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येचे आव्हान स्वीकारुन येथील पायाभूत सुविधामध्ये विकास करुन नागरिकांच्या राहणीमानाची पातळी उंचावणे, काम करण्याच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे आणि भांडवली गुंतवणूकदारांना आकर्षित करणे हे आहे. मुंबई शहराच्या विविध प्रश्नांवर विचार करण्यासाठी शासन, महानगरपालिका व इतर स्वयंसेवी संस्था यांचे समन्वयक म्हणून ही संस्था कार्य करते. संस्थेचा वाढता व्याप लक्षांत घेऊन प्रतिष्ठानने या संस्थेला केंद्र इमारतीतील तिस-या मजल्यावर जागा दिली आहे.

## ८. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई मार्फत देण्यात आलेले व मिळालेले अनुदान :-

### ८.१ - प्रतिष्ठानकडून दिलेले अनुदान

| अ.क्र. | संस्थेचे / व्यक्तीचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| १ | भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे | १,५०,०००.०० |
| २ | इंडियन इन्स्टियटयूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, मुंबई | १५,०००.०० |
| ३ | सार्वजनिक उत्सव समिती, नवी दिल्ली | ५०,०००.०० |
| ४ | दि वर्ल्ड बायोग्राफिकल रिसर्च सेंटर, गोवा | १,००,०००.०० |

## ९. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम / उपक्रम :-

### ९.१ - कृषी व सहकार व्यासपीठ :-

कृषी सहकार व्यासपीठाचे कार्यास प्रतिष्ठानचे विश्वस्त मा. श्री. बापूसाहेब खैरे व मा. धारिया साहेब यांचे प्रमुख मार्गदर्शन मिळाले. दैनंदिन कामकाजात संयोजक श्री. शं. त्रिं. भिंडे, प्रा. प्र. त्र्यं. पंडित यांचा मोठा सहभाग होता. निमंत्रक डॉ. भागवतराव पवार यांच्या मार्गदर्शनाचा लाभ व्यासपीठाच्या कामकाजास मिळाला. तसेच प्रतिष्ठानचे पुणे केंद्राचे सचिव मा. श्री. अंकुशराव काकडे यांचे स्वाक्षरीने महत्वाचा पत्रव्यवहार करणेत आला.

### १.१ कृषी विभाग :-

१. ॲग्रोवन दैनिकाचे माजी संपादक श्री. निशीकांत भालेराव व सध्याचे कार्यकारी संपादक श्री. आदिनाथ चव्हाण यांची भेट घेऊन व्यासपीठाच्या कामाबाबत प्रतिनिधीनी वेळोवेळी चर्चा केली. त्यांनीही व्यासपीठाचे संयोजक श्री. भिडे यांचे पाणी प्रश्नाबाबत पाठविलेल्या लेखांना शक्य ती प्रसिध्दी दिली.

२. पुणे कृषी कृती (मंच) चर्चागट यांच्याशी विशेष सहकार्याने पूर्वीप्रमाणे वर्षभर कार्यक्रम घेऊन मासिक चर्चा / कृती परिसंवादात व्यासपीठाचे प्रतिनिधीनी सहभाग घेतला. प्रा. पंडित यांनी कार्याध्यक्ष म्हणून चर्चेचे सनियंत्रण व मार्गदर्शन केले.

३. प्रतिवर्षानुसार भारतीय सहकारिता अभ्यास मंडळाचे वार्षिक अधिवेशनाचे निमित्ताने व्यासपीठाच्या प्रतिनिधीनी पुणे येथे अधिवेशनात प्रतिष्ठानचे वतीने उपस्थित राहून चर्चेमध्ये सहभाग घेतला. सदर अधिवेशनात प्रा. पंडित यांनी दिलेल्या विषयावर निबंध सादर केले.

४. पाणी विषयक दर ठरविणेच्या शासकीय प्राधिकरणाच्या निकषांचा श्री. भिडे यांनी अभ्यास केला व त्याबाबत श्री. लेले या ज्येष्ठ तज्ज्ञांबरोबर चर्चा केली. त्यावर श्री. भिडे यांनी लेखही लिहिला व प्राधिकरणास त्याची प्रत श्री. अंकुशराव काकडे यांचे सहीने पाठविली. सदर लेख 'शेतक-यांना पाणी मोजून द्या' या शीर्षकाखाली ॲग्रोवनमध्ये प्रसिध्द झाला आहे.

५. भूमाता कृषीमंच व कृषीव्यासपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बुधाजीराव मुळीक यांचे प्रमुख मार्गदर्शनाने एक कार्यक्रम घेण्यात आला. डॉ. मुळीक यांनी त्यांच्या परिचितांना माहिती अधिकाराबाबत व्यासपीठाचा सल्ला घेणेस सुचविले.

६. महाराष्ट्रातील शेतमजूर समस्या व उपाय या विषयावर निमंत्रक डॉ. पवार यांचे सूचनेवरुन दि. २ जून २००९ रोजी एक चर्चासत्र मा. पद्मविभूषण श्री. मोहन धारिया यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आले. त्यासाठी गोखले अर्थशास्त्र संस्थेतील संशोधक डॉ. जयंत काजळे यांना विनंती केल्याप्रमाणे त्यांनी सद्यःस्थितीबद्दलचा एक उत्तम प्रबंध सादर केला. यामध्ये अतिरिक्त लेबर कमिशनर श्री. पगारे यांनी व भारतीय आयुर्विमा महामंडळाचे विभागीय अधिकारी श्री. देगांवकर यांनी आम आदमी विमा योजनेखाली भूमीहीन गरीबी रेषेखालील व्यक्तींना (शेतमजूर) केंद्र व राज्य शासनामार्फत १०० टक्के विमा हप्ता भरुन विमा संरक्षण मिळते याची माहिती चर्चासत्रात देण्यात आली. त्यावर साधक बाधक चर्चा झाली. मा. धारियांनी मार्गदर्शन केले. डॉ. बी. डी. पवारांनीही मत मांडले. चर्चासत्रात व्यासपीठाच्या प्रतिनिधीनी सहभाग घेतला.

७. श्री. आनंदराव पाटील यांच्याशी व्यासपीठाच्या प्रतिनिधीनी जलसंधारण व चिकोत्रा प्रकल्पाबाबत वेळोवेळी चर्चा केली. समन्यायी पाणी परिषदेच्या सर्व कार्यक्रमांना, कार्यकारिणी सभांना व वार्षिक सर्वसाधारण सभेस प्रा. पंडित यांनी प्रतिष्ठानच्या वतीने सहभाग घेतला.

८. व्यासपीठाच्यावतीने प्रतिवर्षानुसार दि. १० जुलै २००९ रोजी अर्थसंकल्पावर चर्चासत्र आयोजित केले त्यामध्ये फर्ग्युसन कॉलेजचे अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. प्रदीप आपटे यांचे व्याख्यान आयोजित केले, त्यास अनेक मान्यवर तसेच श्री. बापूसाहेब खैरे, श्री. भिडे व प्रा. पंडित उपस्थित राहिले.

९. कृषीविषयक सद्यस्थितीबाबत 'बळीराजा' मासिकाचे कार्यालयात मासिक चर्चा आयोजिण्यात येते. त्यास व्यासपीठाचे प्रतिनिधी उपस्थित राहिले. त्या मासिकातही श्री. भिडे संयोजक, कृषी सहकार व्यासपीठ यांचे लेख प्रसिध्द झाले. त्यातील उत्तम लेखाबद्दलचे 'बळीराजा' मासिकाचे वतीने कै. शंकरराव किर्लोस्कर समाज विकास लेखन द्वितीय पुरस्कार व सन्मानपत्र श्री. शं. त्रिं. भिडे यांना देण्यात आले आहे.

१०. सिटा, नवी दिल्ली यांचे वतीने प्रसिध्द होणारे शरद कृषी मासिकाचे मुख्य संपादक श्री. भागवतराव पवार हे व्यासपीठाचे निमंत्रक असल्याने सदर मासिकाचे काही अंक व्यासपीठाकडे वितरणासाठी दिले जातात. ते या कालावधीत व्यासपीठाचे कार्यक्रमास आलेल्या तज्ज्ञांना वितरीत करण्यात आले. सदर मासिकात मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रदीप पाटील यांच्या सूचनेवरुन प्रा. पंडित यांनी पाठविलेल्या अभिप्रायास अंकात प्रसिध्दी देण्यात आली.

११. डॉ. बाबा आढाव यांचे सूचनेवरुन डॉ. वैद्य यांनी ग्रामीण व नागरी कष्टक-यांच्या संबंधी केलेल्या सर्वेक्षणाचा जो अहवाल व्यासपीठाकडे पाठविला, त्यावरही सभेत चर्चा करण्यात आली.

१२. मराठा चेंबरमध्ये 'कृषी विस्तार विषयक सुधारणा' या विषयावरील केंद्र शासनाच्या नियोजन मंडळाचे सल्लागार डॉ. व्ही. व्ही. सदामते यांचे व्याख्यानास व्यासपीठाचे प्रतिनिधी उपस्थित राहिले. डॉ. सदामते यांनी आपल्या भाषणात केलेल्या विनंतीनुसार श्री. सदामते यांना संयोजक, कृषी सहकार व्यासपीठ यांनी उपयुक्त सूचना पत्राद्वारे पाठविल्या.

१३. किसान क्रेडिट कार्डास व कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या व्हिलेज बँकेच्या योजनेस चालना मिळावी म्हणून प्रयत्न व पत्रव्यवहार चालू ठेवला आहे. दि. २४.७.२००९ रोजी मा. सहकार मंत्र्यांना सदर योजना सादर केली आहे. तसेच नाबार्ड अध्यक्षांनाहि लिहिले आहे. यावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

१४. श्रीमती प्रतिमा इंगोले यांच्या 'आत्मघाताचे दशक' या पुस्तकावर दि. १८.१.२०१० रोजी व्यासपीठाच्या वतीने मा. बापूसाहेब खैरे यांचे सूचनेनुसार महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सहकार्याने एक संयुक्त चर्चासत्र घेतले. त्यावेळी मा. धारिया यांनी अध्यक्षीय भाषण केले. प्रास्ताविक श्री. भिडे यांनी केले. चर्चासत्रामध्ये खालील व्यक्तींनी सहभाग घेतला. १) डॉ. पी. आर. दुभाषी, माजी सचिव केंद्र शासन, २) डॉ. वि. भा. देशपांडे, कार्याध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, ३) श्री. कुमार सप्तर्षी ४) श्री. बापूसाहेब खैरे, ५) श्री. बापूसाहेब पुजारी, ६) श्रीमती डॉ. प्रतिमा इंगोले,

लेखिका ७) डॉ. आप्पासाहेब भुजबळ, माजी डायरेक्टर (साखर), ८) श्री. पी. जी. कोरान्ने, आय.ए.एस., ९) श्री. गोमरकर, सचिव, वनराई, १०) डॉ. रामनाथ चव्हाण, पुणे विद्यापीठ, ११) कवी विठ्ठल वाघ, १२) डॉ. माधवी वैद्य, पदाधिकारी महाराष्ट्र साहित्य परिषद, १३) श्री. प्रदीप बर्वे, कार्यवाह, युक्रांद, पुणे १४) श्रीमती अश्विनी पोतदार, प्रतिनिधी, आयुक्त (कृषी).

१५. पाणी पुरवठयासंबंधी मा. अध्यक्ष, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने आपली भूमिका प्रसिध्द करुन त्यावर मागण्या, हरकती मागवल्या आहेत. यास अनुसरुन त्यांचेकडे संयोजक, कृषी व सहकार यांनी एक निवेदन तयार करुन ते व्यासपीठाचे सचिव श्री. अंकुशराव काकडे यांचे स्वाक्षरीने पाठविले. त्यात या विषयावर व्यासपीठाचे वतीने एक चर्चासत्र प्रतिष्ठानचे विश्वस्त मा. माहेन धारिया यांचे अध्यक्षतेखाली घेऊ इच्छिते असेही नमूद करणेत आले आहे. तसे एक टिपण मा. मोहन धारिया यांना सादर केले.

## १.२ - सहकार विभाग :-

१. सहकार व्यासपीठातर्फे तज्ञांचे अभ्यासमंडळ सर्वसाधारणपणे दरमहा भरविण्यात येते. याचे काम विश्वस्त श्री. ज्ञानेश्वर बापू खैरे यांच्या अध्यक्षतेखाली आतापर्यंत चालत होते. श्री. बी. डी. पवार यांची निमंत्रक म्हणून नियुक्ती झाली असल्याने आता त्यांचे मार्गदर्शनाखाली कामकाज सुरु आहे. या कार्यक्रमाचे आयोजन व्यासपीठाचे संयोजक करतात. चर्चेत प्रा. रथ, डॉ. कोरान्ने, डॉ. कामत, प्रा. नाडकर्णी, डॉ. घाणेकर व इतर तज्ञ मंडळी सहभाग घेतात. काही चर्चासत्रात भारत सरकारचे निवृत्त सचिव डॉ. पद्माकर दुभाषी यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० यामध्ये सहकाराची मूलतत्वे यांचा अंतर्भाव करण्याच्या प्रस्तावाबाबत वेगवेगळया स्तरावर या वर्षात व्यासपीठाने पाठपुरावा चालू ठेवला आहे. त्याबावत महाराष्ट्र शासन व मा. सहकार आयुक्त यांचे कार्यालयाशी संपर्क व पत्रव्यवहार या काळात चालू राहिला.

३. वैद्यनाथन समिति शिफारशीवर महाराष्ट्र शासनाने सहकारी संस्था अधिनियमातील केलेल्या सुधारणांतील उणीवांबावत श्री. भिडे यांनी केलेल्या टिपणीवर मा. श्री. धारिया व मा. श्री. खैरे यांच्या स्वाक्षरीने ते प्रस्ताव अनुक्रमे केंद्र व राज्य शासनास पाठविण्यात आले. या संबंधाने मा. प्रधान सचिव, सहकार यांचेशीही पत्रव्यवहार व पाठपुरावा चालू ठेवला आहे.

४. मध्यंतरी सर्वोच्च न्यायालयाने हाऊसिंग सोसायटया संबंधात जो क्रांतिकारक निर्णय दिला आहे, त्या विषयावर व्यासपीठामार्फत नाम. सहकार मंत्री, मा. सहकार आयुक्त यांच्याशी जो पत्रव्यवहार केला आहे त्याचा पाठपुरावा वेगवेगळया स्तरांवर या कालावधीत चालू ठेवला आहे. त्यानंतर आत्मनिर्भर सह. संस्था कायदा गृहनिर्माण संस्थांना लागू करणेवावतचा जो प्रस्ताव मा. ना. हर्षवर्धन पाटील, मंत्री, सहकार यांना सादर केला होता, त्याबाबत विविध पातळीवर विचारविनिमय चालू ठेवला आहे. सदनिकाधारकांच्या सहकारी संस्थांचे आदर्श उपविधीवर व्यासपीठात चर्चा करुन श्री. शं. त्रिं. भिडे यांनी एक सविस्तर टिपण मा. सहकार आयुक्त कार्यालयास सादर केले आहे.

५. 'सहकार भारती' च्या वतीने पतसंस्थांसाठी या कालावधीत जे अभ्यासवर्ग घेण्यात आले, त्यामध्ये व्यासपीठाच्या प्रतिनिधीनी सहभाग घेतला.

६. सहकार कायद्यामध्ये दुरुस्ती या विषयावर मा. सहकार आयुक्त तसेच जिल्हा बँक असोसिएशन यांचेकडे झालेल्या बैठकीत व्यासपीठाच्या वतीने संयोजकांनी आपली मते मांडली. यासंबंधी शासनाने काही निवडक व्यक्तींची समिति नियुक्त केली आहे. त्यात व्यासपीठाचे संयोजक श्री. भिडे यांचा समावेश आहे. त्यांनी समितीकडे कायदा दुरुस्तीसाठी लिखित टिपण सादर केले. यासाठी घेतलेल्या बैठकीमध्ये व्यासपीठाच्या प्रतिनिधींनी सहकारी तत्त्वांना कायद्याचे मसुद्यात स्पष्टपणे उल्लेख हवा व अशा अनेक मुद्दयांचा आग्रह व्यासपीठाच्या वतीने राज्य शासनाकडे हिरीरीने मा. श्री. मोहन धारिया व मा. श्री. वापूसाहेव खैरे यांच्या स्वाक्षरीखाली कळविण्यात आले असून त्यांचा पाठपुरावा वेळोवेळी करण्यात आला आहे. ही प्रक्रिया आता नव्याने

शासकीय पातळीवर मा. सहकार आयुक्तांचे अध्यक्षतेखाली सुरु झाली आहे. त्यासाठी नेमलेल्या तज्ञ समितीमध्ये व्यासपीठाचे संयोजक, श्री. शं. त्रिं. भिडे यांचा समावेश महाराष्ट्र शासनाने केला आहे.

७. मा. श्री. शिवाजीराव गि. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र शासनाने नेमलेल्या सहकार विषयक उच्चाधिकार समितीचे अहवालाचे प्रारुपावर व्यासपीठाच्या प्रतिनिधीशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तीन चर्चासत्रे या वर्षात आयोजित करण्यात आली. त्यात भारताच्या संविधानात सहकार चळवळी विषयक दुरुस्त्यामध्ये सुसंगत बाबींचा अंतर्भाव करण्यात यावा अशी शिफारस सहकार व्यासपीठातर्फे करण्यात आली आहे. त्यावर केंद्र शासनाकडून राज्याच्या सहकार मंत्र्याचे परिषदेत विचारविनिमय झाला असे कळते. याबाबत पुढील कार्यवाही केंद्र शासनाकडून सुरु असून राज्य शासनाने सहकारी कायद्यात केंद्र शासनाने नेमलेल्या मा. शिवाजीराव पाटील यांचे अध्यक्षते खालील उच्चाधिकार समितीच्या स्वीकारलेल्या शिफारशीनुसार राज्य सहकारी कायद्यात सुधारणा करणेबाबत पाठपुरावा चालू आहे.

८. सहकारी लेखापरिक्षणाचे बाबतीत लेखापरिक्षण पूर्वग्रहविरहितरित्या करावे व भ्रष्टाचारास त्यात वाव नसावा या दृष्टीने त्यासंबंधी पूर्वानुभवावर आधारित एक टिपण व्यासपीठाचे संयोजक श्री. भिडे यांनी तयार केले ते श्री. अंकुश काकडे यांचे स्वाक्षरीने मा. डॉ. गोयल, प्रधान सचिव, सहकार यांना सादर करणेत आले. त्यावर विचार चालू आहे असे कळते. याबाबत रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नर मा. श्रीमती उषा थोरात यांनाही विश्वस्त मा. बापूसाहेब खैरे यांच्या स्वाक्षरीने लिहिले आहे. सदर बाबतीत रिझर्व्ह बँक व नाबार्डकडून झालेल्या पत्रव्यवहारास अनुसरुन पाठपुरावा चालू आहे.

९. केंद्राच्यावतीने लोकसभेत जे भारतीय संविधानात सुधारणा करणारे विधेयक आता आले आहे त्याची माहिती मिळण्यासंबंधी मा. ना. सहकार मंत्री यांना मा. बापूसाहेब खैरे यांचे स्वाक्षरीने तसेच मा. श्री. मोहन धारिया यांच्या स्वाक्षरीने केंद्रीय कृषी मंत्री मा. ना. शरद पवार यांना विनंती करणेत आली. त्यासंबंधी पुढील कार्यवाही चालू आहे. सदर १११ व्या घटना दुरुस्तीचे प्रारुप दि. ११.११.२००९ रोजी संसदेत सादर झाले आहे. ते मा. शिवाजीराव पाटील यांचेकडून प्राप्त झाले त्यावर पुढील कार्यवाही करणेत आली.

१०. सहकारी गृहनिर्माण संस्थां विरुध्द येणा-या तक्रारींबाबत सहकार विभागाच्या सूचनेवरुन व्यासपीठात चर्चा घडवून आणून त्यासंबंधी मा. सहकार आयुक्त कार्यालयाकडे व्यासपीठाच्या प्रतिनिधीनी समक्ष संबंधित अधिका-यांकडे व श्री. भास्करराव शेळके, विशेष आयुक्त, सहकार व अतिरिक्त निबंधक, सहकारी संस्था यांचेशी चर्चा केली.

११. मा. अण्णा हजारे यांनी केलेल्या मागण्यांचे संदर्भात मा. ना. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेवरुन सहकारी पतसंस्थातील अव्यवस्था, नागरी व ग्रामीण बिगर कृषी पतसंस्थांची आर्थिक दुरवस्था कमी करणेसाठी जे प्रारुप सहकार विभागाकडून तयार करण्यात आले होते, त्यावर दि. २५.९.२००९ रोजी एक चर्चासत्र व्यासपीठाच्या वतीने घेणेत आले. मा. बापूसाहेब खैरे अध्यक्षस्थानी होते. झालेल्या चर्चेनुसार त्याबाबत दुरुस्त्या सुचविणारे टिपण श्री. भिडे यांनी तयार केले ते मा. सहकार आयुक्तांना सादर केले.

१२. भारतीय संविधानाच्या १११ व्या सुधारणा विधेयकावर व्यासपीठाच्या अभ्यासमंडळात तीन चर्चासत्रे घेतली तसेच मा. सहकार आयुक्त व विशेष आयुक्त (सहकार) आणि संबंधित अधिका-यांशी व्यासपीठाच्या संयोजकांनी चर्चा केली व पत्रव्यवहारही केला. तसेच सहकारी विकास न्यास (सी.डी.एफ) हैद्राबाद, सेक्रेटरी, नॅशनल कौन्सिल फॉर को-ऑपरेटीव्ह ट्रेनिंग, नवी दिल्ली यांचेशीही पत्रव्यवहार केला. नाबार्ड, अध्यक्ष व शासनाचे प्रधान सचिव (सहकार) आणि सदर बाबतीत केंद्र नियुक्त उच्चाधिकार समितीचे अध्यक्ष मा. शिवाजीराव गिरीधर पाटील यांचेशीही पत्रव्यवहार केला आहे. सदर चर्चासत्राचे अध्यक्षपदी मा. पद्मविभूषण श्री. मोहन धारिया होते. त्यांचे स्वाक्षरीने मा. ना. केंद्रीय सहकार मंत्री श्री. शरदराव पवार यांचेकडेही टिपण सादर केले आहे.

१३. 'सहकार विषयक संविधानात बदल' याविषयी एक विशेष अभ्यासगट मा. श्री. मोहन धारिया यांच्या सूचनेवरुन स्थापित केला आहे. त्याच्या ४ बैठका या कालावधीत घेण्यात आल्या. त्यास राज्य सहकारी बँकेचे सहकार्य मिळाले आहे. एक बैठक दि.

३१.१.२०१० रोजी सिटा कार्यालयात व २ बैठका दि. १.२.१० व ८.२.१० रोजी राज्य बँकेच्या प्रादेशिक कार्यालयात झाल्या. मा. श्री. बापूसाहेब पुजारी, अध्यक्षस्थानी होते. चौथ्या सभेचे अध्यक्षस्थानी राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष होते. त्यांनी प्रश्नावलीबाबत जिल्हा बँकांच्या सहकार्याने बैठका घेता येतील असे सांगितले. सदर बैठकात सर्वश्री डॉ. भागवत पवार, ॲड. म. अ. देशमुख, शं. त्रिं. भिडे व प्रा. प्रभाकर पंडित आदींनी सहभाग घेतला. सभेत प्रश्नावलीस व्यापक प्रसिध्दी देणेचे ठरले आहे.

१४. दि. ११ व १२ फेब्रुवारी २०१० रोजी कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठात 'सहकाराचे पुनरुजीवन' या विषयावर एक राष्ट्रीय चर्चासत्र घेण्यात आले. त्यांच्या निमंत्रणावरुन श्री. शं. त्रिं. भिडे उपस्थित राहिले. त्यात त्यांनी 'भारतीय घटना दुरुस्ती व सहकारी चळवळ' यावर व्याख्यान दिले. चर्चासत्राचे उद्घाटन मा. श्री. शिवाजीराव पाटील यांचे हस्ते झाले. श्री. भिडे यांनी केलेले टिपण मा. बापूसाहेब खैरे यांचे स्वाक्षरीने मा. श्री. अमीन अध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ यांचेकडेही योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविले आहे. नियोजित १११ वी घटना दुरुस्ती आणि केंद्र शासनाच्या उच्चाधिकार समिती (सहकार) यांच्या शिफारशी याबाबतीत श्री. भिडे यांनी मा. शिवाजीराव पाटील यांचेशी, शिवाजी विद्यापीठात चर्चा केली आहे व ज्या शिफारशींचा अंतर्भाव अपेक्षेप्रमाणे घटना दुरुस्तीत नाही त्याबाबत उदा. 'सहकारी तत्त्वे व मूल्ये' याबावत पाठपुरावा करण्याबाबत प्रयत्न चालू आहेत.

१५. 'सहकारी विभागाची पुनर्रचना' हा विषय नव्याने ऐरणीवर आला आहे. त्यासंबंधी शासन निर्णय दि. १०.२.२०१० रोजी झाला असून त्यानुसार मा. सहकार आयुक्तांचे नेतृत्वाखाली समिती नियुक्त केली आहे. त्यावर व्यासपीठाने दि. २५ मार्च २०१० रोजी चर्चासत्र घेतले. त्यास समितीचे सचिव, उपनिबंधक, सहकार विभाग उपस्थित होते. यावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

## १६. अनुषंगिक महत्वाच्या विषयासंबंधी कामकाज :

१६.१ व्यासपीठास महत्वाच्या वाटणा-या अनुषंगिक विषयांवरही कामकाज करण्यात येते. विधानसभा निवडणुकीपूर्वी निवडणूक सुधारणांसंबंधी पूर्वी प्रतिष्ठानने घेतलेल्या लोकसभा निवडणुकीचे वेळच्या चर्चासत्रांवर आधारित टिपण राज्याच्या मा. निवडणूक आयुक्तांकडे मा. बापूसाहेब खैरे यांच्या स्वाक्षरीने पाठविणेत आले. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने कळविल्याप्रमाणे अखिल भारतीय राजकीय प्रक्षप्रमुखांना व केंद्रीय निवडणूक आयुक्तांना लिहिले.

१६.२ 'राजकारणात नैतिक मूल्ये व कार्यपध्दतीची पुर्नसंस्थापना' या विषयावर व्यासपीठातील सहकार तज्ञ प्रा. नाडकर्णी यांनी तयार केलेल्या टिपणीवर दि. १० नोव्हेंबर ०९ रोजी एक चर्चासत्र घेणेत आले.

## १.३ - माहितीचा अधिकार :-

३.१ माहितीचा अधिकार अधिनियम मंजूर झाल्यानंतर त्याचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने डॉ. जोशी, मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र शासन यांचेशी झालेल्या चर्चेचे अनुषंगाने व्यासपीठाच्या वतीने श्री. भिडे यांनी माहितीचा अधिकार कायदा यावर पुस्तिका 'यशदा' व मा. निवृत्त इन्स्पेक्टर, जनरल ऑफ पोलीस श्री. मुश्रीफ यांचे मार्गदर्शन घेऊन लिहिली. सदर पुस्तिका

मा. श्री. बापूसाहेब खैरे यांनी 'विशाल सहयाद्री' ट्रस्टचे वतीने प्रसिध्द केली असून तिचे वेळोवेळी व्यासपीठाच्या वतीने या विषयावर घेण्यात येणा-या कार्यक्रमामध्ये वितरण केले जाते.

३.२ यशवंतराव चव्हाण अॅकेडमी ऑफ डेव्हलपमेंट अॅडमिनिस्ट्रेशनचे (यशदाचे) सूचनेवरुन श्री. शं. त्रिं. भिडे, संयोजक, कृषी सहकार व्यासपीठ यांनी एक ९० पानी पुस्तक 'माहितीचा अधिकार व सहकारी संस्था' या विषयावर तयार करुन सादर केले आहे. त्या पुस्तकाचे प्रारुप सहकार खात्याचे प्रधान सचिव डॉ. सुधीरकुमार गोयल यांचेकडे मान्यतेसाठी सादर केले होते. त्यावर शासनाचा अनुकूल प्रतिसाद आला होता. या विषयावर अकोला नागरी सहकारी बँकेबाबतच्या अपिलामध्ये मुंबई उच्च न्यायालयाचा जो निकाल आला त्यानुसार दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत यशदाकडे देण्यात आली आहे. त्यावर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे. यासंबंधी मा. प्रधान सचिव, सहकार यांना पुन्हा दि. २९.९.०९ रोजी लिहिले आहे.

३.३ प्रतिष्ठानच्या माहिती कक्षामध्ये वेळोवेळी भेट देऊन मार्गदर्शनासाठी आलेल्या व्यक्तींना मार्गदर्शन केले जाते व पुस्तिकेचे वितरण केले जाते.

३.४ माहिती अधिकाराबाबत मा. माहिती आयुक्त यांनी दिलेल्या निकालांची माहिती देणेसाठी व अधिनियमातील तरतुदी संबंधी एक चर्चासत्र दि. ९ ऑक्टोबर २००९ रोजी घेण्यात आले, त्यात श्री. विवेक वेलणकर, श्री. गिरीष तुळपुळे, महासचिव, महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन, मुंबई यांनी सहभाग घेऊन मार्गदर्शन केले. श्री. भिडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रा. पंडित यांनी आभार मानले.

## ९.२ महाराष्ट्र महिला व्यासपीठ :-

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्यावतीने महिलांसाठी वर्षभर वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. महिलांना वेगवेगळया प्रकारच्या स्वयंरोजगाराचे मार्गदर्शन मिळावे यासाठी कार्यशाळा आयोजित केल्या जातात. तसेच समाजाच्या विविध क्षेत्रात यशस्वी असणा-या महिलांचा सत्कार करुन इतर महिलांना त्यांच्याकडून अनेक चांगल्या गोष्टी शिकण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येते. संयोजिका, श्रीमती रेखा नार्वेकर, तसेच कार्यकारी संयोजिका श्रीमती ममता कानडे यांनी महिलांनी सर्व बाबतीत सक्षम होऊन त्यांचा विकास व्हावा यासाठी अनेक उपक्रम, कार्यक्रम आयोजिण्यात आले.

२.१ - दि. १.४.२००९ रोजी दादर येथे महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि अखिल भारतीय महिला परिषद, माटुंगा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिला पत्रकारांचे कार्यकर्तृत्व आणि अनुभव' या विषयांवर चर्चात्मक कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात पत्रकार महिला श्रीमती आसावरी जोशी (नवशक्ती), श्रीमती राही भिडे (दैनिक प्रहार), श्रीमती प्रगती बाणखेले (महाराष्ट्र टाईम्स) व श्रीमती शिबाणी जोशी (मुंबई दूरदर्शन) इत्यादींनी सहभाग घेतला. महाराष्ट्र महिला व्यासपीठ-संयोजक व श्रीमती सुलक्षणा निमगांवकर यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

२.२ - दि. १५.६.२००९ रोजी गिरगाव येथे ५० महिलांची बैठक झाली. या बैठकीत महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे श्रीमती शोभा लोंढे यांनी महिलांना बचत गट स्थापना करुन कसा चालवावा तसेच त्यापासून महिलांना होणारे फायदे याबाबत माहिती दिली. तेथे जमलेल्या महिलांनी अंदाजे नवीन चार बचत गट स्थापन करण्याचे ठरविले. या प्रयत्नांना यश मिळून ऑगस्ट महिन्यातच हे बचत गट स्थापन करण्यात आले. महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे व श्रीमती अल्पना पेन्टर यांच्या माध्यमातून स्थापन केलेले मुंबईतील एकूण बचत गट १२५ (एकशे पंचवीस) आहेत. कुलाबा, गिरगांव, नायगाव, वरळी, बांद्रा, कांदीवली, मालाड, बोरीवली, मुलुंड, कुर्ला, गोवंडी, वाशी, कोपरखैरणे, नेरुळ येथील प्रत्येक बचत गटाने रुपये १००/- भरुन यशस्विनी अभियान या संस्थेचे सदस्यत्व घेतले आहे.

२.३ - दि. २५.७.२००९ रोजी अंधेरी येथे महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे स्थापन केलेल्या अंदाजे ३० बचत गटातील प्रमुख महिलांकरिता एक दिवशीय शिबीर यशस्विनी अभियान यांच्या माध्यमातून घेण्यात आले. अंदाजे ६० महिला सहभागी होत्या. या कार्यक्रमाचे आयोजन राजस्थानी सेवा संघ हायस्कूलच्या प्राध्यापिका श्रीमती व्ही. एस. वालेचा, व्यासपीठाच्या श्रीमती शोभा लोंढे व यशस्विनी अभियानच्या समन्वयक श्रीमती वैजयंती वैरागडे यांनी केले.

२.४ - दि. १९.६.२००९ व दि. २२.६.२००९ रोजी गोवंडी येथे महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे बचत गटातील महिलांकरिता 'स्वयंरोजगार प्रशिक्षण' शिबीर घेण्यात आले. या दोन्ही शिबीरात महिलांना जाम, सॉस, अत्तर, सरवत व चॉकलेट तसेच महिलांनी स्वतःच्या व इतरांच्या स्वभावातील वाईट गुण बदलण्याचा कसा प्रयत्न केला पाहिजे यावाबत माहिती दिली.

२.५ - दि. १३.८.२००९ रोजी गिरगाव येथे महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे बचत गटातील महिलांकरिता 'स्वयंरोजगार प्रशिक्षण' शिबीर घेण्यात आले. या शिबीरात महिलांना मेणबत्ती, अत्तर व उटणे तसेच महिलांनी व्यवसाय सुरु केल्यानंतर मालाचे पॅकींग व मार्केटिंग कशाप्रकारे करावे याबावत माहिती दिली.

२.६ - दि. ३० जून २००९ - गृहव्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा :- आरोग्य, स्वच्छता, विविध कला, महिलांना आवश्यक कायदेज्ञान, जमाखर्च लिहिणे अशा घरात अत्यंत गरजेच्या असलेल्या वाबींचे प्रशिक्षण देऊन महिलांना समर्थ, सक्षम वनविणे या हेतूने प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा. श्री. शरद काळे यांचे मार्गदर्शन घेऊन कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतनच्या प्राचार्य श्रीमती मॅचेडो यांच्याशी चर्चा करुन त्यांच्या संयुक्त विद्यमाने 'गृहव्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेचा वर्ग' चालू करण्याचे निश्चित केले. इमारतीच्या तळ घरातील सभागृहात ३० जून २००९ रोजी पहिला प्रशिक्षणाचा वर्ग सुरु करण्यात आला. त्यामध्ये कुलाबा, गिरगाव, वरळी, माटुंगा, कोपरखैरणे येथील महिलांनी भाग घेतला. त्यांना वेगवेगळया गोष्टींचे म्हणजेच मेणवत्ती, उदवत्ती, परफ्युम बनविणे हया नवीन उपक्रमांची माहिती देण्यात आली. सर्व महिलांना ही कल्पना अतिशय आवडली, त्यापैकी निवडक ३५ प्रशिक्षणार्थींची मुलाखतीद्वारे निवड करण्यात आली. या सर्वांना अत्यंत अल्प दरात संपूर्ण प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षणामध्ये २७ दिवस २७ विषय शिकविण्यात आले. स्वतःचे आरोग्य व स्वच्छता, स्वयंपाक घराची स्वच्छता, गॅसची काळजी व वापरण्याची दक्षता, महिलांचे कायदे, सर्व प्रकारच्या कपडयाची ओळख, काळजी व वापर. घरातील सर्व वस्तूंची, पितळी - तांबे, चांदी, लाकडी व इतरही भांडयांची काळजी, सर्व विजेची उपकरणे व त्यांची काळजी, आर्थिक व्यवस्थापन, टेबल व बेड लावण्याची पध्दत, तसेच अन्न पदार्थाचा योग्य वापर, वय, आजार व नैसर्गिक वातावरणाचा विचार करुन त्यावर कशी मात करता येईल यावद्दलचे मार्गदर्शन देण्यात आले. त्याचप्रमाणे उपवासाचे पदार्थ, महाराष्ट्रीयन, पंजावी, मुगलाई, चायनीज, इटालियन, दक्षिणात्य, मारवाडी, गुजराथी जेवण तसेच वेगवेगळे केक बनविणे असे जवळ जवळ १५० पदार्थ शिकविण्यात आले. या प्रशिक्षणांची कल्पना व उपयुक्तता पटल्यामुळे कॉलेज ऑफ होम सायन्स, निर्मला निकेतनच्या प्राचार्य महाराष्ट्र महिला व्यासपीठासोबत प्रशिक्षण देण्यासाठी तयार झाले. वरील सर्व विषयांपैकी काही विषय कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतनच्या १४ शिक्षिका व बाकी विषय समाजातील वेगवेगळया विषयांच्या तज्ज्ञाकडून शिकविण्यात आले. प्रशिक्षणांमध्ये सर्व विषयांच्या मराठी टिपणी देण्यात आली. या टिपणीवरुन महिलांची तोंडी परीक्षा घेण्यात आली. यशस्वी महिलांना 'गृहव्यवस्थापन प्रशिक्षण' कार्यशाळा संदर्भात 'प्रमाणपत्र' महाराष्ट्र महिला व्यासपीठ, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व कॉलेज ऑफ होम सायन्स, निर्मला निकेतन या नावाने तयार करण्यात आले व कॉलेज ऑफ होम सायन्स, निर्मला निकेतनमध्ये मुख्य पाहुण्या श्रीमती प्राजक्ता लवंगारे, महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते व प्रतिष्ठानचे विश्वस्त व महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्य सचिव मा. श्री. अजित निंवाळकर यांच्या उपस्थितीत प्रशिक्षणार्थीना प्रमाणपत्र देण्यात आले.

२.७ - दि. १५.९.२००९ रोजी चव्हाण सेंटरच्या तळघरातील सभागृहात 'गृहव्यवस्थापन प्रशिक्षण' कार्यशाळेत 'फळांची व पालेभाज्यांची सजावट' या विपयावर प्रशिक्षक श्रीमती नीना डायस यांनी प्रात्यक्षिकातून प्रशिक्षणार्थीना विविध भाज्या व फळांची रंगसंगती साधून, फळभाज्यांचे महत्व सांगून विषय समजावून दिला. ७० महिलांनी उपस्थित राहून प्रात्यक्षिकाचा लाभ घेतला.

२.८ - दि. २२ व २५ सप्टेंबर २००९ रोजी बचत गटातील महिला व 'गृहव्यवस्थापन प्रशिक्षण' कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थी यांच्यासाठी 'स्वयंरोजगार प्रशिक्षण' देण्यात आले. यावेळी भारत गॅस, कुलाबा संस्थेच्या अधिकारी श्रीमती रशिदा यांनी घरोघरी जाऊन विक्री करता येईल अशा त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सामानांची माहिती दिली. त्यातून मिळणा-या कमिशनमधून आर्थिक बाबतीत स्त्रिया स्वावलंबी होवू शकतील याची त्यांनी खात्री दिली. यावेळी श्री. आशिष परुळेकर, श्रीमती दिपा अरोरा, श्रीमती रमा मेनन यांनीही प्रशिक्षणार्थींना ग्राहकांशी संवाद कसा साधावा, आपल्याकडील मालाचे महत्त्व कसे पटवून द्यावे याविषयी अमूल्य मार्गदर्शन केले. पुणे येथील माय केअर संस्थेच्या संस्थापिका श्रीमती मंजिरी गोखले यांनी त्यांच्या संस्थेची माहिती सांगितली व महिलांना स्वयंरोजगार कसा उपलब्ध करुन देता येतो याबाबत मार्गदर्शन दिले.

२.९ - दिनांक ४ ऑक्टोबर २००९ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईतर्फे 'ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा' आयोजित करण्यात आला. या मेळाव्यामध्ये महाराष्ट्र महिला व्यासपीठ सहभागी झाले.

२.१० - दि. १० नोव्हेंबर २००९ ते २२ जानेवारी २०१० - गृहव्यवस्थापन कार्यशाळा :- महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि कॉलेज ऑफ होम सायन्स, निर्मला निकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने ३५ महिलांसाठी 'गृहव्यवस्थापन' या विषयावरील अतिशय आगळेवेगळे प्रशिक्षण १० नोव्हेंबर २००९ ते २२ जानेवारी २०१० पर्यंत घेण्यात आले.

महिलांच्या या दुस-या वर्गामध्ये सतत ९ आठवडे मंगळवार, गुरुवार, शनिवार असे २७ दिवस दुपारी २.३० ते ५.३० यावेळेत प्रशिक्षण देण्यात आले. त्यामध्ये महिलांच्या रोजच्या जीवनांतील उपयोगी असे २७ विषय शिकविण्यात आले. स्वतःचे आरोग्य, घराची स्वच्छता, घरातील सर्व वस्तूंची निगा, प्रथमोपचार या विषयांबरोबरच वेगवेगळया प्रकारचे जेवण बनविण्याच्या पध्दतीमध्ये जवळ जवळ १५० पदार्थ शिकविण्यात आले. वरील सर्व विषय त्या त्या विषयांतील अनुभवी मार्गदर्शक व निर्मला निकेतन कॉलेजच्या प्राध्यापिकांकडून शिकविण्यात आले.

या प्रशिक्षणामुळे महिलांनी स्वतःचे घर चांगल्याप्रकारे सांभाळणे तसेच छोटया प्रमाणात डबा सर्व्हीस सुरु करणे, छोटया प्रमाणात कॅटरिंग व्यवसाय सुरु करणे तसेच दुस-यांच्या घरी जाऊन त्यांचे घर सांभाळणे याची माहिती महिलांना मिळाली व आर्थिक बाबतीत सक्षम होण्याचे मार्गदर्शन मिळाले. कार्यशाळेतील प्रशिक्षिका व इतर महिलांकरिता डॉ. स्मिता धारप यांचे 'महिलांचे आरोग्य' या विषयी मार्गदर्शनपर भाषण ठेवले होते. या कार्यक्रमात अंदाजे १०० महिलांनी सहभाग घेतला.

२.११ - दि. २९ जानेवारी २०१० रोजी 'गृहव्यवस्थापन प्रशिक्षण' कार्यशाळेचा प्रमाणपत्र वितरण समारंभ झाला. यावेळी मुख्य पाहुण्या श्रीमती सुधा भावे (निवृत्त सनदी अधिकारी) यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रे देण्यात आली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईचे सरचिटणीस मा. श्री. शरद काळे यांनी यशस्वी मुलींना पारितोषिके दिली. कार्यक्रमात महिला व्यासपीठाच्या संयोजिकानी व्यासपीठाच्या कार्याविषयी व कार्यकारी संयोजिकानी गृहव्यवस्थापन प्रशिक्षणाविषयी माहिती दिली. कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतनच्या श्रीमती वीणा यार्दी यांनी गृहव्यवस्थापन प्रशिक्षणांविषयी आपले विचार व्यक्त केले. हे प्रशिक्षण सर्व महिलांनी मनापासून आवडल्याचे सांगितले.

२.१२ - दिनांक ११ फेब्रुवारी २०१० - महिलांकरिता 'स्वयंरोजगार प्रशिक्षण' कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात साधारण ८० महिलांचा सहभाग होता. श्रीमती उर्वशी धरधरा यांनी बचत गट या संदर्भात माहिती दिली. श्रीमती सविता खरात यांनी येणा-या रंगपंचमीच्या सणा दिवशी घातक रंग न वापरता घरगुती पालेभाज्यापासून बनविलेले रंग कसे बनविता येतात व हॅन्डमेंट पेपर बनविण्याबाबत प्रत्यक्ष कृती करुन दाखविली.

२.१३ - दि. २२.२.२०१० - सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन - प्रशिक्षण कार्यशाळा :- नवमहाराष्ट्र युवा अभियान, महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि महाराष्ट्र सोसायटी वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन, प्रशिक्षण कार्यशाळा' सुरु करण्याबाबत बैठक झाली. या बैठकीत दुपारी २.३० ते ६.०० वाजेपर्यंत सोमवार, बुधवार व शुक्रवार या तीन दिवशी अडीच महिन्यांची कार्यशाळा घेण्यात यावी असे ठरविण्यात आले.

२.१४ - दि. ८ मार्च २०१० - महिला जागृती अभियान :- महाराष्ट्र महिला व्यासपीठ व कुमुद विद्यामंदिर, देवनार यांच्या संयुक्त विद्यमाने ८ मार्च २०१० रोजी दुपारी २.०० वाजता जागतिक महिला दिनानिमित्ताने 'महिला जागृती अभियान' कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात साधारण १५० महिलांचा सहभाग होता. या कार्यक्रमात स्वागत कुमुद विद्यामंदिर - प्राथमिक विभागाच्या मुख्याधिपिका श्रीमती मुग्धा फणसे यांनी केले. प्रास्ताविक श्रीमती मीनाताई पाटील यांनी केले. सर्व उपस्थिती महिलांकडून प्रतिज्ञा कार्यकारी संयोजिका श्रीमती ममता कानडे यांनी म्हणून घेतली. महिला दिनाचे महत्त्व संयोजिका श्रीमती रेखा नार्वेकर यांनी सांगितले. वातावरण आणि मनाची जडणघडण त्याबाबत श्रीमती नीता प्रधान यांनी मार्गदर्शन केले. बचत गटातील दोन महिलांनी बचत गट कसा सुरु केला, त्यापासून बचत गटातील महिलांना झालेले फायदे याबाबत माहिती दिली. श्रीमती विजया चौहान यांनी महिलांना शिक्षणांचे, बचत गटाचे महत्त्व पटवून दिले. महिलांचे वैचारिक आदान प्रदान झाल्यामुळे महिलादिनाचे आयोजन औचित्यपूर्ण ठरले.

**९.३ नवमहाराष्ट्र युवा अभियान :-**

**३.१ - महाराष्ट्र राज्य युवा धोरण माहिती परिषद, मुंबई दि. १२ जून २००९ :-**

शुक्रवार दि. १२ जून २००९ रोजी मुंबई येथे युवा धोरण माहिती परिषदेचे आयोजन करण्यात आले. चव्हाण सेंटरच्या चौथ्या मजल्यावरील रंगस्वर सभागृहात ही परिषद सकाळी १०.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत संपन्न झाली. यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या निमंत्रक खा. सौ. सुप्रिया सुळे यांनी पत्रकारांशी मुक्त संवाद साधला. महाराष्ट्र राज्य युवा धोरणासंदर्भात ठराव पारित करण्यात आला. या अंतर्गत १२ जानेवारी २०१० पर्यंत महाराष्ट्र शासनाला आदर्शवत युवा धोरणाचा जाहीरनामा सुपूर्द करण्याचा मानस यावेळी खा. सौ. सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेस ५० वर्षे पूर्ण होत असताना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने महाराष्ट्रात गेल्या पंचवीस वर्षापासून कार्यरत असलेल्या प्रतिष्ठानच्या नवमहाराष्ट्र युवा अभियान या विभागामार्फत महाराष्ट्रातील युवांच्या विकासासंदर्भात महत्वाचा उपक्रम अभियानाच्या निमंत्रक सौ. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली हाती घेण्यात आलेला आहे. राज्य शासनाने अद्यापपर्यंत अधिकृत युवा धोरण जाहीर केलेले नसून शासनाने हे धोरण जाहीर करावे आणि महाराष्ट्रातील १३ ते ३५ वर्षे वयोगटातील युवांसंदर्भात आपली भूमिका स्पष्ट करावी, याकरिता नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे 'महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीरनामा' उपक्रमाची सुरुवात करण्यात आलेली असून या अंतर्गत दि. १२ जानेवारी २०१० रोजी मुंबई येथे राज्याच्या युवा धोरणाचा आदर्शवत आराखडा व मसुदा प्रतिष्ठानतर्फे शासनाला सुपूर्द करण्यात येणार आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे नवमहाराष्ट्र युवा अभियान व विविध समविचारी संस्थांच्या सहकार्याने राज्य युवा धोरण जाहीरनामा उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे. त्याअंतर्गत 'कोअर कमिटी' आणि 'ड्राफ्ट कमिटी' गठित करण्यात आलेली आहे. परिषदेमध्ये सर्वश्री अतुल देऊळगावकर, मॅथ्यू मट्टम, नीलेश पुराडकर यांनी राज्य धोरणाविषयीच्या आराखडयासंदर्भात मांडणी केली. महाराष्ट्रातील विभिन्न प्रदेशातून आलेल्या युवक-युवतींनी राज्य धोरणासंदर्भात मनोगते व्यक्त केली. यावेळी खा. सौ. सुप्रिया सुळे यांनी राज्य युवा धोरणाचा ठराव संमत करुन त्यांनी पत्रकारांशी वार्तालाप केला. या परिषदेसाठी महाराष्ट्रातून सुमारे ३५० युवक-युवतींची उपस्थिती होती. प्रस्तावना श्री. नीलेश राऊत यांनी केली. सूत्रसंचालन श्री. महेंद्र रोकडे यांनी केले. श्री. उमाकांत जगदाळे यांनी आभार मानले.

यानंतर विधान भवनात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांशी शिष्टमंडळासह भेट घेऊन या संदर्भात खा. सौ. सुप्रिया सुळे यांनी युवा धोरण जाहीर करण्याच्या मागणीसंदर्भात निवेदन दिले. मा. ना. मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी राज्य युवा धोरण जाहीर

करण्यासंदर्भात सकारात्मक आश्वासन दिले. तसेच या सर्व धोरण अंमलबजावणी व जाहीर करण्याच्या प्रक्रियेत नवमहाराष्ट्र युवा अभियानास आमंत्रित केले. यावेळी पत्रकारांसोबत बोलताना खा. सौ. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे मागील सहा महिन्यांपासून आम्ही महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीरनामा उपक्रम संपूर्ण राज्यभरात राबवत असून या प्रक्रियेमध्ये महाराष्ट्रातील युवांसंदर्भात कार्य करणा-या २५ संस्था, संघटना सहभागी आहेत. यानंतर राज्य पातळीवर युवा परिषदा आयोजित करुन तसेच महाराष्ट्रातील युवक-युवतींचे सर्वेक्षण करुन या संदर्भातील अंतिम मसुदा दि. १२ जानेवारी २०१० रोजी मा. मुख्यमंत्र्यांना सादर केला जाईल असे त्यांनी सांगितले.

यावेळी शिष्टमंडळामध्ये अभियानाचे सहसंयोजक सर्वश्री विश्वास ठाकूर, विजय कान्हेकर, दिनेश शिंदे, कोरोतर्फे श्री. महेंद्र रोकडे, युवातर्फे श्री. नीलेश पुराडकर, श्री. अमित सामंत यांची उपस्थिती होती.

३.२ - **महाराष्ट्र राज्य युवा धोरण प्राथमिक मसुदा सादर - दि. ८ ऑगस्ट २००९ :-**

शनिवार, दि. ८ ऑगस्ट २००९ रोजी रंगस्वर सभागृहामध्ये राज्य युवा धोरण प्राथमिक मसुदा जाहीरनामा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्यमंत्री मा. ना. छगन भुजबळ, विशेष अतिथी म्हणून क्रिडा व युवक कल्याणमंत्री डॉ. सतीश पाटील, अध्यक्षस्थानी श्री. हुसेन दलवाई होते. याप्रसंगी सरचिटणीस श्री. शरद काळे, खा. सौ. सुप्रिया सुळे, श्री. प्रवीण पाटील (विशेष कार्यालय अधिकारी, भारत सरकार) यांच्यासह ड्राफ्ट कोअर टीमचे सदस्य मंचावर उपस्थित होते.

नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या निमंत्रक सौ. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली युवा धोरणाचा प्राथमिक मसुदा शासनाला समारंभपूर्वक सादर करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना मा. ना. छगन भुजबळ म्हणाले की, प्रस्तावित महाराष्ट्र राज्य युवा धोरणाचा मसुदा सादर करुन चालणार नाही. तर त्याला व्यापक आंदोलनाची जोड द्यावी लागेल. विविध वाहिन्यांवरुन दैववाद व अंधश्रध्दा पसरविणा-या मालिका दाखविल्या जात आहेत. त्यामुळे युवा पिढी भरकटत चालली आहे. युवा पिढीमध्ये विज्ञानवादाचा प्रसार करण्यासाठी युवा धोरणातून प्रयत्न झाले पाहिजेत, तरच भारत देशाचे महासत्ता बनण्याचे स्वप्न सत्यात उतरु शकेल. राज्यात आजपर्यंत युवा धोरण नव्हते, ते आता होत आहे ही चांगली बाब आहे. त्यामुळे सरकारच्या युवांसाठी असलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होऊ शकेल. राज्यातील जवळपास अर्धी लोकसंख्या युवांची असताना त्यांच्यासाठी धोरण असणे ही काळाची गरज बनली आहे आणि ही गरज ओळखून सरकार या संदर्भात नक्कीच कार्यवाही करेल.

युवक कल्याण राज्यमंत्री मा. ना. सतीश पाटील म्हणाले की, युवांच्या धोरणासंदर्भात शासन सकारात्मक आहे. विशेषत: रोजगार व शिक्षण या संदर्भात युवांचे अनेक प्रश्न असून त्यांच्या सोडवणूकीसाठी स्वतंत्र युवा धोरण असणे गरजेचे बनलेले आहे. त्यासाठी सरकार त्याची निश्चितच अंमलबजावणी करेल.

खा. सौ. सुप्रिया सुळे यांनी युवा धोरण जाहीरनामा उपक्रमामागील भूमिका मांडली. त्या म्हणाल्या की, युवांमध्ये प्रचंड शक्ती व ऊर्जा असते. ती विधायक मार्गी लागली नाही तर त्यातून समाजविघातक कृत्यांना चालना मिळते. त्यासाठी युवांच्या गरजा व समस्या ओळखून त्यांच्या विकासासाठी शासनाकडून प्रयत्न झाले पाहिजेत. यासाठी युवा धोरण तयार करण्यात येत आहे. शहरी व ग्रामीण युवांमधील असणारी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय दरी कमी करण्याचा प्रयत्न याद्वारे आम्ही करण्याचा प्रयत्न करीत आहोत. राष्ट्रीय युवा दिनी म्हणजे १२ जानेवारी २०१० रोजी राज्य युवा धोरणाचा अंतिम मसुदा शासनास सादर करण्याचा मानस त्यांनी यावेळीही बोलून दाखविला. यावेळी श्री. हुसेन दलवाई, श्री. शरद काळे यांचीही भाषणे झाली.

युवा धोरण जाहीरनाम्यांतर्गत गठित करण्यात आलेल्या ड्राफ्ट कोअर टीममधील सर्व सदस्यांचा यावेळी मा. ना. छगन भुजबळ व मा. ना. सतीश पाटील यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. नीलेश राऊत यांनी केले. श्री. नीलेश पुराडकर यांनी प्रास्ताविक केले. श्रीमती सुषमा खिल्लारे यांनी उपस्थितींचे आभार मानले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला यवतमाळच्या चमूने युवा धोरणाची मागणी करणारे पथनाटय सादर केले. त्यानंतर महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीरनामा उपक्रमाच्या आतापर्यंतच्या वाटचालीचे सिंहावलोकन करणारी चित्रफित यावेळी दाखविण्यात आली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

कार्यक्रमानंतर नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे तयार करण्यात आलेला राज्य युवा धोरणाचा प्राथमिक मसुदा अभियानाच्या निमंत्रक खा. सौ. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री मा. ना. अशोक चव्हाण यांना त्यांच्या निवासस्थानी सादर करण्यात आला. राज्य शासनाने युवा धोरण जाहीर करावे अशी विनंती खा. सौ. सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्र्याकडे केली. राज्याचे आदर्श युवा धोरण कसे असावे या संदर्भात नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे हा प्राथमिक मसुदा तयार करण्यात आलेला आहे. त्यात आवश्यक सूचना व शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. सरकारने याचा विचार करुन युवा धोरण जाहीर करावे. प्राथमिक मसुद्यातील शिफारशींचा अभ्यास करुन त्या संदर्भात विविध पातळयांवर त्याची अंमलवजावणी कशी करता येईल याचा विचार शासन नक्कीच करेल असे आश्वासन मुख्यमंत्री मा. श्री. अशोक चव्हाण यांनी दिले.

**३.३ - वृक्षारोपण कार्यक्रम - दि. ९ ते १५ ऑगस्ट २००९ :-**

नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दरवर्षी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला दि. १४ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन करण्यात येते. तथापि दि. १४ ऑगस्ट २००९ रोजी दहीहंडी असल्यामुळे रॅली रद्द करण्यात आली. या कारणास्तव रॅलीऐवजी प्रत्येक विभागामध्ये दि. ९ ते १५ ऑगस्ट २००९ (क्रांतीदिन ते स्वातंत्र्यदिन) दरम्यान वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रत्येक जिल्हयात शंभर रोपटयांचे रोपण शास्त्रीय पध्दतीने करण्यासंदर्भात व जोपासणा करण्याचा संकल्प यावेळी करण्यात येवून त्याचा तपशीलही यावेळी स्थानिक कार्यकर्त्यांना कळविण्यात आला होता.

**३.४ - उत्तर प्रदेश युवा धोरणासंदर्भात बैठक - दि. २६ सप्टेंबर २००९ :-**

उत्तर प्रदेशात देखील आतापर्यंत राज्य युवा धोरण जाहीर करण्यात आलेले नसून या संदर्भात उत्तर प्रदेशमधील 'सहयोग' या संस्थेमार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. सहयोग या संस्थेचे उत्तर प्रदेशातील बारा जिल्हयांमध्ये युवा व महिलांमध्ये कार्य असून या अंतर्गत त्यांनी ५००० युवांचे नेटवर्क उभे केलेले आहे. उत्तर प्रदेश युवा धोरणाच्या जाहीरनाम्यासंदर्भात सहयोग संस्थेने त्यांच्या दिल्ली येथील कार्यालयात बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीस चेतना (गुजरात, राजस्थान), पीएफआय (छत्तीसगढ, झारखंड, बिहार) तसेच दिल्ली येथील काही संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी विविध राज्यांतील प्रतिनिधींनी आपापल्या धोरणाच्या जाहीरनामा व मसुद्याच्या रचनेसंदर्भातील सादरीकरण केले. नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीरनामा उपक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. तसेच उत्तर प्रदेश युवा धोरण जाहीरनाम्या संदर्भात सहयोग संस्थेतर्फे सल्लागार समिती स्थापन करण्यात आलेली असून या समितीमध्ये नवमहाराष्ट्र युवा अभियानाचा समावेश करण्यात आलेला आहे. पुढील काळात त्यांना मसुद्या संदर्भातील लागणारी तसेच आपल्याकडील आकडेवारी संदर्भातील लागणारी मदत करण्याचे ठरले.

**३.५ - जिल्हा कार्यशाळांच्या नियोजना संदर्भातील कार्यशाळा - दि. ८ व ९ नोव्हेंबर २००९ :-**

महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीरनामा उपक्रमांतर्गत जिल्हा कार्यशाळांच्या आयोजना संदर्भात दिनांक ८ व ९ नोव्हेंबर २००९ रोजी मुंबई येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये राज्यभरात घ्यावयाच्या जिल्हा कार्यशाळांच्या आयोजनासंदर्भात आराखडा तयार करण्यात आला. जिल्हा कार्यशाळांचा उद्देश, पूर्वतयारी, कार्यशाळेचे वेळापत्रक, अहवाल या संदर्भात प्रशिक्षण देण्यात आले.

**३.६ - विविध जिल्हा कार्यशाळा : नोव्हेंबर व डिसेंबर २००९ :-**

महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीरनामा उपक्रमासंदर्भात राज्यातील युवा व या विषयातील तज्ज्ञ व्यक्तींकडून प्राथमिक मसुद्यावर सूचना याव्यात, यासाठी नोव्हेंबर व डिसेंबर २००९ या महिन्यांमध्ये पुणे, मुंबई, अमरावती, औरंगाबाद, बीड, बुलढाणा, ठाणे, नांदेड, सातारा, सिंधुदुर्ग, यवतमाळ, हिंगोली, लातूर या ठिकाणी नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे विविध संस्थांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. राज्य युवा धोरणाचा अंतिम मसुदा तयार करताना या कार्यशाळांमधून प्राप्त झालेल्या विविध सूचनांचा विचार करण्यात आला.

**३.७ - विधानभवन, नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात मंत्रिमहोदय व आमदारांच्या भेटी - दि. १४ ते १६ डिसेंबर २००९ :-**

नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या शिष्टमंडळाने सोमवार ते बुधवार, दि. १४ ते १६ डिसेंबर २००९ दरम्यान विधानभवन, नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात राज्याला युवा धोरण जाहीर करण्यासंदर्भात सर्वपक्षीय आमदारांचे एकमत व्हावे याकरिता राज्यातील विविध खात्याचे मंत्री व सुमारे १०० आमदारांशी चर्चा केली. निवेदन व राज्य युवा धोरणाचा प्राथमिक मसुदा सादर करुन राज्य युवा धोरण जाहीर करण्यासाठी सांसदीय पातळीवर पुढाकार घ्यावा असे साकडे मंत्रीमहोदय व आमदारांना घातले.

**३.८ - राज्यस्तरीय युवा परिषद - दि. १२ जानेवारी २०१० :-**

मंगळवार, दि. १२ जानेवारी २०१० रोजी नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने महाराष्ट्र राज्य युवा धोरण अंतिम मसुदा जाहीरनामा संदर्भात राज्यस्तरीय युवा परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेसाठी क्रीडा व युवक कल्याण खात्याचे मंत्री मा. ना. सुरेश शेट्टी, राज्यमंत्री मा. ना. भास्कर जाधव, खा. सौ. सुप्रिया सुळे, प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे संचालक श्री. वसंतराव वैद्य यांची उपस्थिती होती.

यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने तयार करण्यात आलेला महाराष्ट्र राज्याचा युवा धोरणाचा अंतिम मसुदा शासनास सादर करण्यात आला. कार्यक्रमामध्ये बोलताना महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण होत असतानाही राज्याला स्वतंत्र युवा धोरण नसल्याची खंत मा. ना. सुरेश शेट्टी व मा. ना. भास्कर जाधव यांनी व्यक्त केली. या संदर्भात सकारात्मक पाऊल उचलून लवकरच शासकीय पातळीवर समिती गठित करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

राज्याला युवा धोरणाची असलेली निकड प्रतिपादन करताना खा. सौ. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, शासनाकडून या संदर्भात सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा आहे. महिला आयोग, बाल आयोग यांच्या धर्तीवर राज्य युवा आयोगाची निर्मिती करावी अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. यावेळी विविध विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. सर्वश्री अभिजित पानसे, निरंजन डावखरे, महेश तपासे यांनी पक्षीय अभिनिवेश बाजूला सारुन राज्य युवा धोरणासाठी पाठिंबा दर्शविला. श्री. अभिजित पानसे यांनी युवा धोरणाच्या निर्मिती प्रक्रियेमध्ये सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. श्री. निरंजन डावखरे यांनी युवा धोरणाचे महत्व प्रतिपादित केले. श्री. महेश तपासे यांनी युवा धोरणाची उद्दिष्टे काय असावीत याविषयी अपेक्षा व्यक्त केल्या.

महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीरनामा उपक्रमांतर्गत यापूर्वी युवा धोरणाचा प्राथमिक मसुदा तयार करुन तो राज्य शासनास दिनांक ८ ऑगस्ट २००९ रोजी सादर करण्यात आलेला आहे. प्राथमिक मसुदा तयार करण्याकरिता सुमारे २५ जिल्हयांमध्ये जिल्हा कार्यशाळा, युवा परिषदांचे आयोजन करुन युवांना व जाणकारांना या प्रक्रियेमध्ये सामील करुन घेण्यात आले आहे. प्राथमिक मसुदा तयार झाल्यानंतर त्यावर प्रतिक्रिया व सूचना मिळण्याकरिता पुनःश्च एकदा राज्य पातळीवर २० जिल्हयांमध्ये कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. या मसुद्यावर राज्यभरात चर्चा घडवून आणून सर्व सूचनांचा समावेश करुन राज्य युवा धोरणाचा अंतिम मसुदा तयार करण्यात आलेला आहे. यावेळी अभियानाकडून आगामी उपक्रमाची घोषणा करण्यात आली. नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे तीन कलमी कार्यक्रम पुढील काळात हाती घेण्यात येणार असून या अंतर्गत

महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी योजना, युवा अभिसरण मोहीम, युवा साहित्य संमेलन या संदर्भातील उपक्रम व प्रयोगांचा यामध्ये समावेश असणार आहे.

श्री. श. गं. काळे, सरचिटणीस यांनी अध्यक्षीय समारोप केला. श्री. नीलेश राऊत यांनी सूत्रसंचालन केले. श्री. विश्वास ठाकूर यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. या परिषदेमध्ये राज्यभरातून मोठया प्रमाणात युवक-युवती सहभागी झाले होते.

**३.९ - राज्यस्तरीय यशवंतराव चव्हाण युवा व युवा क्रीडा पुरस्कार प्रदान कार्यक्रम - दि. १२ जानेवारी २०१० :-**

मंगळवार, दि. १२ जानेवारी २०१० रोजी नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने राज्यस्तरीय यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार प्रदान कार्यक्रमाचे आयोजन मुंबई येथे करण्यात आले होते. यशवंतराव चव्हाण विशेष युवा क्रीडा पुरस्कार - कृष्णा पाटील (५१ हजार रु., सन्मानपत्र व सन्मानचिन्ह), यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार - परेश ज. म. (११ हजार रु., सन्मानपत्र व सन्मानचिन्ह), यशवंतराव चव्हाण युवा क्रीडा पुरस्कार - हंसराज पाटील (युवक) (११ हजार रु., सन्मानपत्र व सन्मानचिन्ह), यशवंतराव चव्हाण युवा क्रीडा पुरस्कार - लतिका माने (युवती) (११ हजार रु., सन्मानपत्र व सन्मानचिन्ह) यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुरस्कारार्थींनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमासाठी क्रीडा व युवक कल्याण खात्याचे मंत्री मा. ना. सुरेश शेट्टी, राज्यमंत्री मा. ना. भास्कर जाधव, सौ. सुप्रिया सुळे, प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे संचालक श्री. वसंतराव वैद्य यांची उपस्थिती होती.

**३.१० - महिला आरोग्य स्वराज्य योजनेचा शुभारंभ : दि. २९ जानेवारी २०१० :-**

शुक्रवार दि. २९ जानेवारी २०१० रोजी 'नवमहाराष्ट्र युवा अभियान व ध्येय प्रतिष्ठान' यांच्या संयुक्त विद्यमाने कुडाळ (सिंधुदुर्ग) ग्रामीण रुग्णालय येथे आयोजित महिला आरोग्य स्वराज्य योजनेचा शुभारंभ अभियानाच्या निमंत्रक सौ. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सावंतवाडी - कुडाळचे आमदार श्री. दीपक केसरकर, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री दत्ता बाळसराफ, विजय कान्हेकर, नीलेश राऊत, उमाकांत जगदाळे, अभिजित खानविलकर यांची उपस्थिती होती.

महिला आरोग्य योजनेअंतर्गत यावेळी २५०० महिलांची नोंदणी करण्यात आली. नोंदणी झालेल्या महिलांच्या आरोग्याची तपासणी करुन कुडाळ ग्रामीण रुग्णालयाच्या सहकार्याने पहिल्या दिवशी ७ नेत्रशस्त्रक्रिया पार पाडण्यात आल्या. या योजनेमध्ये सहभागी महिलांवर आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत. ज्या महिलांवर गंभीर शस्त्रक्रियांची आवश्यकता आहे त्यांना मिरज येथे पाठविण्यात येणार आहे. यासाठी त्यांना सर्व खर्च शासनाकडून पुरविण्यात येणार आहे. यावेळी मिरज, कोल्हापूर, पुणे, सांगली, सिंधुदुर्ग, रत्नागिरी येथील नामांकित डॉक्टरांनी महिला रुग्णांची तपासणी करुन त्यांना आरोग्यविषयक सल्ला दिला. ग्रामीण भागातील महिलांनी या योजनेला प्रतिसाद दिला. तसेच त्याच दिवशी नवमहाराष्ट्र युवा अभियान व ध्येय प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने नाथ पै डी.एड. महाविद्यालयात 'कोकणातील युवकांची सद्यःस्थिती' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अभियानाच्या निमंत्रक खा. सौ. सुप्रिया सुळे, एमकेसीएलचे चेअरमन श्री. विवेक सावंत, वरिष्ठ पत्रकार श्री. कुमार कदम, निवासी उपजिल्हाधिकारी श्री. दिलीप पांढरपट्टे, कालनिर्णयचे श्री. शेवाळकर यांची उपस्थिती होती.

यावेळी कोकणातील युवकांच्या सद्यःस्थितीवर आधारित चित्रफित दाखविण्यात आली. परिसंवादात कोकणातील युवांचा रोजगार, शैक्षणिक स्थिती, आयटी क्षेत्रातील संधी, युवांपुढील समस्या, पर्यटन आणि कृषी क्षेत्रातील करिअरच्या संधी या संदर्भात विवेचन करण्यात आले. श्री. शेवाळकर यांनी सूत्रसंचालन केले. परिसंवादात रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील सुमारे १००० युवांनी भाग घेतला.

**३.११ - विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. सुरेश खोपडे यांचे 'देशाची सुरक्षितता आणि तरुणांची भूमिका' या विषयावर व्याख्यानमाला -**

'देशाची सुरक्षितता आणि तरुणांची भूमिका' या विषयावर विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. सुरेश खोपडे यांची व्याख्यानमाला विविध जिल्हयांमध्ये आयोजित करण्यात आली होती. नवमहाराष्ट्र युवा अभियान व निसर्ग ट्रस्ट यांच्या संयुक्त

विद्यमाने पाटील मंगल कार्यालय, बदलापूर येथे त्यांचे व्याख्यान व प्रकट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्वश्री श्रीधर पाटील, ऋतुराज जोशी उपस्थित होते.

हिरानंद नेमिचंद वाचनालय, सोलापूर येथे नवमहाराष्ट्र युवा अभियान व जिल्हा श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. खोपडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस आयुक्त श्री. भूषणकुमार उपाध्याय, उपायुक्त श्री. श्याम देगावकर, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे सोलापूर विभागीय केंद्राचे संघटक श्री. दिनेश शिंदे, मोहल्ला कमिटीचे सदस्य, महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

नवमहाराष्ट्र युवा अभियान व श्रमिक पत्रकार संघ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. खोपडे यांचे व्याख्यान श्रमिक पत्रकार संघाच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. यावेळी सर्वश्री सलील देशमुख, संजय लोखंडे, श्रेयस बोडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सुमारे दोनशे महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

**३.१२ - महाराष्ट्र राज्य युवा धोरणासंदर्भात शासकीय समिती गठित - दि. २० फेब्रुवारी २०१० :-**

नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दि. १२ जानेवारी २०१० रोजी राज्य शासनास युवा धोरणाचा अंतिम मसुदा सादर करण्यात आला. त्यानंतर दि. २० फेब्रुवारी २०१० रोजी महाराष्ट्र राज्य युवा धोरणासंदर्भात शासकीय समिती गठित करण्यात आली आहे. या शासकीय समितीची पहिली बैठक दि. ३० एप्रिल २०१० रोजी राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. अशोकराव चव्हाण यांच्या 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी संपन्न झाली. यावेळी क्रीडा व युवक कल्याण मंत्री मा. ना. डॉ. सुरेश शेट्टी, क्रीडा व शालेय शिक्षण विभागाचे सचिव मा. डॉ. संजीवकुमार, संचालक मा. श्री. वसंतराव वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती. या समितीमध्ये अभियानाच्या पाच प्रतिनिधींची निवड करण्यात आली. पहिल्या बैठकीमध्ये नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे सर्वश्री विश्वास ठाकूर, दत्ता बाळसराफ, नीलेश राऊत, नीलेश पुराडकर यांनी सूचना मांडल्या. शासनातर्फे तयार करण्यात आलेल्या टिप्पणीमध्ये नवमहाराष्ट्र युवा अभियानाचा विशेष उल्लेख करण्यात आलेला आहे.

राज्य युवा धोरणसंदर्भात विषयवार उपसमित्या गठित करण्यात आलेल्या आहेत. आमदार श्रीमती प्रणोती शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य व सामाजिक क्षेत्र उपसमिती, श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण, प्रशिक्षण व रोजगार उपसमिती, श्री. आशिष कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी, अल्पसंख्याक, मागासवर्गीय व कृतिआराखडा उपसमिती, श्री. विश्वास ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली कला, संस्कृती व मनोरंजन उपसमिती, डॉ. व्यंकटेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली विज्ञान आणि तंत्रज्ञान उपसमिती गठित करण्यात आलेली आहे. या उपसमित्यांमध्ये नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे आणखी सात प्रतिनिधींची निवड करण्यात आलेली आहे.

**३.१३ - महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी योजना समन्वय उपक्रम - मार्च २०१० :-**

माहे मार्च २०१० पासून नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या तीन कलमी उपक्रमांतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये समन्वय साधून महाराष्ट्रातील ठराविक गांवांमध्ये जलसंधारणाचे प्रयोग हाती घेण्याचे ठरलेले आहे. त्यापैकी काही गांवांमध्ये या उपक्रमाला सुरुवात करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी योजना उपक्रमाचे राज्य समन्वयक म्हणून मा. शिवाजी गावंडे हे कार्य पाहत आहेत. या उपक्रमांतर्गत महालिंगी (ता. कळमनुरी, जि. हिंगोली) गावात रोजगार हमी योजना अंमलबजावणीचे कार्य वेगाने हाती घेण्यात आलेले असून तेथे रोजगार हमी योजने अंतर्गत जलसंधारणाचे कार्य सुरु आहे.

**३.१४ - युवा धोरण - एसएमएसद्वारे प्रसार :-**

नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे राबविण्यात आलेल्या राज्य युवा धोरण उपक्रमानंतर या संदर्भात प्रचार करण्याकरिता एक लाख एसएमएसचे सॉफ्टवेअर PAYPAL COMPANY कडून खरेदी करण्यात आले. या सॉफ्टवेअरद्वारे UTHPOLCY या प्रेषक नांवाने युवा धोरणासंदर्भात सुमारे एक लाख एसएमएसद्वारे महाराष्ट्रातील युवा व युवा विकासात्मक कार्य करणा-या संस्था व स्वयंसेवकांपर्यंत प्रसार करण्यात आला. नुकतेच या सॉफ्टवेअरचे नूतनीकरण करण्यात आलेले आहे.

**३.१५ - मराठीतील आदर्श युथ पोर्टल :-**

नवमहाराष्ट्र युवा अभियानाची www.navmaharashtra.org वेबसाइट ब्लॉग स्वरुपात मागील दीड वर्षांपासून कार्यान्वित आहे. याद्वारे नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या विविध उपक्रमांची माहिती, नोक-या, कॅम्पस इंटरव्हयू, शासकीय योजना यांची माहिती देण्यात येते. आय-स्मार्ट टेक्नॉलॉजीस, पुणे या कंपनीच्या सहकार्याने ही वेबसाइट मराठीतील पहिले आदर्श युथ पोर्टल बनविण्याकरिता प्रयत्न सुरु आहेत.

**३.१६ - नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि पिनॅकल क्लब, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेले कार्यक्रम :**

**लहान मुलांसाठी साहस / कमांडो शिबीर :-** लहान वयातच साहसीवृत्ती मुलांमध्ये रुजण्यासाठी ८ ते १५ वयोगटातील मुलांसाठी साहस शिबीराचे आयोजन करण्यात येते. या वर्षात असे ५ साहस / कमांडो शिबीर घेण्यात आले. माथेरान येथे तीन, मळवली आणि वसई येथे शिवीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरात प्रस्तरारोहण, प्रस्तरावतरण, तंबू उभारणे, आकाशदर्शन, गिर्यारोहण साहित्याची ओळख, रायफल शुटींग असे अनेक विपय शिकविण्यात आले. या शिबीराचा लाभ एकूण २४१ बाल गिर्यारोहकांनी घेतला.

**सहयाद्रीमध्ये पदभ्रमण :-** सहयाद्रीमध्ये अर्नाळा किल्ला, अलिबाग किल्ला, केळवे, माहिम, सफाळा किल्ला, नंदकेश्वर ते वैतरणा, वैभव रामेश्वर ते नागोठणे, रामराज, रुपगड-सोनगड (डांग, गुजरात), कोरीगड, सागरगड, मुरुड-जंजिरा कोरलाई किल्ला, शिवनेरी, कोथळीगड, साल्हेर-सलोटा-हरगड-मोरा-मुल्हेर-मांगी-तुंगी, वासोटा-नागेश्वर असे अनेक पदभ्रमण मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आले. याचा लाभ एकूण ३०१ गिर्यारोहकांनी घेतला. तसेच कान्हेरी गुंफा, वोरीवली येथे ७ शिबीराचे आयोजन केले होते. याचा लाभ ३११ गिर्यारोहकांनी घेतला.

**कोकण पदभ्रमण मोहिम :-** गेल्या पाच वर्षात गोव्यापर्यंत मोहिम आखण्यात आली होती. यंदाच्या सहाव्या वर्षी कोस्टल कर्नाटका अंतर्गत कारवार ते मुरुडेश्वर अशी मोहिम आयोजित करण्यात आली होती.

**टकमक रॅपलिंग - २००९ :-** किल्ले रायगडावरील टकमक टोकावरुन दिनांक २४.१२.२००९ ते २७.१२.२००९ या कालावधीत प्रस्तरावतरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या १००० फूट प्रस्तरावतरण कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातून एकूण १२७ गिर्यारोहक आले होते. याची पूर्व तयारी म्हणून कान्हेरी गुंफा, वोरीवली येथे प्रशिक्षण देण्यात आले होते. दिनांक ६ आणि १३ डिसेंबरच्या प्रशिक्षणाचा लाभ एकूण १५८ गिर्यारोहकांनी घेतला. यशस्वी प्रस्तरावतरण केलेल्या गिर्यारोहकांना देवाडिगा हॉल, दादर येथे दि. ८.१.२०१० रोजी प्रशस्तीपत्रक वितरीत करण्यात आले. या कार्यक्रमाला कमांडर श्री. कापले आणि सिध्दीविनायक न्यासाचे श्री. एकनाथ संगम प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**साहसी मोटर सायकल मोहिम :-** दि. १.१०.२००९ ते ४.१०.२००९ या कालावधीत साडेतीन शक्तिपीट असे 'साहसी मोटर सायकल' मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमे दरम्यान एच.आय.व्ही./एडस् बाबत माहिती पत्रक वाटून जनजागृती करण्यात आली.

**हिमालयात पदभ्रमण मोहिम :-** सप्टेंबर / ऑक्टोबर २००९ दरम्यान हिमालयातील पिण्डारी ग्लेशियर येथे यशस्वी 'पदभ्रमण मोहिम' आखण्यात आली होती. या मोहिमेत १३ सभासदांनी भाग घेतला होता.

**मोफत आरोग्य तपासणी / मोफत औषध वाटप शिबीर :-** दि. २२.११.२००९ रोजी महाड येथील किंजलोळी गावात मोफत आरोग्य तपासणी आणि मोफत औषध वाटप शिबीराचे आयोजन केले होते. या शिबीराचा लाभ एकूण ३१४ ग्रामस्थांनी घेतला. प्रत्येक रुग्णाला एक महिना पुरेल एवढी औषधे वाटण्यात आली. तसेच दीपावली निमित्त मळवली येथील संपर्क वालग्राम आश्रम शाळेतील मुलांना फराळ, कपडे, खेळणी यांचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे शैक्षणिक साहित्य वहया, पेन्सिल, पेन, रवर व कंपास वाटण्यात आले.

## ९.४ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम :

१९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अंमलवजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम' या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करीत असून ते आपली सेवा या योजनेसाठी देत आहेत.

विधी सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८५ मध्ये मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला संबंधी काम करणा-या अशासकीय संघटनाना अधिमान्यता किंवा अधिस्वीकृती (Accreditation) देण्याची आणि त्यांना सहाय्यक अनुदान (Grant-in-Aid) देण्याची तरतूद आहे. त्यानुसार अधिमान्यतेसाठी व सहाय्यक अनुदानासाठी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, त्यांच्या उत्तराची प्रतीक्षा आहे.

**फोरममार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारचे काम केले जाते :-**

१. समाजातील गोर-गरीब व तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत तोंडी सल्ला देणे.
२. प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नासंबंधी सखोल अभ्यास करुन गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.
३. काही वेळा पत्रव्यवहाराद्वारे गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.
४. पक्षकारांच्या तंटयामध्ये सामोपचाराने तडजोड घडवून आणणे.
५. विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन कायद्याचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.
६. विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यानुसार बनविण्यात आलेल्या नियमांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन नियमांचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.
७. कायद्यांची विशेष माहिती करुन देण्यासाठी तज्ज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.
८. सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी विधी साक्षरता कार्यशाळांचे आयोजन करणे.
९. विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी 'मूट कोर्ट' स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे. तसेच अशा विद्यार्थ्यांसाठी वकिलांची व्यावसायिक नीतिमत्ता या विषयावर परिसंवादांचे आयोजन करणे.

त्यानुसार २००९-२०१० या आर्थिक वर्षामध्ये फोरममार्फत करण्यात आलेल्या कामाचा आढावा खालीलप्रमाणे आहे.

४.१ - **फोरमच्या बैठका** :- कायदेविपयक सहाय्य व सल्ला योजनेच्या अंमलवजावणीबाबत विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुस-या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात. गेल्या आर्थिक वर्षामध्ये एकूण १० बैठका झाल्या. सरासरी १२ सदस्य प्रत्येक बैठकीला उपस्थित होते. या सर्व बैठकीमध्ये अंदाजे २०० विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

४.२ - **उपसमितीच्या बैठका** :- एखाद्या विषयासंबंधी सखोल अभ्यास करुन प्रस्ताव तयार करण्यासाठी वेळोवेळी फोरमच्या वेगवेगळया उपसमित्या नेमल्या जातात. त्यानुसार खालीलप्रमाणे उपसमित्यांच्या वैठका झाल्या.

**अ) पुस्तक पुनर्मुद्रण समिती** :-

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंवईने 'हॅन्ड बुक फॉर सिनिअर सिटीझन्स्' नावाचे पुस्तक प्रकाशित केले आहे. त्या पुस्तकाच्या प्रती संपल्या असल्यामुळे त्या पुस्तकाचे पुनर्विलोकन करुन ते पुन्हा प्रकाशित करण्याचे ठरले आहे. हे काम करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे निवृत्त मुख्य सचिव श्री. शरद उपासनी यांच्या अध्यक्षतेखाली एका उपसमितीची निर्मिती करण्यात आली आहे. त्या समितीची पहिली बैठक दिनांक ९ जुलै २००९ रोजी चव्हाण केंद्राच्या पाचव्या मजल्यावरील वोर्ड रुममध्ये संपन्न

झाली. बैठकीला ६ सदस्य उपस्थित होते. या बैठकीमध्ये सुधारित पुस्तकाचा आराखडा ठरविण्यात आला.

**ब) सुकाणू समितीची बैठक :-**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईमार्फत दरवर्षी ऑक्टोबर महिन्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा चव्हाण केंद्रामध्ये आयोजित केला जातो. ऑक्टोबर २००९ मध्ये भरविण्यात येणा-या मेळाव्यासंबंधी विचार करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सर्व विभागांच्या प्रतिनिधींची बैठक दिनांक १६ जुलै २००९ रोजी सायंकाळी ४.३० वाजता पाचव्या मजल्यावरील बोर्ड रुममध्ये मा. श्री. शरद काळे, सरचिटणीस यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीला १२ प्रतिनिधी उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये मेळाव्याचे स्वरुप, कार्यक्रम व इतर बाबीसंबंधी चर्चा होऊन प्रस्ताव तयार करण्यात आले. या ज्येष्ठ नागरिकांच्या आनंद मेळाव्याची पूर्व तयारी फोरममार्फत केली जाते.

**क) ज्येष्ठ नागरिक संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक :-**

ऑक्टोबर २००९ मध्ये चव्हाण सेंटरमध्ये आयोजण्यात येणा-या ज्येष्ठ नागरिक मेळाव्याची रुपरेखा ठरविण्यासाठी व त्याबाबत विस्तृत विचार करण्यासाठी कुर्ला ते कर्जत - कसारा क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघांच्या प्रतिनिधींची बैठक विरंगुळा केंद्र, मुलुंड येथे दिनांक २८ जुलै २००९ रोजी सायंकाळी ४ वाजता संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी श्री. व्ही. एम. दाते हे होते. बैठकीला अंदाजे ५० प्रतिनिधी उपस्थित होते. वैठकीमध्ये प्रतिष्ठानच्या सुकाणू समितीने तयार केलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेण्यात आले.

**ड) फोरमची कार्यसूची उपसमितीची बैठक :-**

फोरमची २०० वी मासिक बैठक विशेष वैठक म्हणून साजरी करावी असे ठरले होते. त्यानुसार त्या बैठकीची कार्यसूची तयार करण्यासाठी एका उप समितीची निर्मिती करण्यात आली होती. त्या उप समितीची बैठक दिनांक ३० ऑक्टोबर २००९ रोजी श्री. दिलीप तळेकर यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालयामध्ये संपन्न झाली. या बैठकीमध्ये २०० व्या मासिक वैठकीची कार्यसूची तयार करण्यात आली.

**इ) छाननी समितीची बैठक :-**

महाविद्यालयामध्ये आयोजण्यात येणा-या विधी साक्षरता कार्यशाळेबाबत किंवा त्या कार्यशाळेमध्ये शिकविण्यात आलेल्या कायद्यासंबंधी विद्यार्थ्यांना निबंध लिहिता येतात. दिनांक ११ ऑक्टोबर २००९ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयामध्ये झालेल्या कार्यक्रमाबाबत त्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या निबंधाची छाननी करण्यासाठी उप समितीची बैठक दिनांक १३ नोव्हेंबर २००९ मध्ये ग्रंथालयामध्ये श्री. डी. आर. तळेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीला ३ सदस्य उपस्थित होते. बैठकीमध्ये सर्व निबंध तपासण्यात येऊन बक्षिसांची शिफारस करण्यात आली.

**४.३ - कायदेविषयक सल्ला केंद्र :-**

गोरगरीब व सामान्य लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० च्या नंतर प्रतिष्ठानच्या ग्रंथालयामध्ये कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र चालविले जाते. गेल्या आर्थिक वर्षामध्ये या केंद्राच्या ४६ बैठका झाल्या. अंदाजे २३८ लोकांनी या केंद्रामध्ये येऊन मोफत सल्ल्याचा लाभ घेतला आहे. या केंद्राचे काम सर्वश्री म. बा. पवार, भूपेश सामंत, दिलीप तळेकर, प्रकाश देशमुख व निलेश पावसकर या वकिलांनी पाहिले.

**४.४ - मोफत समुपदेशन व तडजोड केंद्र :-**

दर मंगळवारी सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळांत समुपदेशन व समेट केंद्राचे आयोजन केले जाते. दोन वादग्रस्त पक्षकारांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न या केंद्रामध्ये केला जातो. या कामाला गती देण्यासाठी विशेष प्रयत्न चालू आहेत.

**४.५ - आपल्या कायद्याची माहिती करुन घ्या (Know your Law Lecture Series) :-**

या व्याख्यानमाले अंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यांतून एकदा कायदे पंडितांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. सध्या इमारतींचे पुनर्विकास व माहितीचा अधिकार या कायद्यावर व्याख्याने आयोजित करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

**४.६ - वकीलांची व्यावसायिक नीतीमत्ता या विषयावर चर्चासत्र :-**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम यांच्याकडून विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबविले जातात. त्यापैकी वकीलांच्या व्यावसायिक नीतिमत्ता (Professional Ethics of Lawyers) याबाबत जाणीव करुन देण्यासाठी चर्चासत्राचे आयोजन केले जाते. विधी शाखेतील विद्यार्थ्यांना याचा चांगला उपयोग होतो. सध्या फोरम व न्यू विधी महाविद्यालय, माहिम येथे अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

**४.७ - विधी साक्षरता कार्यशाळा :-**

लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधीत असलेल्या कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळया घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ - पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सदस्य, सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त, सार्वजनिक संस्थांचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गेल्या आर्थिक वर्षामध्ये अशा प्रकारच्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्या कार्यक्रमांचा तपशिल खाली दर्शविल्याप्रमाणे आहे.

७.१) फोरम व राजश्री शाहू महाराज सहकारी संस्था, चेंबूर यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले नगर, चेंबूर येथे स्त्री - पुरुषांसाठी दिनांक १२ एप्रिल २००९ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विविध सामाजिक कायद्यांवर एकूण ८ व्याख्याने झाली. व्याख्यानांचे माध्यम मराठी होते. १०० पेक्षा जास्त स्त्री-पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते.

७.२) फोरम, फेस्कॉम व प्रतिष्ठानच्या माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने चव्हाण केंद्रामध्ये दिनांक ३ मे २००९ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ३ वाजेपर्यंत) ज्येष्ठ नागरिकांसाठी माहिती व तंत्रज्ञान साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला अंदाजे २८ ज्येष्ठ नागरिक (स्त्री - पुरुष) उपस्थित होते. कार्यक्रमाचे माध्यम इंग्रजी व मराठी होते. कार्यक्रमामध्ये ८ प्रकारची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. शरद काळे हे होते. श्री. विक्रम वासुदेव, श्री. धनसिंग, श्री. धीरज सिंग व कुमारी तृप्ती जाधव या शिक्षकांनी कार्यक्रमात भाग घेतला.

७.३) फोरम व प्रतिज्ञा महिला मंडळ, भांडूप यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २ ऑगस्ट २००९ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत) अयप्पा मंदिर सभागृह, भांडूप (पश्चिम), मुंबई येथे महिला व पुरुषांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष कार्यशाळेमध्ये उपस्थित होते. विविध सामाजिक कायद्यांसंबंधी माहिती देण्यात आली. एकूण ६ व्याख्याने झाली. व्याख्यानांचे माध्यम मराठी होते. श्रीमती विद्या शिंदे ह्या समारंभाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

७.४) फोरम व ज्येष्ठ नागरिक सेवा संघ, गोवंडी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शिवशक्ती केंद्र सभागृह, देवनार म्युनिसिपल कॉलनी, गोवंडी येथे दिनांक ९ ऑगस्ट २००९ रोजी (सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत) अर्ध्या दिवसासाठी ज्येष्ठ नागरिकांसाठी एका विधी साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्री. दत्तात्रय श्रीरामे हे समारंभाचे अध्यक्ष होते. सामाजिक व मिळकती संबंधीच्या कायद्यांसंबंधी माहिती करुन देण्यात आली. १०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिक (महिला व पुरुष) कार्यशाळेमध्ये उपस्थित होते. एकूण सहा व्याख्याने झाली. व्याख्यानांचे माध्यम मराठी व हिंदी होते.

७.५) फोरम व कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने त्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या सभागृहामध्ये दिनांक ११ ऑक्टोबर २००९ रोजी संपूर्ण दिवसासाठी (सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) विधी साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी (मुले व मुली) कार्यशाळेमध्ये उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या संबंधीत कायद्यावावत एकूण सात व्याख्याने झाली. व्याख्यानांचे माध्यम मराठी होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी उप-प्राचार्य श्री. के. जी. तपासे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुंवई उच्च न्यायालयाचे विद्यमान न्यायाधीश श्री. एस. राधाकृष्णन हे उपस्थित होते.

७.६) फोरम व रोटरी क्लव ऑफ डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ नोव्हेंवर २००९ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) ज्येष्ठ नागरिकांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक व मिळकती संबंधीच्या कायद्यासंबंधी सात व्याख्याने झाली. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते. २०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिक (स्त्री व पुरुष) कार्यक्रमामध्ये उपस्थित होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी श्री. माधव चिकली हे होते आणि श्री. विवेक वडबाळकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

७.७) फोरम व वीर वजेकर महाविद्यालय, फुंडे, उरण, जिल्हा रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने त्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या सभागृहामध्ये दिनांक २२ नोव्हेंवर २००९ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांसाठी असलेल्या कायद्यासंबंधी सात व्याख्याने झाली. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी त्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. वावधनकर हे होते. मुंबई उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायाधीश मा. श्रीमती रंजना देसाई हया प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. रायगड जिल्हयाचे जिल्हा न्यायाधीश श्री. अरविंद काळे हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.

७.८) फोरम व उरण महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, उरण यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती सभागृह उरण, जिल्हा रायगड येथे महिलांसाठी दिनांक १४ फेब्रुवारी २०१० रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. २०० पेक्षा जास्त महिला कार्यशाळेमध्ये उपस्थित होत्या. महिला संबंधीच्या कायद्यासंबंधी सात व्याख्याने झाली. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती विभा पाडगांवकर हया होत्या.

७.९ ) **शपथ कार्यक्रम** :- सर्व विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे सांघिक वाचन करण्यात आले. तसेच संविधानातील मूलभूत कर्तव्यपालनासंबंधी शपथा घेण्यात आल्या. त्याचप्रमाणे अविवाहित मुले व मुली यांच्याकडून हुंडाबंदीसंबंधी शपथा घेण्यात आल्या.

४.८ - **निबंधांना बक्षिसे** :- विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये भाग घेणा-या विद्यार्थ्यांसाठी फोरमची एक खास योजना आहे. त्या योजनेनुसार झालेल्या कार्यशाळेबाबत अथवा कार्यशाळेत शिकविण्यात आलेल्या एका किंवा अनेक विषयाबावत विद्यार्थ्यांना निवंध लिहिता येतात व त्या निबंधाच्या गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या स्वरुपात बक्षिसे दिली जातात. दिनांक ११ ऑक्टोवर २००९ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, वाशी येथे झालेल्या कार्यशाळेत त्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या निबंधाना पुस्तकाच्या स्वरुपात वक्षिसे देण्यात आली.

४.९ - **कार्यशाळेमध्ये शिकविलेले कायदे** :- विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती करुन देण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश होता. (१) भारतीय संविधान, (२) विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७, (३) हुंडावंदी अधिनियम १९६१, (४) भारतीय दंड संहिता १८६० (५) ग्राहक संरक्षण कायदा १९८६, (६) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (७) हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ व इच्छा पत्र कायदा, (८) गुंतवणूकीसंबंधीचे नियम, (९) कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५, (१०) माहितीचा अधिकार कायदा २००५, (११) हिंदू विवाह

कायदा १९५५, (१२) मुस्लीम कायदा, (१३) पोटगी संबंधीचे कायदे, (१४) महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३, (१५) हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६, (१६) हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम १९५६, (१७) संपत्ती हस्तांतरण अधिनियम १८८२, (१८) विशेष विवाह अधिनियम १९५४, (१९) बाल विवाह बंदी अधिनियम २००५, (२०) महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम १९८८, (२१) न्यायालयांची बहुस्तरीय व्यवस्था (तालुका न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतची माहिती), (२२) स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिबंध) अधिनियम १९८६, (२३) विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५, The Persons with Disabilities (Equal opportunities, Protection of Rights and Full Participation) Act, 1995 (२४) स्वमग्न असलेल्या, मस्तिष्क घात झालेल्या, मतिमंद व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९, (The National Trust for Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act, 1999) (२५) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (The Immoral Traffic (Prevention) Act, 1956 (२६) राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१, (२७) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, (२८) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॉपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७, (२९) महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९, (३०) महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणा-या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२, (३१) मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध), (३२) मुस्लिम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम १९८६, (३३) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्रविकास) अधिनियम १९७१, (३४) भारतीय वारसा हक्क कायदा १९२५, (३५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, (३६) मुंबई मुद्रांक कायदा १९५८, (३७) गृहनिर्माण संस्थांचे विनियम, (३८) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९, (३९) मुस्लिम व्यक्ती विषयक विधी (शरियत) प्रयुक्ती अधिनियम १९३७, (४०) नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, (४१) भारतीय मुद्रांक कायदा १८९९, (४२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, (४३) प्रसूती विषयक लाभ अधिनियम १९६१, (४४) सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०, (४५) अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, (४६) मोटर वाहन अधिनियम १९८८, (४७) जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९, (४८) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, (४९) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९, (५०) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, (५१) माता पिता व ज्येष्ठ नागरिक यांची पोटगी व कल्याण अधिनियम २००७, (५२) मुंबई पोलीस अधिनियम, १९५०.

**४.१० - कार्यशाळेमध्ये व्याख्यान दिलेले व्याख्याते :-** विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये व्याख्यान देण्यासाठी फोरमने वकीलांचा संच (Faculty) बनविला आहे. वरील कार्यशाळेमध्ये या फॅकल्टीमधील खालील वक्त्यांनी विविध विषयांवर व्याख्याने दिली.

(१) ॲड. म. बा. पवार, (२) श्री. प्रमोद ढोकळे, (३) ॲड. निलेश पावसकर, (४) ॲड. हेमंत केंजाळकर, (५) श्री. दिलीप तळेकर, (६) ॲड. अजय केतकर, (७) ॲड. भूपेश सामंत, (८) प्रि. नारायण राजाध्यक्ष, (९) प्रा. डॉ. जे. वी. पाटील, (१०) ॲड. डॉ. प्रकाश देशमुख.

**४.११ - संशोधनाचे काम :-** वर सांगितल्याप्रमाणे फोरमतर्फे विधी संशोधनाचे कामसुध्दा केले जाते. महाराष्ट्र हुंडाबंदी नियम २००३ यामध्ये सुधारणा सूचविण्यासाठी संशोधन पूर्ण झाले असून, त्याबाबतचा अहवाल महाराष्ट्र शासनाला पाठविण्यात आला आहे.

**४.१२ - आगामी कार्यक्रम :-** राज्यातील पोलीस अधिका-यांसाठी खास विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यासंबंधी प्रस्ताव विचाराधीन आहे.

## ९.५ रंगस्वर - सांस्कृतिक विभाग :-

प्रतिष्ठानच्या रंगस्वरतर्फे नाटय, चित्रपट, गायन आदि कार्यक्रम होतात. रंगस्वरची वार्षिक वर्गणी पती पत्नीसाठी रु. २०००/-, वैयक्तिक रु. १२००/-, अपंगासाठी रु. ५००/- भरुन रंगस्वरचे सभासद होता येते. रंगस्वरच्या सदस्यांना तसेच प्रतिष्ठानच्या आजीव सदस्यांनाही कार्यक्रमाचा आस्वाद घेता येतो. सांस्कृतिक विभागासाठी सरचिटणीस श्री. शरद काळे, कोषाध्यक्ष डॉ. रवींद्र बापट यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येते. श्री. विजय देसाई, व्यवस्थापक, सभागृह, श्री. विद्याधर खंडे आणि रंगमंचाचे सर्व कर्मचारी सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील असतात.

## ९.६ सृजन :-

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर विभागातर्फे शालेय विद्यार्थ्यांच्या विकासाकरिता सृजन हा अभिनव उपक्रम चालविण्यात येतो. सृजनच्या माध्यमातून समाजातील मान्यवर व्यक्तींच्या सर्जनशीलतेचा आविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्त कलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

सृजनची संकल्पना आणि संयोजन खा. सौ. सुप्रियाताई सुळे यांची असून यामध्ये सन्मानीय सल्लागार म्हणून सुप्रसिध्द चित्रकार श्री. डग्लस जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग हे काम पहातात. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी सृजन कार्यशाळा ९.०० वाजता चव्हाण सेंटरमध्ये आयोजित करण्यात येते. श्री. विद्याधर खंडे त्यांना सहाय्य करतात. सृजन द्वारा मुलांसाठी घेण्यात आलेले कार्यक्रम पुढीलप्रमाणे :-

| दिनांक | विषय | प्रशिक्षक |
|---|---|---|
| दि. ६ सप्टेंबर २००९ | मातीकाम | श्री. अमरजित सिंग<br>श्री. कु. स. अहिरे |
| दि. ४ ऑक्टोबर २००९ | जाहिरात | श्री. विवेक प्रभुकेळुस्कर |
| दि. १ नोव्हेंबर २००९ | ॲनिमेशन | श्री. समीर कुळाकर |
| दि. ६ डिसेंबर २००९ | सन २००९ कार्यक्रमांची सांगता पार्टी | |
| दि. १ जानेवारी २०१० | मुलांचे समुपदेशन<br>अभ्यास कसा करावा, ताणतणाव दूर कसा करावा | श्री. अरुण नाईक |
| दि. ४ फेब्रुवारी २०१० | टाकाऊ वस्तूपासून वस्तू बनविणे | श्री. विवेक टेटविलकर |

## ९.७ शिक्षण विकास मंच :-

सर्व मुला-मुलींना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे या उद्देशाने गेली ३ वर्षे शिक्षण विकास मंच कार्य करत आहे. शिक्षण विकास मंचाने आतापर्यंत अनेक परिषदा, कार्यशाळा आणि चर्चासत्रे आयोजित केली आहेत. खा. सौ. सुप्रिया सुळे या मंचाच्या निमंत्रक असून डॉ. कुमुद बन्सल या प्रमुख संयोजक म्हणून काम पहातात. डॉ. वसंत काळपांडे, विशेष सल्लागार तर श्री. दत्ता बाळसराफ हे संयोजक म्हणून काम पहातात. श्री. सुरेश पाटील सहसमन्वयक म्हणून मदत करतात.

**७.१ दि. १३ एप्रिल २००९ - शिक्षण विकास मंच नियोजन बैठक :-**

शिक्षण विकास मंचाच्या पुढील नियोजनासाठी दि. १३ एप्रिल २००९ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर येथे बैठक घेण्यात आली होती. या बैठकीमध्ये शिक्षण विकास मंचाच्या प्रमुख संयोजक डॉ. कुमुद बन्सल, सल्लागार डॉ. वसंत काळपांडे, संयोजक श्री. दत्ता बाळसराफ तसेच श्री. सुरेश पाटील हे हजर होते.

**७.२ दि. १८ जून २००९ : मराठवाडयातील प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता, औरंगाबाद येथील विभागीय कार्यशाळा -**

दि. ११ सप्टेंबर २००८ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्ता विकास कार्यक्रमावर एक कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत अनेक महत्वाच्या शिफारशी करण्यात आल्या असून त्या महाराष्ट्र शासनाला पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या. या कार्यशाळेत विषयनिहाय आणि विभागनिहाय काही कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात अशी ही शिफारस करण्यात आली होती. याचाच एक भाग म्हणून मराठवाडयातील प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता या विषयावर एक कार्यशाळा औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आली होती. ही कार्यशाळा गुरुवार दि. १८ जून २००९ रोजी पार पडली.

या कार्यशाळेसाठी स्वागत आणि प्रास्ताविक शिक्षण विकास मंचाच्या प्रमुख संयोजक डॉ. कुमुद बन्सल यांनी केले. निमंत्रक खा. सौ. सुप्रिया सुळे यांनी उद्घाटनपर भाषण केले. या कार्यशाळेचे अध्यक्ष ज्येष्ठ शिक्षण तज्ञ तसेच राज्याचे माजी शिक्षण संचालक, श्री. वि. वि. चिपळूणकर हे होते. या कार्यशाळेसाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांचे संचालक, मा. अ. मु. वेडगे हे होते. औरंगाबादचे विभागीय उपसंचालक श्री. चौहाण, आमदार श्री. सतीश चव्हाण, आमदार श्री. विक्रम काळे इ. प्रमुख मान्यवर या कार्यशाळेसाठी उपस्थित होते.

**७.३ दि. २३ जून २००९ : विदर्भातील प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता, नागपूर येथील विभागीय कार्यशाळा -**

१९५६ मध्ये जुन्या मध्यप्रांत व व-हाडमधून विदर्भ त्यावेळच्या मुंबई राज्यात आणि त्यानंतर १९६० मध्ये आजच्या महाराष्ट्र राज्यात आला. असे असले तरी विदर्भाचे इतर विभागांपेक्षा काही वेगळे प्रश्न आजही अस्तित्वात आहेत. या पार्श्वभूमीवर विदर्भातील प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी नागपूर येथे मंगळवार दि. २३ जून २००९ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेसाठीचे स्वागत आणि प्रास्ताविक प्रमुख संयोजक डॉ. कुमुद बन्सल यांनी केले. निमंत्रक खा. सौ. सुप्रिया सुळे यांनी उद्घाटनपर भाषण केले. या कार्यशाळेसाठी प्रमुख अतिथी म्हणून विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष श्री. गिरीष गांधी हे होते. राज्याचे माजी शिक्षण मंत्री श्री. वसंत पुरके यांनी यावेळी मोलाचे मार्गदर्शन केले. नागपूर विभागीय केंद्राचे शिक्षण उपसंचालक श्री. लक्ष्मीकांत पांडे, माजी शिक्षण संचालक श्री. देऊस्कर यांनीही यावेळी आपले विचार मांडले. सल्लागार डॉ. वसंत काळपांडे यांनी यावेळी आभार मानले. या कार्यशाळेसाठी २५० ते ३०० मान्यवर उपस्थित होते.

**७.४ दि. १२ सप्टेंबर २००९ - मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा हक्क कार्यशाळा :-**

स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षण मंत्री मौलाना अब्दुल कलाम आझाद यांचा ११ नोव्हेंबर हा जन्मदिवस. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या मंत्रिमंडळात सन १९४७ ते १९५८ या काळात मौलाना आझाद शिक्षण मंत्री होते. केंद्र शासनाने ११ नोव्हेंबर २००८ पासून हा दिवस 'राष्ट्रीय शिक्षण दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. याचाच एक भाग म्हणून शिक्षण विकास मंचने 'मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा हक्क' या विषयावर कार्यशाळा घेतली होती. त्याच्या पूर्वतयारीसाठी दि. १२ सप्टेंबर २००९ रोजी खा. सौ. सुप्रिया सुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली.

**७.५ दि. २ नोव्हेंबर २००९ - राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त परिषद :-**

शिक्षण विकास मंचाच्यावतीने दि. ११ नोव्हेंबर २००९ रोजी राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत राज्यातील एका उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथास पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. या शैक्षणिक ग्रंथाच्या निवड समितीची बैठक २ नोव्हेंबर २००९ रोजी डॉ. वसंत काळपांडे यांच्या अध्यक्षतेखाली निसर्ग कार्यालय, पुणे येथे सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यात आली होती.

**७.६ दि. ११ नोव्हेंबर २००९ : मुलांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ परिषदः-**

राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त चव्हाण सेंटर येथे वरील विषयावर राज्यस्तरीय परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे उद्‌घाटन राज्याचे शालेय शिक्षण मंत्री मा. बाळासाहेब थोरात यांनी केले. शालेय शिक्षण राज्यमंत्री मा. प्रा. फौजिया खान या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. खा. सौ. सुप्रिया सुळे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन ही परिषद आयोजित करण्यामागची पार्श्वभूमी विषद केली. हा कायदा म्हणजे केंद्र सरकारच्या दृष्टीने एक प्रगतीशील पाऊल असून याची व्याप्ती ० ते १८ वर्ष वयोगटापर्यंत वाढविण्याची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. प्रमुख संयोजक डॉ. कुमुद बन्सल यांनी प्रास्ताविक केले. देशाचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अब्दुल कलाम आझाद यांनी केलेल्या कामाचे महत्व समजून सांगितले. त्यांचे कार्य आणि महाराष्ट्रात मा. यशवंतराव चव्हाण यांनी केलेले कार्य यांच्या संदर्भात ही परिषद प्रतिष्ठानने घेणे कसे औचित्यपूर्ण आहे हे स्पष्ट केले. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक मा. नरेंद्र कवडे यांनी या कायद्याची ठळक वैशिष्टये समजावून सांगितली. मा. शालेय शिक्षण मंत्री, श्री. बाळासाहेब थोरात यांनी आपल्या उद्‌घाटनपर भाषणात प्रतिष्ठानने ही परिषद आयोजित केल्याबद्दल अभिनंदन केले. मा. फौजिया खान यांनी मौलाना अब्दुल कलाम आझाद यांचे कार्य आजही कसे महत्त्वपूर्ण आहे हे विषद केले. यानंतर विविध गटांमध्ये प्रमुख विषयांवर या कायद्यांतर्गत चर्चा करण्यात आली. दुपारच्या सत्रात मा. फौजिया खान यांच्या हस्ते राज्यात उत्कृष्ट कार्य करणा-या ग्राम शिक्षण समित्यांचे अध्यक्ष आणि सचिव यांचा सत्कार करुन त्यांना गौरव पत्रे प्रदान करण्यात आली. याच कार्यक्रमात 'शिक्षण प्रवाहाच्या उगमापाशी' या उत्कृष्ट शिक्षणविषयक ग्रंथाचा गौरव करण्यात आला. पुस्तकाच्या लेखिका श्रीमती सुचिता पडवळकर आणि पुस्तकाचे प्रकाशक श्री. अरविंद पाटकर, मनोविकास प्रकाशन, पुणे यांना गौरव पत्रे देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. दत्ता बाळसराफ यांनी केले. डॉ. वसंत काळपांडे यांनी सर्वांचे आभार मानले.

**७.७ दि. १० डिसेंबर २००९ : आढावा बैठक :-**

शिक्षण विकास मंचाच्यावतीने दि. १० डिसेंबर २००९ रोजी डॉ. कुमुद बन्सल यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली होती. या बैठकीसाठी सल्लागार डॉ. वसंत काळपांडे, मुंबई विभागाच्या माजी शिक्षण सचिव श्रीमती वसंती रॉय उपस्थित होत्या.

**७.८ दि. ७ जानेवारी २०१० : सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता कार्यशाळा :-**

जिल्हा परिषद पुणे शालेय शिक्षण विभाग आणि शिक्षण विकास मंच यांच्यावतीने सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता कार्यशाळा आयोजित करणेबाबत आर.सी.एम. गुजराती शाळा, रास्तापेठ, पुणे येथे डॉ. वसंत काळपांडे यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. पुणे विभागाचे उपसंचालक श्री. मगर, शिक्षणाधिकारी श्री. दत्तात्रय शेंडकर इ. उपस्थित होते.

**७.९ दि. १९ जानेवारी २०१० : सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यशाळा :-**

जिल्हा परिषद पुणे, शालेय शिक्षण विभाग आणि शिक्षण विकास मंच यांच्या विद्यमाने सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ही कार्यशाळा आर.सी.एम. गुजराती हायस्कूल, रास्तापेठ, पुणे येथे सकाळी

११.०० ते सायं. ६.०० यावेळेत पार पडली. या कार्यशाळेसाठी खा. सौ. सुप्रिया सुळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजीवकुमार गुप्ता, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा श्रीमती संगिता दगडे, उपाध्यक्ष श्री. अरुण गिरे, डॉ. वसंत काळपांडे, उपसंचालक, श्री. मगर, श्री. परब तसेच शिक्षणाधिकारी श्री. दत्तात्रय शेंडकर इ. प्रमुख मान्यवर उपस्थित होते. या कार्यशाळेत शिक्षक आणि अधिकारी यांची कार्यप्रेरणा, अध्ययन, अध्यापन प्रक्रिया, शिक्षक प्रशिक्षण, विषयनिहाय अध्यापन, केंद्र प्रमुखांची कर्तव्ये, शाळांच्या तपासण्या इ. प्रमुख विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. संजीवकुमार गुप्ता यांनी पुणे जिल्हयात घेण्यात आलेल्या चावडी वाचनाच्या कार्यक्रमाबद्दल सविस्तर माहिती दिली. या कार्यशाळेसाठी शिक्षक, अधिकारी, पालक, कार्यकर्ते इ. मोठया प्रमाणावर उपस्थित होते.

**७.१० दि. १ फेब्रुवारी २०१० - शाळा नियोजन समिती चर्चासत्र :-**

भारतीय शिक्षण संस्था पुणे आणि साधना परिवार यांच्यावतीने दि. १ फेब्रुवारी २०१० रोजी सकाळी १०.०० ते सायं. ५.०० यावेळेत शाळा नियोजन समिती प्रारुप तयार करण्यासाठी चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यासाठी राज्यभरातून शिक्षण विषयक क्षेत्रात काम करणा-या संस्था, प्रतिनिधी, कार्यकर्ते उपस्थित होते. विभागीय केंद्र पुण्याचे अध्यक्ष डॉ. राम ताकवले हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तर डॉ. वसंत काळपांडे प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते. तसेच मंचाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**७.११ दि. २३ मार्च २०१० : मुरटी व भूतोंडे केंद्रातील प्रमुख शाळांना भेटी :-**

जिल्हा परिषद पुणे आणि शिक्षण विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने बारामती (मुरटी), भोर (भुतोंडे) या केंद्र शाळेच्या अखत्यारीतील एकूण २१ शाळांमध्ये विस्तार सेवा हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. यासाठी मुरटी केंद्रातील प्रमुख शाळांना भेटी देण्यात आल्या. यावेळी डॉ. वसंत काळपांडे, श्रीमती बसंती रॉय, श्री. दत्ता बाळसराफ, श्री. सुरेश पाटल आणि श्री. अमेय जगताप उपस्थित होते.

**७.१२ दि. ३१ मार्च २०१० : मंचाच्या पुढील वर्षातील कार्यक्रमाची नियोजन बैठक :-**

शिक्षण विकास मंचाच्या पुढील वर्षातील कार्यक्रमाच्या नियोजनासाठी तसेच पार पडलेल्या कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी निमंत्रक खा. सौ. सुप्रिया सुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत यशवंतराव चव्हाण सेंटर येथे बैठक पार पडली. या बैठकीसाठी प्रमुख संयोजक डॉ. कुमुद बन्सल, डॉ. वसंत काळपांडे, श्रीमती बसंती रॉय, संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, श्री. सुरेश पाटील इ. उपस्थित होते.

## ९.८ अपंग हक्क विकास मंच :-

अपंग हक्क विकास मंचाच्या संयोजक खा. सौ. सुप्रिया सुळे या असून समन्वयक म्हणून श्री. विजय कान्हेकर व श्री. दत्ता बाळसराफ हे काम पाहतात.

८.१ दि. १२ एप्रिल २००९ रोजी अपंग कल्याणकारी संस्था आणि युवा विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विराटनगर मैदान, विरार, तालुका वसई, जिल्हा ठाणे येथे अस्थिव्यंग अपंग व्यक्तींच्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सदर क्रिकेट स्पर्धेत एकूण आठ अपंग क्रिकेट संघांनी भाग घेतला. स्पर्धेत अपंग कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष श्री. शमीम खान व युवा विकास मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. सिध्दार्थ ठाकूर तसेच अपंग हक्क विकास मंचाचे श्री. अनिल चाळके यांच्या उपस्थितीत बक्षिस वितरण समारंभ पार पडला.

८.२ दि. १८ जून २००९ रोजी जिल्हा अपंग पुर्नवसन केंद्र, घाटी, औरंगाबाद येथे अपंग हक्क विकास मंचाच्या संयोजक खा. सौ. सुप्रिया सुळे यांचे हस्ते जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विजय वाघमारे, विभागीय केंद्राचे पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत अपंग लाभार्थींना तीन चाकी सायकल, जयपूर फूट, कुबडया, श्रवणयंत्र आदि साहित्य वाटप करण्यात आले.

८.३ दि. २३ जून २००९ नागपूर येथे अपंग हक्क विकास मंचाच्या संयोजक खा. सौ. सुप्रिया सुळे यांचे हस्ते आणि विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. श्री. गिरीष गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत एकूण दहा अपंग लाभार्थींना तीन चाकी सायकलीचे वाटप करण्यात आले.

८.४ दि. ४ व ५ जानेवारी २०१० रोजी विशेष सामर्थ्य सक्षमीकरण कार्यशाळेचे आयोजन मुख्य सभागृह, यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे करण्यात आले. अपंग व्यक्तींसाठी कायदा समान संधी, हक्काचे संरक्षण, संपूर्ण सहभाग, अधिनियम १९९५ दृष्टिक्षेपात ठेऊन कार्यशाळेत कायद्यातील तरतुदीनुसार अनुक्रमे, १) प्रतिबंधात्मक उपाय व वैद्यकीय पुर्नवसन २) शीघ्र तपासणी मार्गदर्शन व शालेय शिक्षण ३) अपंगांना उच्च व तंत्र शिक्षणात संधी ४) अपंगांना रोजगार व स्वयं रोजगारात संधी ५) अपंगांचे सामाजिक, आर्थिक पुनर्वसन ६) अपंगांना सार्वजनिक ठिकाणी मुक्त संचार या प्रमुख विषयांवर सादरीकरण व चर्चासत्रे झाली. या चर्चासत्रामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून संबंधित विषयांचे तज्ज्ञ, शासकीय प्रतिनिधी, अपंग व्यक्ती, स्वयंसेवी संस्था यांचा प्रमुख सहभाग होता. या वेळी मा. श्री. सचिन अहिर, राज्यमंत्री, सामाजिक न्याय, महाराष्ट्र राज्य यांनी अपंगांच्या विविध योजना राबविण्यास माझी आग्रही भूमिका असून अपंगांसाठी शासनाच्या वतीने विशेष संकुल प्रत्येक विभागात उभे करण्याचे आश्वासन दिले.

८.५ दि. २८, २९, ३० जानेवारी २०१० रोजी अंध विद्यालय, श्रध्दानंद पेठ, नागपूर येथे सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कृत्रिम अवयव तपासणी शिबीराचे आयोजन समाज कल्याण विभाग, नागपूर आणि भारतीय कृत्रिम अपंग निर्माण निगम, जबलपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले. एकूण ४०० अपंग मुला मुलींनी या शिबीराचा लाभ घेतला. अपंग हक्क विकास मंचतर्फे मंचाचे संघटक श्री. अभिजित राऊत यांनी या शिवीराचे नियोजन केले.

८.६ दि. २३ मार्च २०१० रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत उल्हासनगर येथे जिल्हा शासकीय रुग्णालय, उल्हासनगर, जिल्हा ठाणे येथे आरोग्य सेवा संचलनालय, उल्हासनगर जिल्हा शासकीय रुग्णालय आणि अपंग हक्क विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने कृत्रिम अवयव तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरात एकूण १०९ व्यक्तींनी (अपंग व त्यांचे मदतनीस) सहभाग नोंदविला. त्यातील एकूण ३९ अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव तर एकूण ३ अपंग व्यक्तींना ट्रायसायकलसाठी निवड करण्यात आली. अपंग हक्क विकास मंचातर्फे मंचाचे श्री. शंकर साळवे यांनी शिबीराचे नियोजन केले.

८.७ दि. २६ मार्च २०१० रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत मु. पो. आगरवाडी स्टेशन, सफाळे, तालुका पालघर, जिल्हा ठाणे येथे आरोग्य सेवा संचलनालय, विठ्ठल सायन्ना जिल्हा शासकीय रुग्णालय आणि अपंग हक्क विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने अपंग वैद्यकीय व कृत्रिम अवयव तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरात एकूण १५० व्यक्तींनी (अपंग व त्यांचे मदतनीस) सहभाग नोंदविला. त्यातील एकूण ४५ अपंग व्यक्तींना अपंगत्व प्रमाणपत्रासाठी तर एकूण २० अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयवासाठी निवड करण्यात आली. विठ्ठल सायन्ना जिल्हा शासकीय रुग्णालयातील डॉ. साळवे यांनी अपंगांना अपंगत्व प्रमाणपत्रासंबंधित अपंगांची वैद्यकीय तपासणी केली. तसेच श्री. राजेश उज्जेनकर आणि श्री. नसीम खान यांनी कृत्रिम अवयवासाठी अपंग व्यक्तींची तपासणी केली. कार्यक्रमाअंती अपंग हक्क विकास मंचचे श्री. शमीम खान यांनी उपस्थित अपंग व्यक्तींना अपंगांचे बचतगट तर श्री. अनिल चाळके यांनी शासकीय योजना अशा विषयांवर मार्गदर्शन केले. तसेच उपस्थित सर्व अपंग व्यक्तींशी मनमोकळेपणाने चर्चा करुन त्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली.

## ९.९ वसुंधरा कक्ष (पर्यावरण संवर्धन अभियान) :-

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईतर्फे वसुंधरा कक्ष (पर्यावरण संवर्धन अभियान) सुरु करण्यात आला आहे. या कक्षाच्या निमंत्रक खा. सौ. सुप्रिया सुळे आहेत. तसेच सल्लागार म्हणून श्री. सदा डुंबरे तर संयोजक श्री. दत्ता बाळसराफ काम पाहतात. सहसमन्वयक म्हणून सर्वश्री प्रशांत शिंदे, अमेय जगताप, सुरेश पाटील हे काम पाहतात.

वसुंधरा कक्षामार्फत (पर्यावरण संवर्धन अभियानातर्फे) महाराष्ट्रातील पर्यावरणीय प्रश्नांचा अभ्यास करणे, पर्यावरणीय प्रश्नांवर कार्यरत संस्था, संघटना व्यक्तींबरोबर समन्वय साधणे, शासकीय योजना आणि धोरणांची अंमलबजावणी आणि योग्य ते बदल सूचविण्यासाठी शासकीय यंत्रणेबरोबर समन्वयक साधणे, पर्यावरणीय प्रश्नांविषयी जाणीव - जागृती करणा-या कार्यक्रमांचे आणि प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन करणे इ. कामे या अभियानातर्फे केली जातात. हवामान बदलाविषयक राज्यस्तरीय कार्यशाळा आणि परिषदेच्या यशस्वी आयोजनाने या कामाची सुरुवात झाली आहे.

### ९.१ हवामान बदलाविषयक राज्यस्तरीय कार्यशाळा आणि परिषद :-

बदलत्या हवामानाची आणि त्यामुळे होणा-या परिणामांची चिंता संपूर्ण जगाला लागून राहिली आहे. गावाकडील पिक-पाण्याचे आणि पूर-दुष्काळाचा संबंध जगातील बदलत्या हवामानाशी जोडला जात आहे. जागतिक तापमानवाढीला कारणीभूत कार्बन-मिथेन आदी वायूंच्या उत्सर्जनाचे प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी विकसित आणि विकसनशील देशांमध्ये संयुक्त परिषदा-चर्चा-वादविवाद-राजकारण सुरु आहे. पर्यावरणाला कमीत कमी हानी पोहोचवून जास्तीत जास्त मानवी प्रगती साधण्याच्या उपाययोजनांचा पुरस्कार केला जात आहे. आपल्या गावातील पारावर आणि पुण्या-मुंबईच्या नाक्यांवर क्लायमेट चेंज, ग्लोबल वॉर्मिंग, कार्बन क्रेडिट, कार्बन फुटप्रिंट, ग्रीन टेक्नॉलॉजी अशा शब्दांवर चर्चा घडत आहेत. या सर्व मुद्दांना अनुसरुन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने ६ फेब्रुवारी २०१० रोजी मुंबई येथे महाराष्ट्रातील निवडक संस्था, संघटना, प्रतिनिधी, कार्यकर्ते यांची एक दिवसाची कार्यशाळा आयोजित केली होती. त्याला राज्यभरातून १२० प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत दि. ६ मार्च रोजी घेण्यात येणा-या 'हवामान बदलविषयक राज्यस्तरीय परिषदेबाबत' चर्चा करण्यात आली.

दि. ६ मार्च २०१० रोजी केंद्रिय पर्यावरण मंत्री मा. जयराम रमेश, राज्याचे मुख्यमंत्री मा. अशोक चव्हाण, वन मंत्री मा. पतंगराव कदम, ग्रामविकास मंत्री मा. जयंत पाटील, कृष्णा खोरे विकास मंत्री मा. रामराजे निंबाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यस्तरीय हवामान बदलविषयक परिषद घेण्यात आली. या परिषदेचे स्वागत खा. सौ. सुप्रिया सुळ यांनी केले. तर प्रास्ताविक मा. सदा डुंबरे यांनी केले. जैवविविधता, पाणी, शेती, शहरीकरण, हवामानबदल विषयक लोकशिक्षण व जनजागृती अशा पाच विषयांशी निघडित अभ्यासपूर्ण आणि कृतिशील विवेचनांची मांडणी या परिषदेत मा. माधव गाडगीळ, मा. तारक काटे, मा. वंदना चव्हाण, मा. विजय परांजपे आणि मा. अभिजित घोरपडे यांनी केली. त्यासाठी सलग दोन महिने महाराष्ट्रातील पर्यावरण आणि उपजिविकेच्या प्रश्नांवर कार्यरत गट चर्चा विमर्ष करीत होते. त्यांनी चालविलेल्या या विचार मंथनातून एक कच्च्या आराखडा या परिषदेत सादर केला.

**९.२ ग्रामविकास मंत्री, मा. जयंत पाटील यांच्याबरोबर बैठक :-** ग्रामविकास खात्यातर्फे तयार करण्यात आलेल्या इको-व्हिलेज या योजनेतील पर्यावरणीय मुद्यांवर चर्चा करण्यासाठी ग्रामविकास मंत्री, मा. जयंत पाटील यांच्याबरोबर एक बैठक झाली. इको-व्हिलेज योजनेमध्ये समाविष्ट करता येतील अशा पर्यावरणस्नेही कार्यक्रमांची यादी यावेळी मंत्री महोदयांना सादर करण्यात आली. या बैठकीमध्ये वसुंधरा कक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

९.३ **हवामान बदल आणि महाराष्ट्र पुस्तकाचे संपादन :-** दिनांक ६ मार्च २०१० रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईतर्फे हवामान बदल आणि महाराष्ट्र या विषयावर परिषद झाली. या परिषदेत विविध प्रश्नांवर करण्यात आलेल्या सादरीकरणांचे आणि भाषणांचे संपादन करुन एक पुस्तक तयार करण्यात आले आहे. हवामान बदल या समस्येचा महाराष्ट्रातील परिस्थितीशी असलेला संबंध लक्षात घेऊन आखावयाच्या उपाययोजनांसाठी सदर पुस्तक म्हणजे एक संदर्भ दस्तावेज ठरु शकतो. या पुस्तकाच्या प्रती महाराष्ट्रात कार्यरत पर्यावरणवादी संस्था, संघटना, व्यक्ती, वृत्तपत्रे, महाराष्ट्र राज्याच्या संबंधित खात्यांचे मंत्री यांच्यापर्यंत पोहचविण्याचे ठरविले आहे. या पुस्तकांची इंग्रजी आवृत्तीसुध्दा तयार करण्यात येणार आहे.

९.४ **पर्यावरण शिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि सृष्टीज्ञान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जानेवारी २०१० ते मार्च २०१० दरम्यान सदर अभ्यासक्रम चालविण्यात आला. या अभ्यासक्रमात पर्यावरणातील महत्त्वाच्या विषयांशी निगडीत माहितीसंच पुरवले जातात आणि पर्यावरणीय महत्त्व असलेल्या स्थळांना भेट देऊन त्याचवेळी तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जाते. या अभ्यासक्रमांतर्गत जमीन, जंगल, पाणी, हवा, वन्यजीव, जैवविविधता, ऊर्जा, पर्यावरणविषयक कायदे, चळवळी इ. विषयांवर मराठी भाषेत माहिती उपलब्ध करुन दिली जाते.

९.५ **शहरीकरण आणि हवामान बदल यावरील राज्यस्तरीय परिषद :-** श्रीमती वंदनाताई चव्हाण यांच्या पुढाकाराने दि. ५ व ६ जून २०१० रोजी पुण्यामध्ये उपरोक्त विषयावर राज्यस्तरीय परिषद झाली. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तसेच इतर स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून ही परिषद घेण्यात आली. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींनी नगर नियोजन करताना हवामान बदलाची समस्या लक्षात घेऊन विकास आराखडयामध्ये पर्यावरण संवर्धनाला महत्त्व द्यावे हा संदेश देण्याचा प्रयत्न या परिषदेमधून करण्यात आला. या परिषदेत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईतर्फे श्री. सदा डुंबरे यांनी भूमिका मांडली. तसेच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईतर्फे संपादित केलेल्या 'हवामान बदल आणि महाराष्ट्र' या शीर्षकाच्या पुस्तकाचे प्रकाशन या परिषदेत करण्यात आले.

## १०. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची विभागीय केंद्रे :-

### १०.१ विभागीय केंद्र, पुणे :-

१.१ या केंद्राचे काम या कालावधीत विश्वस्त श्री. ज्ञानेश्वर बापू खैरे, श्री. अंकुश काकडे, माजी महापौर, पुणे आणि माजी महापौर श्री. शांतीलाल सुरतवाला यांनी पाहिले. मा. डॉ. राम ताकवले केंद्राचे अध्यक्ष म्हणून रुजू झाल्यापासून त्यांचे मार्गदर्शन घेतले जाते.

१.२ प्रतिवर्षाप्रमाणे वारीच्या पुणे मुक्कामात श्री. शांतीलाल सुरतवाला यांच्या संयोजनाने सकाळी ५ ते ९ या वेळेत वारक-यांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. डॉ. अस्मिता शेवाळे व प्रा. पंडित कार्यक्रमात उपस्थित होते. डॉ. शेवाळे यांनी औषधे वितरीत केली.

१.३ 'सकाळ बालमित्र प्रबोधिनी' यांचेमार्फत इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी पुणे महापालिकेच्या वसंतराव पाटील विद्यानिकेतनमध्ये चर्चासत्राचे आयोजन केले जाते, त्या धर्तीवर पुणे केंद्राचे मागील बैठकीत मा. श्री. ज्ञानेश्वर बापू खैरे यांनी सुचविल्यानुसार सदर शाळेच्या 'राज्य प्रज्ञा शोध' व 'राष्ट्रीय प्रज्ञा शोध' या परीक्षांसाठी तयार करण्यात येणा-या गरीब, होतकरु, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी श्री. भिडे यांनी शाळेच्या मुख्याध्यापिकेशी चर्चा करुन तयार केलेला प्रस्ताव मांडला होता. त्याला श्री. शांतिलाल सुरतवाला व श्री. अंकुशराव काकडे यांनी पाठिंबा दिल्यामुळे हा शिक्षण विषयक प्रकल्प हाती घेण्यात आला व श्री. भिडे यांनी तो पार पाडला.

१.४ 'नेचर वॉक' या संस्थेच्या वतीने भरविलेल्या प्रकाश चित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन खासदार सौ. सुप्रिया सुळे यांचे हस्ते झाले. त्यास केंद्राचे प्रा. पंडित उपस्थित होते. तेथे त्यांनी वनविभागाचे अधिका-यांशी झालेल्या चर्चेत सहभाग घेतला.

१.५ पर्वती चढणे - उतरणे स्पर्धा : दि. १४ नोव्हेंबर ०९ रोजी बालदिन - नेहरु जयंती निमित्त प्रतिवर्षीप्रमाणे वृध्दांसाठी पर्वती चढणे-उतरणे स्पर्धा आयोजित करण्यात आली. श्री. अंकुशराव काकडे व श्री. शांतिलाल सुरतवाला यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. स्पर्धेचे उद्घाटन मा. खासदार श्री. गोविंदराव आदिक यांचे हस्ते झाले. श्री. नारायणराव उमर्जी हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. डॉ. अस्मिता शेवाळे व प्रा. पंडित कार्यक्रमास उपस्थित होते. श्री. शांतिलाल सुरतवाला यांनी प्रत्यक्ष स्पर्धेत भाग घेतला. एकूण १५० पेक्षा अधिक स्पर्धकांनी स्पर्धेत भाग घेतला. स्पर्धेचा बक्षीस समारंभ १२ डिसेंबर ०९ रोजी साजरा करण्यात आला. या समारंभास मा. श्री. भाई वैद्य, अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. श्री. अंकुशराव काकडे यांनी स्वागतपर प्रास्ताविक केले. श्री. शांतिलाल सुरतवाला यांनी स्पर्धेची माहिती दिली. मा. शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते या वर्षीचा 'पर्वती भूषण पुरस्कार' श्री. नारायण उमर्जी यांना देण्यात आला.

**महिला व्यासपीठ :**

१.१ काळाच्या गतिमान ओघामध्ये बदलणा-या समाज व्यवस्थेमुळे स्त्रियांवर मानसिक, शारीरिक ताण वाढत चालला आहे. यासाठी अनेक महिला व महिला संस्था यांच्या सहकार्याने कार्यक्रम, उपक्रमाच्या माध्यमातून हा ताण कमी करण्यासाठी, स्वबळावर स्त्रियांनी समर्थ होण्यासाठी विभागीय केंद्र, पुणे महिला व्यासपीठाच्या अध्यक्षा श्रीमती शैला लिमये प्रयत्न करीत असतात. त्यात डॉ. अस्मिता शेवाळे यांची त्यांना मदत होत असते. मा. श्री. ज्ञानेश्वर बापू खैरे यांचे मार्गदर्शनाचा लाभ होतो. श्री. भिडे आणि प्रा. पंडित यांचा सहभाग असतो.

१.२ विभागीय केंद्र, पुणे महिला व्यासपीठ व माझी मैत्रीण चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने पोळया, पुरणपोळया, ठेपले यांचे प्रशिक्षण तसेच मार्केटिंग, ब्रँडींग यावर श्रीमती शैला लिमये व प्रा. पंडित यांनी मार्गदर्शन केले. तसेच नवीन बचत गट विकसित करण्यास व त्यांना 'स्पेन्सर' या मॉलमध्ये संधी देण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यात आले, त्याचा उपयोग झाला.

१.३ या कालावधीत एक कवी संमेलन आयोजित करण्यात आले. त्याचे डॉ. अस्मिता शेवाळे यांनी आयोजन केले.

१.४ 'बचतगट व्यवसायवृध्दी' या विषयावर श्री. भिडे यांनी सचिव, ग्रामीण विकास विभाग यांना व्यवसाय वृध्दीचे दृष्टीने श्री. ठाकरे यांच्या रेडीओवरील भाषणाचे अनुषंगाने काही शिफारशी केल्या.

१.५ श्रीमती शैला लिमये यांनी वाढत्या वैश्विक तपमानासंबंधी (ग्लोबल वॉर्मिंग) कार्यशाळेचे हुतात्मा राजगुरु शाळेत आयोजन केले. या कार्यशाळेस विद्यार्थी वर्ग, शिक्षण वृंद व मुख्याध्यापिका यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

१.६ व्यासपीठ व विद्यापीठ महिला संघटना (युवा) यांचा पर्यावरण विषयक विशेष कार्यक्रम झाला. श्रीमती शैला लिमये यांनी संयोजनात महत्वाची भूमिका बजावली. पुणे विद्यापीठ प्रभारी कुलगुरु उद्घाटक व प्रमुख पाहुणे होते. प्रा. पंडित यांनी एक विशेष निमंत्रित म्हणून मार्गदर्शनपर विचार मांडले.

**अन्य संस्थांशी सहयोग व संयुक्त कार्यक्रम :-**

१.१ भारतीय विद्यापीठाच्या सोशल सायन्स केंद्राच्यावतीने गेली ३ वर्षे प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना क्षेत्रीय कामकाजासाठी (फिल्ड वर्क) व्यासपीठास विनंती करण्यात येते. या कालावधीत ४ विद्यार्थी श्री. दादासाहेब रामजी गायकवाड, कु. रेश्मा वाल्मिक कांबळे, श्री. हनुमंत राजपूत व श्री. दादा गोसावी हे त्यांच्या वेळापत्रकाप्रमाणे आठवडयातून दोन दिवस विभागीय केंद्रात येतात. या वर्षात दि. ३१.७.०९ पासून मार्च अखेरपर्यंत विभागीय केंद्राने स्वयंसेवी संस्था व समाज विकास संचालनालयाशी त्यांचा संपर्क घडवून आणला. त्यांना 'महिला बालविकास योजना' तसेच 'सामाजिक न्याय व विशेष सहाय्य योजना', 'महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम' यासंबंधीची माहिती मिळवून दिली. विद्यार्थ्यांची एकूण १४ दिवस उपस्थिती होती.

या विद्यार्थ्यांच्या 'वनराई', 'पंडित जवाहरलाल नेहरु उद्योग केंद्र', ससून हॉस्पिटलमधील सेवाकार्य संस्था, आदिवासी विकास योजना, शिधावाटप योजना आदि ठिकाणच्या भेटी प्रा. पंडित यांनी घडवून आणल्या. शिधावाटप योजनेच्या एका शासकीय समितीच्या श्रीमती शैला लिमये सदस्या असल्याने त्यांनी या विद्यार्थ्यांना त्यासंबंधी मार्गदर्शन केले. यापैकी एक विद्यार्थी जुन्नरचा निवासी असल्याने त्यास तालुका पंचायत समितीकडील योजनांची माहिती सुट्टीत आणण्याचे मार्गदर्शन केले.

१.२ 'लोकसंवाद' या संस्थेबरोबर 'वाहतूक - एक गंभीर समस्या' या विषयावर संयुक्त कार्यक्रम पुणे केंद्राचेवतीने घेणेत आला. सदर कार्यक्रमाचे आयोजन श्री. शांतिलाल सुरतवाला व श्री. अंकुश काकडे यांनी केले. म. न. पा. स्थायी समिती अध्यक्ष श्री. निलेश निकम व ज्येष्ठ पत्रकार सुरेशचंद्र पाध्ये उपस्थित होते. मा. डॉ. बाबा आढाव, पुणे म. न. पा. वाहतूकचे कार्यकारी संचालक श्री. नितीन खाडे व स्थायी समितीचे अध्यक्ष श्री. निलेश निकम यांनी चर्चासत्रात मते मांडली. श्री. शांतिलाल सुरतवाला यांनी सूत्र संचालन केले.

१.३ यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य, संस्कृती / कला क्रीडा राज्यस्तरीय पारितोषिक २००९ श्रीमती किशोरी आमोणकर यांना देण्यात येणार याबद्दलचे मुख्यालयाचे निवेदन पुणे पत्रकार संघाचे द्वारा प्रसिध्दीस देणेत आले.

**१०.२ विभागीय केंद्र कराड :-**

**२.१ ग्रंथालय व्यवस्थापन अभ्यासक्रमाचे उद्घाटन - दि. २१.४.२००९ :-**

शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ निरंतर शिक्षण व विस्तारकार्य विभाग, कोल्हापूर व विभागीय केंद्र, कराडच्या संयुक्त विद्यमाने 'ग्रंथालय व्यवस्थापन' अभ्यासक्रमाच्या १३ व्या वर्गाचा उद्घाटन समारंभ मा. वी. एन. कालेकर, प्राचार्य, वेणुताई चव्हाण कला वाणिज्य महाविद्यालय, कराड यांच्या हस्ते सोमवार दि. २१ एप्रिल २००९ रोजी सकाळी ९.३० वाजता सौ. वेणुताई चव्हाण ग्रंथालय विभागात संपन्न झाला. या अभ्यासक्रमासाठी आतापर्यंत ३५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. त्यामध्ये पदव्युत्तर, पदवीधारक व ग्रंथालय क्षेत्रात काम करणा-या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे.

**२.२ जागतिक पुस्तक दिन - २३ एप्रिल २००९ :-**

विभागीय केंद्र कराड व सौ. वेणुताई चव्हाण संशोधन ग्रंथालयाच्या वतीने दि. २३.४.२००९ रोजी जागतिक पुस्तक दिनाचे आयोजन करण्यात आले यावेळी ग्रंथालय अभ्यासक्रम वर्गाचे विद्यार्थी - विद्यार्थीनी, सौ. वेणुताई चव्हाण संशोधन ग्रंथालयातील वाचक उपस्थित होते. आभार सौ. सुषमा कोळेकर यांनी मानले. यावेळी ट्रस्ट, प्रतिष्ठानचे सर्व सेवक, वाचक यांची बहुसंख्येने उपस्थिती होती.

**२.३ सौ. वेणुताई चव्हाण स्मृति दिन - १ जून २००९ :-**

मा. यशवंतरावजी चव्हाण यांची पत्नी सौ. वेणुताई यशवंतराव चव्हाण यांच्या २६ व्या पुण्यतिथी दिनानिमित्त सोमवार दि. १ जून २००९ रोजी सायंकाळी ६ वाजता सूरमणी सौ. माधवी नानल, मुंबई यांचा 'स्वररंग' हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास कराडकर रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. या प्रसंगी आ. श्री. बाळासाहेब पाटील, श्री. विलासराव पाटील - वाठारकर, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. सुनिल पवार इत्यादी विविध मान्यवरांची कार्यक्रमास उपस्थिती होती. केंद्राचे सचिव श्री. मोहनराव डकरे यांनी प्रास्ताविक व आभार मानले.

**२.४ मा. पी. सी. पाटील यांचे मार्गदर्शन - दि. १३.६.२००९ :-**

विभागीय केंद्र, कराडच्या 'ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम' वर्गातील विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यशाळा दि. १३.६.२००९ रोजी सकाळी ९ वाजता संपन्न झाली. विद्यार्थ्यांना ग्रंथालयाविषयी जास्तीत जास्त आवड निर्माण

व्हावी, ग्रंथालय चळवळ जास्तीत जास्त वृध्दिंगत व्हावी व नवग्रंथपालाना ग्रंथालयाविषयी 'लायब्ररी ट्रेनिंग सर्टिफिकेट कोर्स' विषयी अधिकाधिक मार्गदर्शन व्हावे या भावनेने केंद्राने या कार्यशाळेचे आयोजन केले. न्यु कॉलेज कोल्हापूरचे ग्रंथपाल श्री. पी. सी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी केंद्राच्या प्रतिनिधींची व सेवकांची प्रमुख उपस्थिती होती. आभार सौ. सुषमा कोळेकर यांनी मानले.

२.५ अ) **ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम सहल - २३ जून २००९ :-**

प्रौढ निरंतर शिक्षण व विस्तारकार्य विभाग शिवाजी विद्यापीठ अंतर्गत व विभागीय केंद्र कराड द्वारा संचलित 'ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम' वर्गाची शैक्षणिक सहल शिवाजी विद्यापीठ, महाविद्यालयीन ग्रंथालय व सार्वजनिक ग्रंथालय अभ्यास सहल दि. २३.६.२००९ रोजी आयोजित केली होती. या अभ्यास सहलीत ग्रंथालय वर्गाच्या ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सोवत सर्व अध्यापक शिक्षक उपस्थित होते.

ब) **क्षेत्र सिध्दगिरी मठास भेट :-**

कोल्हापूरच्या दक्षिणेला ८ किलोमीटर अंतरावर असलेल्या कणेरी या गांवी प्रचित काडसिध्देश्वर मठ आहे. सकाळी १०.३० वाजता मठाचे २७ वे मठाधिपती काडसिध्देश्वर यांच्या दर्शनाने प्रारंभ झाला. याच ठिकाणी ग्रामीण समाजाचे दर्शन घडणारे सिध्दगिरी म्युझियमची पाहणी केली. ग्रामीण संस्कृतीवर आधारित असा हा आगळावेगळा प्रकल्प महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील पहिलाच उपक्रम असावा. यामध्ये ग्रामीण संस्कृतीचे सर्व बारकावे टिपलेले आहेत. यानंतर सर्वजण विद्यापीठ ग्रंथालय पाहणेसाठी मार्गस्थ झाले.

क) **शिवाजी विद्यापीठ ग्रंथालयास भेट - २३.६.२००९ :-**

सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाचे ग्रंथपाल डॉ. आर. के. कामत यांनी सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठ ग्रंथालयाची माहिती दिली. ग्रंथालयातील दीड लाख ग्रंथ, नियतकालिके, ऑन लाईन कॉम्प्युटर सेवा, संदर्भ सेवा, भाषांतर सेवा, अनुवाद सेवा, प्राचीन हस्तलिखित विभाग, एम.फिल., पी.एच.डी., संशोधन विभागांची माहिती दिली. तसेच त्यांनी कराड केंद्राच्या ग्रंथालय अभ्यास उपक्रमाचे कौतुक करुन विद्यापीठ ग्रंथालयाच्या कामकाजाची व व्यवस्थापनाची माहिती दिली.

ड) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर प्रौढ निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभागाचे प्रमुख डॉ. भालबा विभुते यांचे विशेष व्याख्यान विद्यापीठाच्या प्रौढ निरंतर विभागामध्ये संपन्न झाले. त्यांनी प्रौढ निरंतर विभागाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. विभागीय केंद्र, कराड व प्रौढ निरंतर विभागाच्या विविध सामाजिक उपक्रमांची तसेच विद्यापीठाच्या शैक्षणिक उपक्रमाची माहिती सांगितली व विद्यापीठाच्या ग्रंथालय अभ्यासक्रम वर्गाच्या उपक्रमाबावत प्रत्यक्ष विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी प्रौढ निरंतर विभागाचे सहाय्यक संचालक श्री. गोरखनाथ कांवळे, सौ. अबोली उमराणी, प्रकल्प अधिकारी श्री. अनिल पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी न्यू कॉलेज करविरनगर वाचन मंदिरास भेट दिली. सायंकाळी ६ वाजता करविर निवासिनी महालक्ष्मी देवीचे दर्शन व रंकाळा तलाव पाहून कराडकडे सर्व विद्यार्थी मार्गस्थ झाले. या अभ्यास उपक्रमामध्ये ग्रंथालयाच्या विविध प्रकारागणीक ग्रंथालयाच्या सेवा व कामात होत असणा-या वदलाची विशेष माहिती मिळाली.

२.६ **बालचित्रपट महोत्सव - दि. १४ ते १८ ऑगस्ट २००९ :-** .

क्षेत्रिय प्रचार कार्यालय, भारत सरकार, रत्नागिरी, विभागीय केंद्र कराड व सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १४ ते १८ जुलै २००९ रोजी बालचित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात

आले होते. विद्यार्थ्यांच्या संस्कारक्षम मनावर सुसंस्कार होण्यासाठी ट्रस्ट व केंद्राच्या वतीने बालचित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन श्री. राजेश पाटील, चेअरमन कराड जनता सह. बँक व श्री. लालासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. श्री. दिलीपराव चित्रे, क्षेत्रिय प्रचार कार्यालय अधिकारी, सौ. शोभना रैनाक, सौ. निर्मला घोरपडे, श्री. मोहनराव डकरे यांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त केले. श्री. अनिल पाटील यांनी प्रास्ताविक केले व आभार मानले.

सलग पाच दिवस चालणा-या बालचित्रपट महोत्सवामध्ये एकूण १० चित्रपट दाखवण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने श्यामची आई, छोटा सैनिक, महात्मा गांधी, विक्रम आणि वेताळ, सेनानी साने गुरुजी, बाल शिवाजी, तेनाली रामन चित्रपट होते.

या उपक्रमामध्ये कराडमधील श्री शिवाजी हायस्कूल, विठामाता हायस्कूल, महाराष्ट्र हायस्कूल, आदर्श प्राथमिक शाळा, टिळक हायस्कूल, कन्याशाळा, जनता इंग्लिश मिडीयम स्कूल, अर्ध निवासी गुरुकूल हायस्कूल या शाळांचा सहभाग होता. एकूण ५८५० विद्यार्थ्यांनी चित्रपट महोत्सवाचा लाभ घेतला. या चित्रपट महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी क्षेत्रिय प्रचार कार्यालय अधिकारी श्री. दिलीपराव चित्रे, श्री. नामदेवराव नाळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**२.७ भक्तिरंग - कै. भगवानमामा स्मृती कार्यक्रम दि. ११ ऑगस्ट २००९ :-**

वारकरी संप्रदायातील थोर सत्पुरुष आणि कराडच्या मारुतीबुवा मठाचे मठाधिपती वैकुंठवासी भगवानमामा क-हाडकर यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी क-हाड तालुक्यातील भजनी मंडळाचा भक्तिरंग कार्यक्रम सौ. वेणुताई चव्हाण सभागृहात संपन्न झाला. विभागीय केंद्र कराड आणि ललित भारती यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या कार्यक्रमात १८ भजनी मंडळांनी भजने आणि गवळणी सादर केल्या. प्रारंभी मारुती बुवा क-हाडकर मठाचे विद्यमान मठाधिपती मारुतीबुवा सावळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजक ललित कला भारतीचे प्रमुख श्री. मोहन कुलकर्णी यांनी भक्तिरंग कार्यक्रमाच्या आयोजना मागील भूमिका विशद केली.

**२.८ स्वातंत्र दिन - दि. १५ ऑगस्ट २००९ :-**

देशाचा ६२ वा स्वातंत्र्य दिन विभागीय केंद्र कराड व सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड या दोन्ही संस्थेमध्ये मोठया उत्साहाने साजरा झाला. केंद्राच्या विरंगुळा कार्यालयात व सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटैबल ट्रस्ट, कराड मध्ये ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी श्री शिवाजी हायस्कूलचे बँड पथक, विठामाता हायस्कूल मधील विद्यार्थी, विद्यार्थीनी, दोन्ही संस्थेतील सर्व सेवक वर्ग, विविध मान्यवर उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

**२.९ ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम वर्गाचा १०० टक्के निकाल :-**

शिवाजी विद्यापीठ प्रौढ निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रमात विभागीय केंद्र कराडचा निकाल १०० टक्के लागला असून या अभ्यासक्रमात खालील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळविले.

| | | |
|---|---|---|
| १. सौ. सुषमा कोळेकर | प्रथम क्रमांक | ७५.७१ % |
| २. कु. तृप्ती बाळकृष्ण पालेकर | द्वितीय क्रमांक | ७३.७१ % |
| ३. कु. मेघना अशोक फाटक | तृतीय क्रमांक | ७२.२८ % |

प्रती वर्षाप्रमाणे उत्कृष्ठ निकालाची परंपरा या केंद्राने राखली आहे.

**२.१० स्व. पी. डी. पाटील स्मृती दिन दि. १७.९.२००९ :-**

आधुनिक कराडचे शिल्पकार आणि कराड उत्तर मतदारसंघाचे भाग्यविधाते पी. डी. पाटील यांच्या स्मृतिदिनी 'अवघा रंग एक झाला' या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट आणि ललित कला भारती यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या कार्यक्रमात शंभर गायक, वादक कलावंतांचा सहभाग होता. कार्यक्रमाचा प्रारंभ ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त आ. बाळासाहेब पाटील यांनी केलेल्या दीपप्रज्वलनाने झाला. त्यानंतर गणेश वंदना आणि कोळीनृत्य तसेच वासुदेवाच्या वेषातच 'वासुदेव' सादर करण्यात आला. सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे ग्रंथपाल श्री. मोहनराव डकरे यांनी आभार मानले. यावेळी स्व. पी. डी. पाटील साहेबांच्यावर प्रेम करणारे रसिक मोठया संख्येने उपस्थित होते.

**२.११ पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन - स्मृतिदिन २७ सप्टेंबर २००९ :-**

भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा ३७ वा स्मृति दिन विभागीय केंद्र कराड व सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड यांच्या संयुक्त विद्यमाने सौ. वेणुताई चव्हाण संशोधन ग्रंथालयात संपन्न झाला. याप्रसंगी ट्रस्ट व प्रतिष्ठानचे सर्व सेवक व सौ. वेणुताई चव्हाण संशोधन ग्रंथालयातील वाचक उपस्थित होते.

**२.१२ महात्मा गांधी जयंती - २ ऑक्टोबर २००९ :-**

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या १४० व्या जयंतीचे औचित्य साधून विभागीय केंद्र कराड व सौ. वेणुताई चव्हाण स्मारक चॅरिटेबल ट्रस्ट, कराडच्या वतीने त्यांच्या संदेशाचे प्रदर्शन सौ. वेणुताई चव्हाण सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आले.

**२.१३ देशनेते मा. यशवंतरावजी चव्हाण यांचे २५ वे पुण्यस्मरण - दि. २५ नोव्हेंबर २००९ :-**

महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या २५ व्या पुण्यतिथी निमित्त महाराष्ट्रातील विविध मान्यवरांनी मा. चव्हाण साहेबांना कृष्णा कोयनेच्या पवित्र संगमावर व सौ. वेणुताई चव्हाण स्मृती मंदिरात उपस्थित राहून आदरांजली समर्पित केली.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. अशोकराव चव्हाण, मा. ना. हर्षवर्धन पाटील, मा. आ. बाळासाहेब पाटील, मा. कल्लाप्पाण्णा आवाडे, मा. प्रकाश आवाडे, मा. श्रीनिवास पाटील, मा. विलासराव पाटील वाटारकर, मा. आ. विलासराव पाटील उंडाळकर, मा. आ. विक्रमसिंह पाटणकर, श्री. जयकुमार गोरे, श्री. सुनिल पवार, श्री. अशोकराव चव्हाण, खा. उदयनराजे भोसले इत्यादी विविध मान्यवरांनी मा. चव्हाणसाहेबांच्या समाधीस व सौ. वेणुताई चव्हाण स्मृती मंदिरात मा. चव्हाण साहेबांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करुन आदरांजली अर्पण केली.

**२.१४ मा. यशवंतरावजी चव्हाण साहेबांच्या प्रतिमेची मिरवणूक पदयात्रा :-**

भारताचे थोर सुपूत्र मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या २५ व्या स्मृतीदिनाच्या निमित्ताने बुधवार दि. २५ नोव्हेंबर २००९ रोजी दुपारी ४.०० वाजता पदयात्रेचे आयोजन करण्यात येऊन मा. चव्हाणसाहेबांच्या भव्य प्रतिमेची मिरवणूक कराड शहरातून काढण्यात आली. पदयात्रा सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट - विरंगुळा बंगला मार्ग - स्मृति सदन - टिळक हायस्कूल - चावडी चौक - समाधी स्थळ. समाधी स्थळी प्रत्येकाने समाधीचे दर्शन घेऊन त्याच आवारात आदरांजली सभा आयोजित केली.

केंद्राचे उपाध्यक्ष मा. आ. बाळासाहेब पाटील, माजी खासदार श्रीनिवास पाटील, मा. विलासराव पाटील वाठारकर, मा. अशोकराव गणपतराव चव्हाण, मा. सुनिल पवार, मा. प्रकाश बापू पाटील तसेच स्व. चव्हाण यांच्यावर प्रेम करणारे

कराडमधील विविध मान्यवर, कराडमधील अनेक प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक महाविद्यालये मधील शिक्षक, प्राध्यापक, शासकीय सेवक, डॉक्टर्स, वकील, व्यापारी, सहकारी संस्थांचे प्रतिनिधी, शेतकरी, सामाजिक क्षेत्रातील विविध कार्यकर्ते मोठया उत्स्फूर्त भावनेने पदयात्रा व आदरांजली कार्यक्रमात सहभागी झाले होते. पदयात्रेमध्ये मा. चव्हाणसाहेबांच्या विचारांचे वाचन होत होते.

समाधी स्थळी समाधीचे दर्शन घेतल्यानंतर आदरांजलीचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी उपस्थित असलेल्या मान्यवरांनी त्यांना साहेबांचे आलेले अनुभव, आठवणी, साहेबांचे विचार श्रोत्यांना सांगितले. मा. चव्हाणसाहेबांच्यावर प्रेम करणारी विविध क्षेत्रातील विविध मंडळी महिला पुरुष, महिला व्यासपीठाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**२.१५ २६/११ चा पहिला स्मृतिदिन व मानवी साखळी कार्यक्रमाचे आयोजन - दि. २६.११.२००९ :**

दिनांक २६ नोव्हेंबर २००८ रोजी पाकिस्तानातून १० दहशतवाद्यांनी मुंबईवर हल्ला केला आणि सर्व मुंबई हादरुन गेली. या दहशतवादी घटनेला १ वर्ष पूर्ण झाले. याच्या स्मरणार्थ विशाल मानवी साखळीचे आयोजन केंद्र कराडच्या वतीने करण्यात आले. राष्ट्रपिता महात्मा गांधी - शांततेचा संदेश व छत्रपती शिवाजी महाराज शौर्याचे प्रतीक या निमित्ताने कराड - गांधी पुतळा ते कोल्हापूर - विद्यापीठ परिसर शिवाजी महाराजाचा पुतळा या ७५ कि.मी. अंतरावर मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले. दहशतवाद विरोधातील तीव्र भावना, राष्ट्रीय ऐक्य, शांततेचा व शौर्याचा संदेश देणा-या मानवी साखळी कार्यक्रमाचे उद्‌घाटन सौ. वेणुताई चव्हाण ट्रस्टचे विश्वस्त श्री. अशोकराव चव्हाण, श्री. वैभव विलासराव शिंदे, उपसभापती, इस्लामपूर पंचायत समिती श्री. अनिल पाटील, सचिव कर्मवीर शिक्षण संस्था, कामेरी, व विविध संस्थेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन शहीद हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली. कराड ते कोल्हापूर या ७५ कि. मी. अंतराच्या प्रवासात मानवी साखळी संदेश यात्रेस कामेरी या ठिकाणी मा. ना. जयंत पाटील, ग्रामविकास मंत्री व मा. आ. मानसिंगराव नाईक यांनी अभिवादन केले व कोल्हापूर या ठिकाणी शांती ऐक्याच्या यात्रेचा समारोप झाला. राष्ट्रीय महामार्गालगतच्या विविध शाळांचे विद्यार्थी, शिक्षक तसेच सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवर, महिला, पुरुष, तरुण वर्ग विशाल मानवी साखळी संदेश यात्रेस सहभागी होऊन २६ नोव्हेंबरच्या हुतात्म्यास आदरांजली वाहिली व पहिला स्मृति दिन साजरा केला.

**२.१६ ग्रंथभेट कार्यक्रम - दि. १७ जानेवारी २०१० :-**

सातारा जिल्हा ग्रंथालय संघाचे ३७ वे अधिवेशन कराड नगरपालिका कराड व कराड तालुका ग्रंथालय संघाचे वतीने दि. १७ जानेवारी २०१० रोजी आयोजित झाले. यावेळी मा. संभाजीराव पाटणे, माजी खा. मा. श्रीनिवास पाटील, मा. वा. ह. कुमठे ग्रंथालय संचालक मा. खैरे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व विभागीय केंद्र कराडच्या वतीने कराड तालुक्यातील ५८ ग्रंथालयाना सौ. वेणुताई यशवंतराव चव्हाण यांची फोटो प्रतिमा प्रत्येक ग्रंथालयात लावणेसाठी तसेच विविध समाज उपयोगी माहिती असणारे १७ ग्रंथाचे ५८ संच तसेच यशवंतराव चव्हाण यांच्या भाषणांचा संग्रह 'सहयाद्रीचे वारे' या ग्रंथाच्या ५८ प्रती कराड तालुक्यातील प्रत्येक ग्रंथालयास मोफत भेट देण्यात आल्या.




मा.यशवंतराव चव्हाण यांच्या २५ व्या पुण्यतिथीनिमित्त विभागीय केंद्र,कोंकण यांनी आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक आलेल्या कु.आदित्य कुलकर्णी याला पारितोषिक देताना मा.श्री.रामभाऊ जोशी. सोबत कोंकण विभागीय केंद्राचे अध्यक्ष,मा.श्री.राजाभाऊ लिमये.

विभागीय केंद्र,कोंकणचे चाकोरी बाहेरील कार्य- स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत एस.टी. येईल अशा प्रतीक्षेत असलेल्या सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील कोयना-कांदारी खोऱ्यातील १६ गावांत रत्नागिरीच्या खेड डेपोतून एस.टी.ची सेवा सुरु करून दिली. त्याप्रसंगी कोंकण विभागीय केंद्राचे अध्यक्ष,मा.श्री.राजाभाऊ लिमये व इतर.






विभागीय केंद्र,नागपूरच्या वतीने आयोजित केलेल्या 'संघर्षातून शिखराकडे' या व्याख्यानात बोलताना श्रीमती सिंधुताई सपकाळ. सोबत विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा.श्री.गिरीश गांधी.




विभागीय केंद्र,नागपूरच्या वतीने मराठी अभिमान गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्याप्रसंगी श्री.कौशल इनामदार व कवी श्री.अशोक बागवे.

विभागीय केंद्र,अमरावतीच्या वतीने मा.यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी आदरांजली वाहताना मा.श्री.हर्षवर्धन देशमुख,कार्याध्यक्ष व इतर.





विभागीय केंद्र,लातूरच्या वतीने मा.यशवंतराव चव्हाण यांच्या ९७ व्या जयंतीदिनानिमित्त आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक प्रदान करताना प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.प्रल्हाद लुलेवार.

विभागीय केंद्र,लातूरच्या वतीने मा.यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त भाषण करताना केंद्राचे सचिव श्री.हरिभाऊ जवळगे. सोबत मा.खा.गोपाळराव पाटील व इतर.





विभागीय केंद्र,कराडच्या वतीने मा.यशवंतराव चव्हाण यांच्या ९७ व्या जयंती कार्यक्रमाच्या प्रारंभी दीप प्रज्वलन करताना डॉ.आनंदराव पाटील. सोबत श्री.अशोकराव चव्हाण व सचिव,श्री.मोहनराव डकरे.



विभागीय केंद्र,कराडच्या वतीने मा.यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीस प्रीतिसंगमावरील समाधीवर आदरांजली वाहताना मा.खा.श्री.श्रीनिवास पाटील, कराड केंद्राचे उपाध्यक्ष आमदार श्री.बाळासाहेब पाटील व इतर.



अपंग हक्क विकास मंचच्या वतीने दि.४ व ५ जानेवारी २०१० रोजी आयोजित केलेल्या विशेष सामर्थ्य सक्षमीकरण कार्यशाळेत उपस्थित जनसमूहाशी हितगुज करतांना मा.खा.सौ.सुप्रिया सुळे.




अपंग हक्क विकास मंचच्या वतीने दि.४ व ५ जानेवारी २०१० रोजी आयोजित केलेल्या विशेष सामर्थ्य सक्षमीकरण कार्यशाळेत भाषण करतांना उपाध्यक्ष मा.श्री.हुसेन दलवाई, व्यासपीठावर आमदार श्री.हेमंत टकले, मा.ना.सचिन अहिर,राज्यमंत्री, सरचिटणीस श्री.शरद काळे व इतर.



शिक्षण विकास मंचच्या वतीने राष्ट्रीय शिक्षणदिनानिमित्त उत्कृष्ट शिक्षणविषयक पुस्तकास पुरस्कार वितरित करताना मा.श्रीमती.फौजिया खान, शिक्षण राज्यमंत्री, व्यासपीठावर मा.खा.सौ.सुप्रिया सुळे, प्रमुख संयोजिका श्रीमती कुमुद बन्सल व विशेष सल्लागार श्री.वसंतराव काळपांडे.

शिक्षण विकास मंचच्या वतीने राष्ट्रीय शिक्षणदिनानिमित्त आयोजित केलेल्या मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा या परिषदेत मार्गदर्शन करताना शालेय शिक्षणमंत्री मा.ना.बाळासाहेब थोरात. व्यासपीठावर प्रमुख संयोजक श्रीमती कुमुद बन्सल, मा.खा.सौ.सुप्रिया सुळे, शिक्षण राज्यमंत्री मा.श्रीमती.फौजिया खान व इतर.






विभागीय केंद्र,नाशिक यांच्या वतीने आयोजित केलेल्या 'वारली चित्रकला' कार्यशाळेच्या उद्घाटनाप्रसंगी मा.श्री.विनायकराव पाटील,अध्यक्ष, श्रीराम पाठक, श्री.संजय देवधर, कोषाध्यक्ष श्री.विश्वास ठाकूर, श्रीमती इंद्राणी मुखर्जी व श्रीमती जयश्री पाठक.

विभागीय केंद्र,नाशिक यांच्या वतीने आयोजित केलेल्या 'यशवंत रंगोत्सवात' चित्रकार श्री.शिवाजी तुपे यांचा सत्कार करतांना चित्रकार श्री.रवी परांजपे. सोबत मा.श्री.विनायकराव पाटील,अध्यक्ष व कोषाध्यक्ष श्री.विश्वास ठाकूर.





केंद्र इमारतीच्या मुख्य सभागृहात शालेय विद्यार्थ्यांचा मा.प्रो.यश पाल यांच्याबरोबर प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्याप्रसंगी शाळेच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना मा.प्रो.यश पाल, मराठी विज्ञान परिषदचे श्री.अ.पां.देशपांडे व सरचिटणीस मा.श्री.शरद काळे.

दि.१२ मार्च २०१० रोजी आयोजित केलेल्या मा.प्रो.यश पाल व विद्यार्थ्यांचा प्रश्नोत्तर कार्यक्रमातील विद्यार्थीगण.





अपंग हक्क विकास मंचच्या वतीने आयोजित केलेल्या विशेष सामर्थ्य सक्षमीकरण कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना मा.खा.सौ.सुप्रिया सुळे, व्यासपीठावर समन्वयक श्री.विजय कान्हेकर, आमदार श्री.हेमंत टकले, शिक्षण राज्यमंत्री मा.श्रीमती.फौजिया खान व सरचिटणीस मा.श्री.शरद काळे.

कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमच्या वतीने आयोजित विधी साक्षरता कार्यशाळेत प्रमुख पाहुणे मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री.एस.राधाकृष्णन् व्याख्यान देताना. व्यासपीठावर फोरमचे सचिव श्री.एम.बी.पवार व इतर.






महाराष्ट्र महिला व्यासपीठामार्फत आयोजित करण्यात आलेल्या गृहव्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थींसोबत सरचिटणीस मा.श्री.शरद काळे.सौ.सुनीति काळे. श्रीमती सुधा भावे, संयोजिका श्रीमती रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका, श्रीमती ममता कानडे व इतर.

महाराष्ट्र महिला व्यासपीठामार्फत महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना कार्यकारी संयोजिका, श्रीमती ममता कानडे. व्यासपीठावर श्रीमती मुग्धा फणसे, श्रीमती रेखा नार्वेकर, श्रीमती विजया चौहान व इतर.





विभागीय केंद्र,पुणेमार्फत दिवाळी पहाट कार्यक्रमात देण्यात येणारा 'दिवाळी पहाट पुरस्कार' ज्येष्ठ व्यंगचित्रकार श्री.मंगेश तेंडुलकर यांना प्रदान करतांना शिवशाहीर श्री.बाबासाहेब पुरंदरे. सोबत मा.श्री.अंकुश काकडे, मा.श्री.ज्ञानेश्वर खैरे व मा.श्री.शांतिलाल सुरतवाला.

विभागीय केंद्र,पुणेमार्फत ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित पर्वती चढणे-उतरणे स्पर्धेतील स्पर्धकांसह मा.श्री.शांतिलाल सुरतवाला.





वसुंधरा कक्ष (पर्यावरण संवर्धन अभियान) मार्फत आयोजित केलेल्या राज्यस्तरीय हवामान बदलविषयक परिषदेचे उद्‌घाटन करतांना केंद्रीय वन आणि पर्यावरणमंत्री मा.ना.जयराम रमेश, सोबत वनमंत्री मा.श्री.पतंगराव कदम व मा.खा.सुप्रिया सुळे.

वसुंधरा कक्ष (पर्यावरण संवर्धन अभियान) मार्फत आयोजित केलेल्या राज्यस्तरीय हवामान बदलविषयक परिषदेत व्यासपीठावर मा.खा.सुप्रिया सुळे, मा.ना.श्री.अशोकराव चव्हाण,मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य, केंद्रीय वन आणि पर्यावरणमंत्री मा.ना.जयराम रमेश. सोबत वनमंत्री मा.श्री.पतंगराव कदम, व मा.ना.जयंत पाटील,मंत्री ग्रामविकास.






नवमहाराष्ट्र युवा अभियानमार्फत यशवंतराव चव्हाण युवा क्रीडा पुरस्कार श्री.हंसराज पाटील यांना प्रदान करतांना सरचिटणीस मा.श्री.शरद काळे, सोबत मा.खा.सुप्रिया सुळे व श्री.अभिजित पानसे.

नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या युवा धोरणाचा अंतिम मसुदा मा.ना.सुरेश शेट्टी, क्रीडा व युवक कल्याणमंत्री याना सुपूर्द करतांना मा.खा.सुप्रिया सुळे व इतर.





यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबईमार्फत आयोजित केलेल्या ज्येष्ठ नागरिक आनंद मेळाव्यातील सत्कारमूर्ती समवेत प्रमुख पाहुणे डॉ.आर.डी.लेले व सरचिटणीस श्री.शरद काळे.

सृजन कार्यशाळेत कार्यरत असलेले विद्यार्थी.





सृजन कार्यशाळेत ग्रुप कलाकृती दाखवितांना प्रशिक्षक.

**२.१७ प्रजासत्ताक दिन - दि. २६ जानेवारी २०१० :-**

२६ जानेवारी २०१० राष्ट्राचा ६१ वा प्रजासत्ताक दिन विभागीय केंद्र कराड आणि सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या कार्यालयात संपन्न झाला. शिवाजी हायस्कूलच्या बँड पथकाने मानवंदना दिली. केंद्राच्या सचिवांनी दोन्ही ठिकाणी ध्वजारोहण केले. यावेळी शिवाजी हायस्कूलमधील शिक्षक, विद्यार्थी, कराड शहरातील प्रतिष्ठित नागरीक प्रतिष्ठान व ट्रस्टचे सर्व सेवक यावेळी उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर शालेय विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

**२.१८ राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथी - दि. ३० जानेवारी २०१० :-**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या ६२ व्या पुण्यतिथी निमित्त विभागीय केंद्र कराड आणि सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराडच्या वतीने भावपूर्ण आदरांजली वाहिली.

**२.१९ सौ. वेणुताई चव्हाण जयंती - दि. २ फेब्रुवारी २०१० :-**

मा. यशवंतरावजी चव्हाण यांची पत्नी सौ. वेणुताई यशवंतराव चव्हाण यांची ९० वी जयंती सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराडच्या कार्यालयात संपन्न झाली. याप्रसंगी सौ. वेणुताईंच्या प्रतिमेचे पुजन केले. मा. चव्हाणसाहेब व सौ. वेणुताईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पन केले. या प्रसंगी सौ. वेणुताई चव्हाण संशोधन ग्रंथालयातील वाचक, जेष्ठ ग्रंथपाल इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती. विभागीय केंद्र कराडचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

**२.२० मा. यशवंतरावजी चव्हाण जयंतीनिमित्त (१२ मार्च २०१०) व्याख्यान - प्रा. डॉ. आनंद पाटील -**

दि. १२ मार्च २०१० मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ९७ व्या जयंती निमित्त विभागीय केंद्र कराड आणि दैनिक प्रीतिसंगम यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. डॉ. आनंद पाटील, पुणे (जेष्ठ साहित्यिक, समीक्षक) यांचे 'महाराष्ट्रातील जडणघडणीत यशवंतरावांचे योगदान' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. यावेळी श्री. अशोकराव गणपतराव चव्हाण, माजी खा. श्रीनिवास पाटील, विभागीय केंद्राचे सचिव, दैनिक प्रीतिसंगमचे संपादक श्री. शशिकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच कराड शहरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

**२.२१ मान्यवरांच्या भेटी :-**

यशवंत विचारांनी पुनीत झालेल्या सौ. वेणुताईंच्या स्मृतींनी सुगंधित झालेल्या 'विरंगुळा' व वेणुताई चव्हाण स्मृती मंदिराला देशभरातून व महाराष्ट्रातून विविध मान्यवर, शाळा, संस्था, संघटना भेट देत असतात. १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१० अखेर जवळ जवळ ५३ मान्यवरांनी व संस्थांनी भेटी दिल्या.

## १०.३ विभागीय केंद्र नागपूर :

**३.१ - "तांदळा-एक मुखवटा" परिचर्चा" - शनिवार ४ एप्रिल २००९ :-**

विभागीय केंद्र नागपूर व आकांक्षा मासिक, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक ४ एप्रिल २००९ रोजी 'तांदळा-एक मुखवटा' या पुरस्कारप्राप्त (गोवा फिल्म फेस्टीवल) मराठी चित्रपटावरील परिचर्चेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी होते. कार्यक्रमामध्ये चित्रपट निर्माती श्रीमती माधुरी आशिरगडे यांचा गौरव केला. चर्चेतील वक्त्या डॉ. आशाताई सावदेकर यांनी एकूणच चित्रपट माध्यमावर प्रकाश टाकला. याप्रसंगी पटकथा लेखक प्रा. सुरेश द्वादशीवार कार्यक्रमास उपस्थित होते. या परिचर्चेचे प्रास्ताविक डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शुभा साठे यांनी केले तर श्रीमती अरुणा सबाने यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

**३.२ - स्व. सुरेश भट यांच्या जयंतीनिमित्त - 'स्मरणयात्रा' - रविवार १२ एप्रिल २००९ :-**

विभागीय केंद्र नागपूर व सप्तरंग नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १२ एप्रिल २००९ रोजी स्व. सुरेश भट यांच्या जयंतीनिमित्त गीत-गजल-काव्यसंध्येचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी होते. १५ एप्रिल हा कवी स्व. सुरेश भट यांचा जन्मदिवस. भटांच्या आठवणीना उजाळा देण्यासाठी हा कार्यक्रम दिनांक १२ एप्रिल २००९ रोजी घेण्यात आला. सर्वश्री देविदास अंदापवार, आशा पांडे, सुचित्रा कातरकर, शुभांगी स्थकंठीवार, सुमती वानखेडे, मिलींद देशपांडे, विष्णू मनोहर, रसिका चाटी या विदर्भातील गजल गायन क्षेत्रातील तीन पिढयांनी आपापल्या उत्तमोत्तम रचना सादर केल्या. काव्यसंध्येचे प्रमुख पाहुणे श्री. कमलाकर धारप यांनीही भटांच्या अनेक आठवणी सांगून रसिकांना गतकाळात नेले.

**३.३ - "सार्थक" कथासंग्रह प्रकाशन सोहळा - शुक्रवार १ मे २००९ :-**

विभागीय केंद्र, नागपूर व ऋचा प्रकाशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक १ मे २००९ रोजी प्रा. सौ. विजया मारोतकर यांच्या 'सार्थक' कथासंग्रहाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी होते. प्रसिध्द लेखिका सौ. शुभांगी भडभडे यांच्या शुभहस्ते कथासंग्रहाचे प्रकाशन झाले. डॉ. प्रमोद मुनघाटे, डॉ. प्रज्ञा आपटे, कादंबरीकार सौ. विजया ब्राम्हणकर इत्यादी मान्यवर वक्ते म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. लिना निकम यांनी केले. सूत्रसंचालन शैल जैमिनी यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. धनंजय मांडवकर यांनी केले.

**३.४ - "ओंजळीभर पाणी" लघुचित्रपट परिचर्चा - मंगळवार ५ मे २००९ :-**

विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने मंगळवार दिनांक ५ मे २००९ रोजी "ओंजळीभर पाणी" या महाड येथील पाणी प्रश्नावरील लघु चित्रपट परिचर्चेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांनी लघु चित्रपट माध्यमाच्या मर्यादांकडे लक्ष वेधले. प्रा. सुरेश द्वादशीवार, श्री. प्रदीप मैत्र, डॉ. प्रदीप आगलावे इत्यादी मान्यवर वक्ते म्हणून उपस्थित होते. श्री. ताराचंद खांडेकर, डॉ. विनोद इंदूरकर, श्री. इ. मु. नारनवरे आदी मान्यवर अतिथी वक्ते म्हणून सहभागी होते. लेखक - दिग्दर्शक श्री. प्रभाकर दुपारे व श्री. नरेंद्र शिंदे यांची प्रामुख्याने उपस्थित होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संजय भाकरे यांनी केले. कार्यक्रमास चित्रपटातील कलावंत आणि रसिक प्रेक्षक मोठया संख्येने उपस्थित होते.

रविवार दिनांक ३ मे रोजी ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य राम शेवाळकर यांचे निधन झाले. सामाजिक आणि साहित्य क्षेत्रात या घटनेने फार मोठी पोकळी निर्माण झाली. या कार्यक्रमाच्या सुरवातीलाच प्राचार्य राम शेवाळकर यांना सभागृहातील उपस्थित मान्यवर व श्रोते यांनी मौन पाळून श्रध्दांजली वाहिली.

**३.५ - स्व. साने गुरुजी यांच्या पुण्यनिथीनिमित्त व्याख्यान - गुरुवार ११ जून, २००९ :-**

विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने गुरुवार दिनांक ११ जून २००९ रोजी स्व. साने गुरुजी यांच्या पुण्यनिथीनिमित्त "राष्ट्रविकासात प्राथमिक शिक्षण आणि शिक्षकाचे योगदान" या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ रंगकर्मी श्री. गणेश नायडू होते. याप्रसंगी त्यांनी संस्काराची आजची गरज आणि स्व. साने गुरुजी यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व त्यांच्या साहित्याचा परिचय करुन दिला. शिक्षण विभागाचे उपसंचालक श्री. गोविंद नांदेडे हे कार्यक्रमाला उपस्थित होते. केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. सूत्रसंचालन श्री. धनंजय मांडवकर यांनी केले तर आभार प्रदर्शन केंद्राचे सदस्य डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी केले.

**३.६ - डॉ. राजा आकाश यांचे व्याख्यान - रविवार २१ जून, २००९ :-**

दहावी बारावीच्या निकालानंतर सर्व स्तरांतून त्यावर उमटणा-या क्रिया प्रतिक्रियांचा, आशा-उपेक्षांचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम त्यांच्या समस्या, ताणतणाव अशा अनेक मुद्दयांवर विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने रविवार दिनांक २१ जून २००९ रोजी प्रसिध्द मानसोपचार तज्ज्ञ डॉ. राजा आकाश यांचे "परीक्षांचा निकाल आणि पालक, शिक्षक व समाजाची भूमिका" या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

डॉ. पल्लवी देशपांडे यांनी शिक्षण प्रतिनिधी म्हणून आपली भूमिका मांडली. विद्यार्थ्यांनी आपल्या समस्या प्रश्नाच्या स्वरुपात लिहून दिल्या. जतीन घिया व विहार मेश्राम या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले व श्री. मेश्राम यांनी पालक म्हणून

थोडक्यात आपले विचार व्यक्त केले. डॉ. नामदेव सास्ते कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. केंद्राच्या सदस्या सौ. मनीषा साधू यांनी प्रास्ताविक केले व सौ. रेखा दंडिगे यांनी संचालन केले. प्रा. कोमल ठाकरे यांनी आभार मानले.

**३.७ - मा. निळू फुले श्रध्दांजली कार्यक्रम - गुरुवार १६ जुलै, २००९ :-**

विभागीय केंद्र, नागपूर आणि विदर्भ साहित्य संघ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दिनांक १६ जुलै २००९ रोजी अभिनयसम्राट निळू फुले यांच्या श्रध्दांजलीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. मनोहर म्हैसाळकर होते. कार्यक्रमाचे संचालन श्री. प्रकाश ऐदलाबादकर यांनी केले. सभेच्या शेवटी उपस्थितांनी दिवंगतांना मूक श्रध्दांजली अर्पण केली.

**३.८ - कालिदास महोत्सव - "आषाढस्य प्रथम दिवसे" - सोमवार २० जुलै, २००९ :-**

विभागीय केंद्र, नागपूर कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कालिदास पर्व निमित्ताने सायंटिफीक सभागृहात सोमवार दिनांक २० जुलै २००९ रोजी "आषाढस्य प्रथम दिवसे" या नृत्यनाटिकेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पंकज चांदे होते. नृत्यनाटिकेचे संयोजन आणि नृत्य दिग्दर्शन डॉ. साधना नाफडे यांनी केले. एकूण तीस कलावंतांचा या नृत्यनाटिकेत सहभाग होता. काव्य मुकुंद पुल्लीवार यांचे तर संगीत पुरुषोत्तम सामक यांचे होते. विद्यापीठाच्या संस्कृत विभाग प्रमुख डॉ. नंदापुरी यांनी प्रास्तविक केले. व्यासपीठावर केंद्राचे उपाध्यक्ष श्री. विजय जिचकार, साधना नाफडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका देशकर यांनी केले. कार्यक्रमाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद होता.

**३.९ - प्रा. बाळकृष्ण दाभाडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त व्याख्यान - गुरुवार ६ ऑगस्ट, २००९ :-**

विभागीय केंद्र, नागपूर व महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दिनांक ६ ऑगस्ट २००९ रोजी प्रा. बाळकृष्ण दाभाडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. श्रीकांत दाभाडे यांनी केले. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, नागपूरचे सचिव श्री. जगदीश जोशी यांनी आभार मानले. श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. याप्रसंगी विभागीय केंद्राचे अध्यक्ष मंचावर उपस्थित होते.

**३.१० - माग्रसच्या स्थापनादिना निमित्त 'वाचन' या विषयावर चर्चा - रविवार १६ ऑगस्ट, २००९ :-**

विभागीय केंद्र, नागपूर व माग्रस यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १६ ऑगस्ट २००९ रोजी 'वाचन' चर्चेचे आयोजन करण्यात आले. 'माग्रस' या ग्रंथवाचन चळवळीच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त आदिवासींच्या आरोग्याची काळजी घेणारे, पद्मश्री व मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित डॉ. प्रकाश आमटे यांचे 'प्रकाशवाटा' आणि चंद्रकांत पाटील यांच्या 'कवितांतरण' या दोन पुस्तकांवर चर्चा करण्यात आली. श्रीमती वृंदा जोगळेकर यांनी 'प्रकाशवाटा' या पुस्तकावर चर्चा केली. श्री. प्रफुल्ल शिलेदार यांनी 'कवितांतरण' या पुस्तकावर चर्चा प्रस्तुत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मेघना वाहोकर यांनी केले. याप्रसंगी माग्रसचे प्रमुख श्री. सुधीर देव, श्रीमती अपर्णा देव प्रामुख्याने उपस्थित होते.

**३.११ - कवी नवे - कवी जुने काव्यमैफल - मंगळवार १८ ऑगस्ट, २००९ :-**

विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने मंगळवार दिनांक १८ ऑगस्ट २००९ रोजी 'कवी नवे - कवी जुने' या काव्यमैफलीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. ज्ञानेश वाकुडकर होते. व्यासपीठावर सौ. मनीषा साधू, डॉ. कोमल ठाकरे, डॉ. चंद्रभान भोयर प्रामुख्याने उपस्थित होते.

**३.१२ - नाटयलेखन कार्यशाळा - २९, ३० ऑगस्ट, २००९ :-**

विभागीय केंद्र, नागपूर व बोधी नाटय परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने द्विदिवसीय नाटय लेखन कार्यशाळेचे दिनांक २९, ३० ऑगस्ट २००९ रोजी आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन ज्येष्ठ रंगकर्मी श्री. राम जाधव यांच्या हस्ते करण्यात

आले. पहिल्या दिवशीच्या सत्राचे अध्यक्ष नाटय समीक्षक श्री. सुरेश मेश्राम होते. प्रमुख अतिथी म्हणून अध्यक्ष श्री. गिरीश गांधी होते. याप्रसंगी प्रसिध्द नाटककार श्री. प्रेमानंद गज्वी, श्री. ललित खोब्रागडे आदी मान्यवर उपस्थित होते. या नाटकांवर निरिक्षक-चर्चक म्हणून सर्वश्री गिरीश पतके, हरिश इथापे, रमेश लखनापुरे, निरंजन मार्कन्डेयवार, पराग घोंगे, अशोक जांभूळकर, संजय जीवने, श्रीमती कमल वाघमारे, ज्येष्ठ कवी श्री. लोकनाथ यशवंत यांनी चर्चा केली.

**३.१३ - स्वाईन फ्लूवर पथनाटय - २ सप्टेंबर २००९ :-**

विभागीय केंद्र, नागपूर व दक्ष नागरिक फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्वाईन फ्लू जनजागृती पथनाटयाचे दिनांक २ सप्टेंबर २००९ रोजी आयोजन करण्यात आले. 'आला हो आला स्वाईन फ्लू, जनता नका हो घाबरुन जाऊ' या संदेशासह स्वाईन फ्लूची लक्षणे, कारणे आणि त्यापासून बचावात्मक उपाययोजनांची माहिती या पथनाटयाद्वारे देण्यात आली. या उपक्रमाचा प्रारंभ करुन मूकबधीर महाविद्यालय, शंकरनगर चौक, दै. सकाळ, दै. पुण्यनगरी, लोकमत चौक, वर्डी बसस्थानक, फुटाळा तलाव अशा विविध गर्दीच्या ठिकाणी या पथनाटयाचे सादरीकरण करुन जनजागृती करण्यात आली. श्री. श्रीकांत उमाठे आणि संच या उपक्रमात सहभागी झाले होते.

**३.१४ - नव्या जाणिवांचे कवी - उपक्रम - दिनांक १२ सप्टेंबर २००९ :-**

विदर्भातील नवनवीन कवींना ऐकण्याची संधी रसिक श्रोत्यांना - कवींना मिळावी यासाठी विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने ' नव्या जाणिवांचे कवी' या उपक्रमाची सुरवात करण्यात आली. प्रत्येक कवींनी १० ते १५ कविता या उपक्रमास सादर केल्या. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माग्रसचे श्री. सुधीर देव उपस्थित होते. डॉ. कोमल ठाकरे, डॉ. चंद्रभान भोयर, श्री. उल्हास मनोहर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक त्यामागची भूमिका सौ. मनीषा साधू यांनी स्पष्ट केली. अनेक कवींनी या उपक्रमाचे कौतुक केले असून या उपक्रमात सहभागी होण्यास उत्सुकता दर्शविली.

**३.१५ - 'हास्यपूर्णा' प्रकाशन समारंभ - दिनांक २३ सप्टेंबर २००९ :-**

विभागीय केंद्र नागपूर व ऋचा प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने उदयन ब्रम्ह लिखित 'हास्यपूर्णा' या विनोदी कथासंग्रहाचा प्रकाशन समारंभ दिनांक २३ सप्टेंबर २००९ रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. मनोहर म्हैसाळकर होते. तसेच श्री. गिरीश गांधी, श्रीमती आशा बगे व निवृत्त विंग कमांडर श्री. अशोक मोटे अतिथी म्हणून उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीमती शुभदा फडणवीस यांनी केले. कार्यक्रमात साहित्य क्षेत्रातील मान्यवरांसह रसिक मोठया संख्येने उपस्थित होते.

**३.१६ - डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या चर्चेचे आयोजन - दिनांक २४ सप्टेंबर २००९ :-**

दिनांक २४ सप्टेंबर २००९ रोजी महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण समितीचे अध्यक्ष डॉ. आ. ह. साळुंखे यांचेशी चर्चेचे आयोजन करण्यात आले. नागपूर शहरातील साहित्य - कला - सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांसोबत ही चर्चा झाली. डॉ. भा. ल. भोळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत डॉ. भा. ल. भोळे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सीमाताई साखरे, लोकसत्ताचे संपादक श्री. प्रवीण वर्दापूरकर, डॉ. हरिश्चंद्र बोरकर, श्री. चंद्रकांत वानखेडे, माया वानखेडे, हरिश अडयाळकर, डॉ. रविंद्र शोभणे, डॉ. अविनाश रोडे, श्रीमती अरुणा देशमुख, डॉ. प्रमोद मुनघाटे, हिरामण लांजे, डॉ. चंद्रभान भोयर, गणेश नायडू आदी मान्यवरांनी चर्चेत सहभाग घेतला.

**३.१७ - राज्यस्तरीय मराठी वाचन स्पर्धा - दिनांक २ ऑक्टोबर २००९ :-**

विभागीय केंद्र नागपूर व अभिनव कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भाईंदर (ठाणे) यांच्या संयुक्तवतीने कै. विवेक रामचंद्र जोग राज्यस्तरीय मराठी वाचक लेखी स्पर्धा परीक्षेचे आयोजन शुक्रवार दिनांक २ ऑक्टोबर २००९ रोजी श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, नागपूर येथे करण्यात आले. नागपूर शहरातील महाविद्यालयीन गट व खुल्या गटात ही परीक्षा घेण्यात आली.

**३.१८ - ज्येष्ठ नागरिक सत्कार सोहळा - दिनांक २ ऑक्टोबर २००९ :-**

दिनांक २ ऑक्टोबर २००९ ला सायंकाळी ५.०० वाजता श्री. गिरीश गांधी अध्यक्ष, विभागीय केंद्र, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरिकांच्या सत्काराचे आयोजन फेस्कॉम व ज्येष्ठ नागरिक तथा परिसर नागरिक मंडळ, धरमपेठ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या २६ सदस्यांचा विचारपुष्प प्रदान करुन सत्कार करण्यात आला. सोबतच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहयोग देणा-या कार्यकर्त्यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन श्री. भाऊराव विरेवार व श्रीमती सुप्रिया वगाडे यांनी केले.

**३.१९ - धुक्यात विरलेले आर्त - पुस्तक प्रकाशन समारंभ - दिनांक ३ ऑक्टोबर २००९ :-**

विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने अमरावतीच्या डॉ. शोभा रोकडे यांच्या 'धुक्यात विरलेले आर्त' या कविता संग्रहाचा प्रकाशन समारंभ दिनांक ३ ऑक्टोबर २००९ रोजी आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी होते व प्रमुख अतिथी म्हणून मुंबईच्या कवयित्री नीरजा या होत्या. या कार्यक्रमास गोदा प्रकाशनचे दादासाहेब गोरे, डॉ. प्रमोद मुनघाटे उपस्थित होते. याप्रसंगी वक्ते म्हणून प्रा. सुरेश द्वादशीवार व डॉ. शोभा रोकडे यांनी काव्यसंग्रहाच्या निमित्ताने आपली मते व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन श्रीमती सुमती वानखेडे यांनी केले.

**३.२० - 'नव्या जाणिवांचे कवी' - ११ ऑक्टोबर २००९ :-**

विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने रविवार दिनांक ११ ऑक्टोबर २००९ रोजी काव्य - उपक्रमांतर्गत 'नव्या जाणिवांचे कवी' हा चर्चात्मक काव्य उपक्रम घेण्यात आला. विदर्भातील सर्व कवींना हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने घेण्यात येत असलेल्या या उपक्रमात यवतमाळ येथील सर्वश्री सलील कांबळे, प्रभाकर कुबडे (गडचिरोली), स्मिता राऊत (रामटेक), रोहिणी हटकर (नागपूर), अनुपमा मुंजे (नागपूर) इत्यादी कवींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्राच्या सदस्या सौ. मनीषा साधू यांनी केले तर चर्चेची सूत्रे सांभाळण्यासाठी मुख्य अतिथी अध्यक्ष म्हणून कवी ज्ञानेश वाकुडकर उपस्थित होते. उपस्थित रसिकांनी या चर्चेला भरभरुन प्रतिसाद दिला तर प्रमुख पाहुणे म्हणून नागपूर आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी श्री. संजय भक्ते उपस्थित होते.

**३.२१ - 'यमू' व 'श्रावणी' कादंबरी प्रकाशन समारंभ - दिनांक २५ ऑक्टोबर २००९ :-**

विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने रविवार दिनांक २५ ऑक्टोबर २००९ रोजी सौ. विजया ब्राम्हणकर यांच्या 'यमू' व 'श्रावणी' या दोन कादंब-यांचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी होते व प्रमुख अतिथी सौ. शुभांगीताई भडभडे होत्या. प्रा. विजया मारोतकर यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

**३.२२ - 'मेरी मराठी कविता' प्रकाशन समारंभ - दिनांक ८ नोव्हेंबर २००९ :-**

विभागीय केंद्र, नागपूर व विवेक प्रकाशन नागपूरच्या संयुक्त वतीने रविवार दिनांक ८ नोव्हेंबर २००९ रोजी दुपारी १.०० वाजता कवी हिरामन लांजे यांच्या 'रमानंद' या मराठी कवितांचा हा हिंदी अनुवादित कविता संग्रह 'मेरी मराठी कविता' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्ष म्हणून श्री. गिरीश गांधी उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. हरिश्चंद्र बोरकर, श्री. प्रविण बर्दापूरकर, श्री. उमेशजी चौबे, कवयित्री सौ. आशाताई पांडे उपस्थित होत्या.

**३.२३ - 'नव्या जाणिवांचे कवी' - ८ नोव्हेंबर २००९ :-**

विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने रविवार दिनांक ८ नोव्हेंबर २००९ रोजी सायंकाळी ५.३० वाजता काव्य उपक्रमांतर्गत 'नव्या जाणिवांचे कवी' हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अरुणा देशमुख उपस्थित होत्या.

**३.२४ - मा. यशवंतराव चव्हाण यांची २५ वी पुण्यतिथी - दिनांक २५ नोव्हेंबर २००९ :-**

महाराष्ट्राचे शिल्पकार व देशाचे माजी उपपंतप्रधान मा. यशवंतराव चव्हाण यांच्या २५ व्या पुण्यतिथीनिमित्त विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने बुधवार दिनांक २५ नोव्हेंबर २००९ रोजी स्व. श्रीमंत बाबूराव धनवटे सभागृह, शंकरनगर चौक, नागपूर येथे आय.बी.एन. लोकमत वाहिनीचे संपादक श्री. निखील वागळे यांचे 'महाराष्ट्राची पन्नास वर्षांची वाटचाल' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार व तरुण भारतचे माजी मुख्य संपादक श्री. मामासाहेब घुमरे व ज्येष्ठ पत्रकार (दैनिक रामप्रहर, मुंबई) श्री. मधुकर भावे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

**३.२५ - पुस्तक प्रकाशन सोहळा - दिनांक २६ नोव्हेंबर २००९ :-**

विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने गुरुवार दिनांक २६ नोव्हेंबर २००९ रोजी सायंकाळी ५.३० वाजता श्री. वा. रा. गाणार यांच्या 'बुध्द बनाम गांधी', 'बहिष्कृत समाजोद्धारक : नानासाहेब गवई', 'विविध शब्द लघुकोश', या तीन पुस्तकांच्या प्रकाशन समारंभाचे आयोजन स्व. श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, शंकरनगर चौक, नागपूर येथे करण्यात आले. या प्रसंगी 'विविध शब्द लघुकोश' व 'बुध्द बनाम गांधी' या पुस्तकावर दैनिक भास्करचे संपादक श्री. प्रकाश दुबे यांनी तर ज्येष्ठ पत्रकार श्री. उमेश चौबे यांनी 'बहिष्कृत समाजोद्वारक : नानासाहेब गवई' या पुस्तकावर अभ्यासात्मक विवेचन केले.

**३.२६ - दि. २६/११ च्या निमित्ताने - दिनांक २६ नोव्हेंबर, २००९ :-**

विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने गुरुवार दिनांक २६ नोव्हेंबर २००९ रोजी सायंकाळी ७.३० वाजता २६ नोव्हेंबरला मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. गिरीश गांधी उपस्थित होते. दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक श्री. सुधीर पाठक, सेवानिवृत्त मेजर श्री. हेमंत जकाते, नागपूर ग्रामीण पोलीस अधिक्षक श्री. सी. एच. वाकडे या विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या घटनेप्रती व सद्याच्या परिस्थिती बद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या.

**३.२७ - सकाळ करंडक नाटय प्रशिक्षण शिबीराचे आयोजन - दिनांक ३ डिसेंबर २००९ :-**

विभागीय केंद्र नागपूर व दैनिक सकाळ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दिनांक ३ डिसेंबर २००९ रोजी सकाळी ११ वाजता सकाळ करंडक नाटय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. रंगमंचावर वावरताना काय खबरदारी घ्यावी, रंगमंचावर किती स्पॉट असू शकतात, डिमर म्हणजे नेमके काय, अभिनय, दिग्दर्शन करताना कुठली पथ्ये पाळावित अशा एक ना अनेक बाबी रंगमंचावर जाण्याची तयारी करणा-या विद्यार्थी स्पर्धकांसाठी सुप्रसिध्द नाटयलेखक आणि रंगकर्मी श्री. योगेश सोमण यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा राबविण्यात आली. केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांच्या शुभहस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले. श्री. कोठेकर यांनी सकाळ ची भूमिका विशद केली. स्पर्धेचे विदर्भ समन्वयक श्री. महेंद्र सुके यांनी संचालन केले. नवोदित रंगकर्मींच्या उपस्थितीने सभागृहात चैतन्य निर्माण झाले होते.

**३.२८ - नागपूर हिवाळी अधिवेशनाकडून अपेक्षा - परिसंवाद - दिनांक ७ डिसेंबर २००९ :-**

विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने सोमवार दिनांक ७ डिसेंबर २००९ रोजी 'नागपूर हिवाळी अधिवेशनाकडून अपेक्षा' या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत श्री. महेश जोशी, आमदार श्री. देवेंद्र फडणवीस, माजी खासदार श्री. गेव्ह आवारी, चळवळीतील पत्रकार श्री. रणजित मेश्राम या वक्त्यांनी परिसंवादात सहभाग घेतला. केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांनी परिसंवाद आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली.

**३.२९ - सिंधूताई सपकाळ यांचे व्याख्यान - दिनांक ११ डिसेंबर २००९ :-**

विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने शुक्रवार दिनांक ११ डिसेंबर २००९ रोजी सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती सिंधूताई सपकाळ यांच्या 'संघर्षातून शिखराकडे' या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. आयुष्यात कितीतरी संकटे आलीत तरी हिम्मत

सोडू नका, संकटावर मात करुन जिद्दीने पुढे जा, आयुष्य जगा आणि संघर्षातून शिखराकडे वाटचाल करा असा मोलाचा सल्ला सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती सिंधूताई सपकाळ यांनी याप्रसंगी महिलांना दिला. कार्यक्रमाला माजी आमदार श्री. विनायकराव मेटे, केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी, आकांक्षा मासिकाच्या संपादिका श्रीमती अरुणा सवाने उपस्थित होत्या. सूत्रसंचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी केले तर केंद्राचे उपाध्यक्ष श्री. विजय जिचकार यांनी आभार मानले.

**३.३० - नव्या जाणिवांचे कवी-काव्य उपक्रम - दिनांक १३ डिसेंबर २००९ :-**

विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने सोमवार दिनांक १३ डिसेंबर २००९ रोजी 'नव्या जाणिवांचे कवी-काव्य' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नवोदित व युवा कवींना हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

**३.३१ - 'बिल्वदल' - अमृत महोत्सवी वर्ष - दिनांक १५ डिसेंबर २००९ :-**

विभागीय केंद्र नागपूर व सप्तरंग, नागपूरच्या वतीने मंगळवार दिनांक १५ डिसेंबर २००९ रोजी 'बिल्वदल' अमृत महोत्सवी सोहळयाअंतर्गत जुन्या नव्या मराठी कवितांच्या मैफिलीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. गिरीश गांधी उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून श्री. प्रकाश एदलावादकर उपस्थित होते. कार्यक्रमाची संकल्पना श्री. मिलींद देशपांडे यांनी आपल्या प्रास्ताविकातून मांडली.

**३.३२ - गौरव ग्रंथ प्रकाशन समारंभ - दिनांक १९ डिसेंबर २००९ :-**

विभागीय केंद्र नागपूर व युगसाक्षी प्रकाशनच्या वतीने डॉ. यशवंत मनोहर यांच्या साहित्यावर 'वेधःएका युगसाक्षी प्रतिभेचा' या गौरव ग्रंथाच्या प्रकाशन समारंभाचे शनिवार दिनांक १९ डिसेंबर २००९ रोजी आयोजन करण्यात आले.

**३.३३ - श्रध्दांजली कार्यक्रम - मंगळवार दिनांक २२ डिसेंबर २००९ :-**

विभागीय केंद्र, नागपूर, विदर्भ साहित्य संघ व अ. भा. नाटय परिषदेच्या संयुक्त विद्यमाने डॉ. दिलीप चित्रे, डॉ. अरुण कांबळे, श्री. वसंत नानल, ज्येष्ठ पत्रकार श्री. सत्यनारायण दुबे यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

**३.३४ - सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ - दिनांक २५ डिसेंबर २००९ :-**

विभागीय केंद्र नागपूर व अक्षरभूषण मधुकर भाकरे प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या सुंदर हस्ताक्षर स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळयाचे आयोजन शिक्षक सहकारी बँकेच्या सभागृहात करण्यात आले. इयत्ता पहिली ते चौथी, पाचवी ते सातवी व आठवी ते दहावी या तीन गटात ही स्पर्धा घेण्यात आली होती. त्यात एकशे सत्तावीस शाळेतील सव्वा लाख विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. कार्यक्रमाला बसोलीचे प्रमुख व चित्रकार श्री. चंद्रकांत चन्ने, श्री. गिरीश गांधी, शिक्षणाधिकारी श्री. महेश करजगावकर, श्री. बाबासाहेब पाटील, श्री. राजाभाऊ चिटणीस, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक श्री. वि. भ. करगुटकर, श्री. संजय भाकरे, ज्येष्ठ पत्रकार श्री. राम भाकरे उपस्थित होते. कार्यक्रमात 'अक्षरधन' या मासिकाचे प्रकाशन पोलीस आयुक्त श्री. प्रवीण दीक्षित यांच्या हस्ते करण्यात आले. सुंदर हस्ताक्षर आदर्श शिक्षकाचा पुरस्कार नेताजी सुभाषचंद्र बोस शाळेतील श्री. विनोद माणके या शिक्षकाला देण्यात आला.

पुरस्कार विजेते विद्यार्थी :- इयत्ता १ ली ते ४ थी - प्रथम - यश भागडकर (संजुबा प्राथमिक शाळा), द्वितीय - यस्मिन कुरेशी (टिळक विद्यालय), तृतीय अलश्री इनकाने (इंदिरा गांधी प्राथमिक शाळा), उत्तेजनार्थ : अभिलाषा ढोणे, सुमंत वाहोकर, ५ वी ते ७ वी प्रथम - प्राची पराते (न्यु इंग्लिश हायस्कूल), द्वितीय - सुभाष उके (शिवाजी हायस्कूल), तृतीय - गणेश सपकाळ (केशवनगर माध्यमिक विद्यालय), उत्तेजनार्थ - तन्मय खोकले, स्वीटी तलमले पाटील (सी.पी. ॲन्ड बेरार), तृतीय - खुशबू सव्वाशेरे (विश्वास माध्यमिक विद्यालय). कार्यक्रमाचे संचालन श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले. पारितोषिकांचे वाचन श्री. अजय भाकरे यांनी केले. आभार प्रदर्शन श्री. अभय भाकरे यांनी मानले.

**३.३५ - डॉ. भा. ल. भोळे यांना श्रध्दांजली - दिनांक २९ डिसेंबर २००९ :-**

विभागीय केंद्र नागपूर, विदर्भ साहित्य संघ, नागपूर सर्वोदय आश्रम, नागपूर व आधार संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ विचारवंत डॉ. भा. ल. भोळे यांची शोकसभा आयोजित करण्यात आली. शोकसभेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ

नाटककार प्रा. महेश एलकुंचवार होते. व्यासपीठावर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती लीलाताई चितळे, डॉ. रुपाताई कुळकर्णी, विचारवंत श्री. यशवंत मनोहर आणि कास्ट्राईब संघटनेचे अध्यक्ष श्री. कृष्णा इंगळे उपस्थित होते. विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. मनोहर म्हैसाळकर, ज्येष्ठ संपादक श्री. मा. गो. वैद्य, आधार संस्थेचे अध्यक्ष डॉ. अविनाश रोडे, डॉ. ताराचंद खांडेकर, गांधीवादी विचारवंत श्री. सुरेश पांढरीपांडे, श्री. बाळू भोळे, श्री. हिरण्यमय भोळे, श्रीमती गौरी भोळे यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. शोकसभेचे संचालन श्री. बाळ कुळकर्णी यांनी केले. एक मिनीट मौन पाळून डॉ. भोळेंना आदरांजली वाहण्यात आली.

**३.३६ - नव्या जाणिवांचे कवी-काव्य उपक्रम - दिनांक १० जानेवारी २०१० :-**

विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने रविवार दिनांक १० जानेवारी २०१० रोजी 'नव्या जाणिवांचे कवी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. शैलेंद्र लेंडे होते. या उपक्रमांत पांढरकवडा येथील प्रा. उर्मिला निनावे, श्रीमती जयश्री पांगारकर, चंद्रपूरचे प्रा. विजय सोरते, काटोलचे श्री. देवेंद्र तातोडे, नागपूरचे श्री. निरंजन अंधारे या कवींनी आपल्या कविता सादर केल्या. श्री. धनंजय मांडवकर यांनी सूत्रसंचालन केले.

**३.३७ - श्री. अरुण साधू यांचे व्याख्यान - दिनांक १९ व २० जानेवारी २०१० :-**

विभागीय केंद्र नागपूर व दत्ताजी जोशी स्मृती व्याख्यानमाला समितीच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ व २० जानेवारी २०१० रोजी मा. श्री. अरुण साधू यांचे 'गटेन बर्ग ते आयपॉड' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. 'माध्यमक्रांती : ललित साहित्याचा अंत ? गटेन बर्ग ते आयपॉड' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. टेलिफोनच्या आगमनापासून ते मोबाईल क्रांतीच्या युगाचे श्री. अरुण साधू साक्षीदार आहेत. तंत्रज्ञान प्राथमिक अवस्थेत असतानाच्या अनेक गमतीशीर आठवणी सांगतानाच, मुद्रित साधनांचा विकास होण्यापूर्वी युरोपातील गटेनवर्गचे छपाईयंत्र ते ई-बुक आणि ई-मेलपर्यंतचा प्रवास श्री. अरुण साधू यांनी सलग कथन केला. कार्यक्रमाचे प्रास्तविक - संचालन श्रीमती अरुणा देशमुख यांनी केले.

**३.३८ - गिरिजा कीर यांच्या 'सर्वोत्कृष्ट गिरिजा कीर' पुस्तकाचे प्रकाशन दिनांक २३ जानेवारी २०१०-**

विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने दिनांक २३ जानेवारी २०१० रोजी गिरिजा कीर यांच्या 'सर्वोत्कृष्ट गिरिजा कीर' या १०० व्या पुस्तकाचे प्रकाशन सोहळयाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत प्रा. सुरेश द्वादशीवार होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार श्री. बाळ कुळकर्णी यांनी केले. आभार प्रदर्शन सदस्य डॉ. कोमल ठाकरे यानी मानले. कार्यक्रमाला वाड्.मयप्रेमी तसेच मान्यवर नागरिक उपस्थित होते.

**३.३९ - डॉ. द. भि. कुळकर्णी यांचा नागरी सत्कार - दिनांक ११ फेब्रुवारी २०१० :-**

पुण्यात होणा-या ८३ व्या अखिल भारतीय मराठा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावर नियुक्ती झाल्यावद्दल नियोजित अध्यक्ष डॉ. द. भि. कुळकर्णी यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन ११ फेब्रुवारी २०१० रोजी विभागीय केंद्र नागपूर व धरमपेठ वाचनालय, नागपूर यांच्या संयुक्त वतीने सायंटिफिक सभागृहात आयोजित करण्यात आले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. श. नू. पठाण होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार श्री. अनंतराव दीक्षित होते.

**३.४०- नव्या जाणिवांचे कवी - दिनांक १४ फेब्रुवारी २०१० :-**

विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने दर महिन्याच्या दुस-या रविवारी आयोजित करण्यात येणा-या 'नव्या जाणिवांचे कवी' या उपकमाचे आयोजन दिनांक १४ फेब्रुवारी २०१० रोजी श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. काव्यचर्चेला प्रमुख अतिथी डॉ. प्रमोद मुनघाटे उपस्थित होते. काव्यचर्चेत माजी कुलगुरु प्रा. योगानंद काळे, श्रीमती नेहा भांडारकर, श्रीमती मेघा देशपांडे, कवी क्रांती, श्री. गणेश भाकरे, श्री. प्रकाश एदलाबादकर, प्रा. ज्ञानेश वाकुडकर यांनी सहभाग घेतला.

**३.४१ - 'कलियुगातील ध्रुवतारा' - काव्यसंग्रह प्रकाशन दिनांक १७ फेब्रुवारी २०१० :-**

विभागीय केंद्र नागपूर व साहित्य प्रसार केंद्र नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. संजय पोहरकर यांच्या 'कलियुगातील ध्रुवतारा' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. श. नू. पठाण, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पंकज चांदे, श्री. राजाभाऊ कुलकर्णी, श्रीमती रत्नप्रभा अंजनगावकर, ज्येष्ठ पत्रकार श्री. श्रीधर भावे इ. उपस्थित होते.

**३.४२ - जागतिक महिला दिन - ८ मार्च २०१० :-**

जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमिवर विभागीय केंद्र नागपूर व आकांक्षा प्रकाशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'आधुनिक महाराष्ट्राच्या वाटचालीत महिलांचे योगदान' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरसेविका मा. प्रगतीताई पाटील होत्या. परिसंवादात डॉ. कल्पना पाटणकर, श्रीमती सविता हरकरे, श्रीमती अरुणा सबाने सहभागी झाल्या होत्या. व्यासपीठावर श्री. विजय जिचकार, सौ. मनीषा साधू उपस्थित होते. संचालन श्रीमती उज्वला अंधारे यांनी केले.

**३.४३ - मा. यशवंतराव चव्हाण यांची ९७ वी जयंती दिनांक १२ मार्च २०१० :-**

विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने यशवंतराव चव्हाण यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त 'राज्य निर्मितीच्या वेळी यशवंतराव चव्हाण यांनी बघितलेली स्वप्ने आणि त्याची फलश्रुती' या विषयावर श्री. मधुकर भावे, मुंबई यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी दैनिक सकाळचे संपादक श्री. श्रीपाद अपराजित यांनीही मा. यशवंतराव चव्हाण यांच्या संयुक्त महाराष्ट्राच्या भूमिकेचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. गिरीश गांधी यांनी केले. व्यासपीठावर विभागीय केंद्राचे पदाधिकारी उपस्थित होते.

**३.४४ - नव्या जाणिवांचे कवी - दिनांक १४ मार्च २०१० :-**

दिनांक १४ मार्च २०१० रोजी दरमहिन्याला सादर होणा-या उपक्रमाअंतर्गत 'नव्या जाणिवांचे कवी' या काव्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कवी श्री. अनिल जवंजाळ, सावनेर, श्री. देवानंद मेश्राम, ब्रम्हपूरी, श्री. विशाल देवतळे व श्री. पवनकुमार कामडी या कवींनी सहभाग घेऊन आपल्या कविता सादर केल्या. काव्यचर्चेचे अध्यक्ष डॉ. कोमल ठाकरे होत्या व काव्यचर्चेत सर्वश्री हिरामन लांजे, प्रभाकर कुवडे, अजय वाघ, बाळ कुलकर्णी यांनी भाग घेतला.

**३.४५ - विंदा करंदीकर यांना श्रध्दांजली - दिनांक १७ मार्च २०१० :-**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ कवी विंदा करंदीकर यांच्या निधनाने साहित्य विश्वात एक पोकळी निर्माण झाली. विंदाच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विदर्भ साहित्य संघ व विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले. शोकसभेच्या अध्यक्षस्थानी डॉ. यशवंत मनोहर होते. त्यांनी याप्रसंगी आपली शोकसंवेदना व्यक्त केली. डॉ. वि. स. जोग, डॉ. आशा सावदेकर, डॉ. प्रदीप विटाळकर, कवी श्री. प्रफुल्ल शिलेदार यांनीही आपल्या शोकसंवेदना व्यक्त केल्या. यावेळी व्यासपीठावर सर्वस्वी मनोहर म्हैसाळकर, गिरीश गांधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले. विंदांची 'माझ्या मना बन दगड' ही कविता त्यांनी सभेच्या शेवटी सादर केली. सर्व उपस्थितांनी मौन उभे राहून विंदांना श्रध्दांजली अर्पण केली.

**३.४६ - पुस्तक प्रकाशन समारंभ - दिनांक १८ मार्च २०१० :-**

विभागीय केंद्र, नागपूर व बकुल प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. संयुक्ता थोरात यांच्या 'कमरा नं. १३' या कथासंग्रहाचा प्रकाशन सोहळा केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांच्या हस्ते संपन्न झाला. कार्यक्रमाला ज्येष्ठ चित्रकार

श्री. चंद्रकांत चन्ने, श्री. पराग घोंगे, श्री. जगदीश शाहू व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन श्रीमती अहिंसा तिरपुडे यांनी केले.

**३.४७- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि विभागीय केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २८ ते ३१ मार्च २०१० रोजी आयोजित नवलेखक कार्यशाळा :-**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि विभागीय केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने वर्धा जिल्हयातील सेवाग्राम येथील 'बापू कुटी' समोरील यात्री निवास येथे दिनांक २८ ते ३१ मार्च २०१० दरम्यान चार दिवसीय नवलेखक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचा लाभ विदर्भातील सर्वच जिल्हयातील पन्नास नवलेखक - लेखिकांनी घेतला.

दिनांक २८ मार्च रोजी सकाळी १० वाजता कार्यशाळेचे उद्घाटन झाले. मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. आर. कृष्णकुमार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. दत्ता मेघे, खासदार, वर्धा हे उपस्थित होते. कार्यशाळेचे उद्घाटन दीपप्रज्वलन करुन केले. अतिथींचे सुताच्या हारांनी स्वागत करण्यात आले. या प्रसंगी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या नागपूर विभागीय केंद्राचे संचालक प्रा. अरविंद बोंद्रे आणि नाशिक येथील शिक्षण विद्याशाखेतील प्रा. विजयकुमार पाईकराव हे उपस्थित होते.

दिनांक २९ मार्च रोजी सकाळी १०.०० वाजता पहिल्या सत्रात प्रसिध्द कादंबरीकार व समीक्षक डॉ. किशोर सानप यांनी कादंबरी या वाड्.मय प्रकाराचा रुपबंध आणि मराठी कादंबरीचा विकास स्पष्ट केला. सध्या मराठीत लिहिल्या जाणा-या कादंवरीचे स्वरुप आणि नव्या लेखकाकडून कोणत्या अपेक्षा आहेत याचेही मार्गदर्शन केले. दुपारी १२.०० वाजता विदर्भातील प्रसिध्द कादंबरीकार श्री. बाबाराव मुसळे यांची मुलाखत श्री. अनंत भोयर यांनी घेतली. श्री. मुसळे यांनी भोवतालचा समाज, त्यातील प्रकृती-विकृती मागील कारणांचा शोध घेण्यासाठी कथाबीजे आणि पात्रनिर्मिती करताना त्यांना कोणते अनुभव आले ते सांगितले. नवलेखकांनी त्यांना अनेक प्रश्न विचारुन आपले शंकासमाधान करुन घेतले.

दुपारच्या सत्रात औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाटयशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. सतीश पावडे यांनी नाटकाच्या संहितालेखनासंबंधी मार्गदर्शन केले. या क्षेत्रात नव्या लेखकांना कोणत्या संधी आहेत, त्यासाठी कोणत्या कौशल्यांची गरज आहे याचेही प्रतिपादन केले. चार वाजताच्या सत्रात वर्धा येथील तरुण नाटयदिग्दर्शक श्री. हरिश इथापे यांनी नाटकाची संहिता रंगभूमीवर आणताना कोणत्या मूलभूत गोष्टींची जाणीव नाटककाराला पाहिजे याबाबत अनुभवसिध्द विवेचन केले. रात्री भोजनानंतर नवलेखकांनी गटागटाने स्वनिर्मित कथा व कवितांचे वाचन केले.

कार्यशाळेच्या तिस-या दिवशी दिनांक ३० मार्च रोजी मूर्तिजापूर येथील प्रसिध्द ललितगद्य लेखक प्राचार्य डॉ. श्रीकांत तिडके यांनी मराठीतील ललितगद्याचे स्वरुप सांगून ललितलेखनामागील प्रेरणांचा आढावा घेतला. सायंकाळी सहा वाजता मुंबई येथील प्रसिध्द कवी श्री. अरुण म्हात्रे यांनी अनेक कवींच्या प्रसिध्द कवितांचे भावपूर्ण सादरीकरण करुन कविता व गीतांच्या सादरी करणात अभिनयक्षमतेची आवश्यकता सांगितली. त्यांच्या काव्य वाचनाने नवलेखक मंत्रमुग्ध झाले. रात्री त्यांच्याच उपस्थितीत नवलेखकांनी आपले कवीसंमेलन आयोजित केले.

दिनांक ३१ मार्च रोजी कार्यशाळेच्या अखेरच्या दिवशी, अमरावती येथील प्रसिध्द कवी, कादंबरीकार व समीक्षक आणि यंदाच्या साहित्य अकादमी पुरस्काराचे मानकरी प्रा. वसंत आबाजी डहाके यांनी कविता या प्रकाराचे मूलतत्व स्पष्ट केले. दुपारी १२.०० वाजता वर्धाचे तरुण संपादक प्रा. राजेंद्र मुंढे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यशाळेत नवलेखकांना दिलेल्या कृतिकार्याचे सादरीकरण झाले. कथा, कविता व नाटयलेखनासाठी एका अनुभवाचे बीज नवलेखकांना दिले होते. त्यांच्या सादरीकरणावर प्रा. मुंढे यांनी सविस्तर भाष्य केले.

समारोप समारंभाचे प्रास्ताविक प्रा. अरविंद बोंद्रे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. राजेंद्र मुढे यांनी केले. संचालन कार्यशाळेचे समन्वयक डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी केले. नवलेखक कार्यशाळेत सहभागी प्रतिनिधींना पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करुन कार्यक्रमाची सांगता झाली.

## १०.४ विभागीय केंद्र कोंकण :-

### ४.१ - जुलै २००९ - कृषीदिन कार्यक्रम :-

दिनांक १ जुलै २००९ कृषीदिनी शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. त्याचे उद्‌घाटन डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाचे, कुलगुरु डॉ. विजय मेहता यांचे शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमास रत्नागिरीचे आमदार श्री. उदय सामंत, विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, रत्नागिरी मध्यवर्ती बँकेचे संचालक श्री. श्यामसुंदर सावंत, रत्नागिरी जिल्हा समिती अध्यक्ष श्री. चंद्रकांत बाईत, कृषी विद्यापीठाचे संचालक श्री. अशोक पोवार हे उपस्थित होते. यावेळी कोकण विभागीय केंद्र रत्नागिरीच्या सन २००८-२००९ या कालावधीच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमात केंद्रातर्फे घेण्यात आलेल्या खरीप हंगामातील नाचणी व बांधावरील तूर पिक स्पर्धेतील विजेत्यांचा रोख रक्कम, प्रशस्तीपत्रक, सन्मान चिन्ह व नारळाचे रोप देऊन सत्कार करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रात पुरस्कार मिळविणा-या मान्यवरांचे जाहीर सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी शेतक-यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला शेतकरी, बागायतदार, महिला यांची मोठया प्रमाणात उपस्थिती होती.

### ४.२ - १५ ऑगस्ट २००९ - कोकणातील रातांबा फळझाडांच्या लागवडीचा शुभारंभ :-

कोकणातील रातांबा या पारंपारिक फळझाडांची कोकणच्या ग्रामीण भागांत मोठया प्रमाणावर लागवड व्हावी व त्यातून स्थानिकांना कोकम सरबत, आमसुले, कोकम तेल यासारख्या कोकणी मेव्यातून रोजगार मिळविता यावा या उद्देशाने केंद्रामार्फत शालेय विद्यार्थ्यांकडून येत्या तीन वर्षात दीड लाख रातांबा रोपांची लागवड करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यासाठी लागणारी रोपे विविध स्वयंसेवी संस्था व महिला बचत गटांकडून तयार करुन घेण्यात येत आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला दोन रातांबा रोपे वाटप करण्यात येणार आहेत. या उपक्रमाचा शुभारंभ या वर्षीच्या १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी खेड येथून करण्यात आला.

### ४.३ - सप्टेंबर २००९ - वनौषधी लागवडींचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम :-

विभागीय केंद्राच्यावतीने कोकणातील दुर्लक्षित वनौषधींचा खजिना पुन्हा समृध्द करण्यासाठी गेले वर्षभर शेतक-यांमध्ये जाणीव - जागृतीचे उपक्रम राबविण्यात आले. त्याला यश येऊन सन २००९ च्या पावसाळयात रत्नागिरी जिल्हयात प्रायोगिक स्वरुपात विविध प्रकारच्या औषधी वनस्पतींच्या लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या लागवडीसाठी लागणारी रोपे आणि बियाणी कोकण कृषी विद्यापीठामार्फत लाभार्थींना उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. कोकण विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विजय मेहता, कृषी विद्यापीठाच्या वनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. संजय भावे, डॉ. दिगंबर मोकाट यांचे या महत्त्वाकांक्षी उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मौलिक सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे. या उपक्रमामुळे कोकणात वनौषधी लागवडीबाबत शेतक-यांमध्ये जागृती निर्माण होवून दुर्मिळ औषधी वनस्पती पुन्हा समृध्द होण्यास मदत होणार आहे.

### ४.४ - १ ऑक्टोबर २००९ - ज्येष्ठ नागरिक दिन :-

कोकण केंद्राच्यावतीने ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त दिनांक १ ऑक्टोबर २००९ रोजी रत्नागिरी येथे 'ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा' आयोजित करण्यात आला. ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्हयांतील सामाजिक क्षेत्रात योगदान

दिलेल्या सात ज्येष्ठ नागरिकांची सत्कारासाठी निवड करण्यात आली होती. सन्माननीय ज्येष्ठ नागरिकांचा शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह, पुष्पगुच्छ व यशवंतराव चव्हाण यांचे 'सहयाद्रीचे वारे' हे पुस्तक भेट म्हणून देवून विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये व उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर यांचे हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथी वयोवृध्द माजी आमदार श्री. शशिशेखर आठल्ये गुरुजी (वय वर्षे ९८) व प्रतिथयश वयोवृध्द डॉ. वि. म. शिंदे यांचे प्रमुख उपस्थितीत ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान कार्यक्रम संपन्न झाला.

**४.५ - ५ ऑक्टोबर २००९ - कै. भाऊसाहेब नेवाळकर स्मृतिदिनानिमित्त औद्योगिक चर्चासत्र :-**

कोकण विभागीय केंद्र रत्नागिरी व सहजीवन कॉलेज, खेड यांचे संयुक्त विद्यमाने 'असा घडतो उद्योजक' या विषयावर औद्योगिक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यामध्ये सुप्रसिध्द उद्योजक श्री. हिराभाई बुटाला, श्री. सुनिल शिर्के, श्री. मिलींद बारटक्के, श्री. प्रशांत पटवर्धन यांनी चर्चेद्वारे उपस्थितांना मार्गदर्शन केले.

**४.६ - ६ नोव्हेंबर २००९ - महिलांसाठी निसर्गोपचार शिबीर (भोम) :-**

महिलांना औषधी वनस्पतींची ओळख व उपयोग यासाठी भोम, तालुका चिपळूण येथे विभागीय केंद्र कोंकण व यशवंत शिक्षण संस्था, भोम तसेच रत्नागिरी जिल्हा महिला पतसंस्था यांचे संयुक्त विद्यमाने महिलांसाठी 'वनौषधी ओळख' शिवीर घेण्यात आले. या शिबीरामध्ये वनौषधीचे महत्व पटवून देवुन त्यांचे संवर्धन होणे का गरजेचे आहे हे सांगण्यात आले. वनौषधी संबंधी माहिती देण्यासाठी डॉ. जाधव, शेतीमळा, सावर्डे यांना बोलविण्यात आले होते.

**४.७ - १४ नोव्हेंबर २००९ - शिक्षक दिन :-**

विभागीय केंद्र कोकण व न्यू एज्युकेशन सोसायटी, लांजा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ५ सप्टेंबर शिक्षक दिनी केंद्राच्यावतीने संपन्न होणारा 'आदर्श शिक्षक पुरस्कार' वितरणाचा कार्यक्रम दिनांक १४ नोव्हेंबर २००९ रोजी कला वाणिज्य महाविद्यालय, लांजा येथे संपन्न झाला. केंद्राचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन तसेच पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते श्री. शांताराम सुर्वे तसेच आदर्श शिक्षक सौ. साधना बावधनकर, सौ. पुष्पलता जगताप, श्री. महादेव पन्हळेकर यांचे शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह देवून संस्थेचे विश्वस्त श्री. भाऊ वंजारे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास सौ. युगंधरा राजेशिर्के उपस्थित होत्या.

**४.८ - २५ नोव्हेंबर २००९ - मा. यशवंतराव चव्हाण स्मृतीदिन :-**

विभागीय केंद्र कोकण व सहयाद्री शिक्षण संस्था, सावर्डे यांचे संयुक्त विद्यमाने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या २५ व्या स्मृतीदिनानिमित्त दिनांक २५ नोव्हेंबर २००९ रोजी सहयाद्री शिक्षण संस्था, सावर्डे येथे जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा व बक्षिस समारंभाचा भव्य कार्यक्रम ज्येष्ठ पत्रकार, चरित्रकार व यशवंतराव चव्हाण यांचे स्नेही मा. श्री. रामभाऊ जोशी यांचे प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. यशवंतराव चव्हाण यांच्या २५ व्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून प्रथम तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. प्रत्येक तालुक्यातील प्रथम क्रमांकाची निवड जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी करण्यात आली. यावेळी ८ स्पर्धक सहभागी झाले होते. त्यामधून ३ विजयी क्रमांकाची निवड करण्यात आली. विजेत्यांना प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह, रोख रक्कम, गुलाबपुष्प व 'यशवंत स्मृती सुगंध' हे पुस्तक देवून मा. श्री. रामभाऊ जोशी यांचे हस्ते गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला केंद्राचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, सौ. युगंधरा राजेशिर्के, सहयाद्री शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती अनुराधा निकम, कार्याध्यक्ष श्री. शेखर निकम, उपस्थित होते. कार्यक्रमाचे अतिशय देखणे आयोजन केल्याबद्दल सहयाद्री शिक्षण संस्थेला व विभागीय केंद्राला श्री. रामभाऊ जोशी यांनी धन्यवाद दिले.

**४.९ - १८ डिसेंबर २००९ - सोयाबीन प्रशिक्षण :-**

विभागीय केंद्र कोकण व कृषी विज्ञान केंद्र, देवधे, लांजा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १८ डिसेंबर २००९ रोजी महिलांना सोयाबीनपासून विविध पदार्थ वनविण्याचे एकदिवसीय प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी भोपाळ येथील सोयावीन उपयोगिता केंद्राचे तांत्रिक प्रशिक्षक श्री. वी. मेस्त्री व प्रा. सौ. सुमेधा देशपांडे यांनी सोयावीनपासून विविध पदार्थ प्रात्यक्षिकासह करुन दाखविले. यामध्ये सोयावीनपासून दूध, पनीर, दही, शिरा, भजी, भाकरी, सोया नमकीन असे विविध पदार्थ कसे करायचे त्याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षणार्थी महिलांच्या सहकार्याने करुन दाखविले.

**४.१० - ५ डिसेंबर २००९ - शरीर सौष्ठव स्पर्धा :-**

चिपळूण येथील प्रेरणा प्रतिष्ठान व केंद्राच्या नवमहाराष्ट्र युवा अभियान यांचे संयुक्त विद्यमाने चिपळूण शहरातील इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्रा समोरील पटांगणातील यशवंतराव चव्हाण क्रीडा नगरीत आयोजित 'राज्यस्तरीय शरीर सौष्ठव निवड स्पर्धा' घेण्यात आली. या स्पर्धेत चिपळूणच्या श्री. राजेंद्र मोडक यांनी 'रत्नागिरी प्रेरणा उदय', रत्नागिरीच्या श्री. वैभव कांबळे यांनी 'रत्नागिरी प्रेरणा श्री', तर चिपळूणच्या श्री. अशोक चव्हाण यांनी 'रत्नागिरी प्रेरणा श्रीमानचा' बहुमान पटकावला. या स्पर्धेत राज्यातील १०५ स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्‌घाटन केंद्राच्यो अध्यक्षांनी केले. कार्यक्रमास नगरसेवक श्री. राजू देवळेकर, नगरसेविका सौ. हर्षदा भोसले व केंद्राचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**४.११ - २ जानेवारी २०१० - वनौषधी शिबीर :-**

कोकण विभागीय केंद्र व रत्नागिरी जिल्हा महिला पतसंस्था मर्यादित, रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने तालुका लांजा येथील रासाई मंडळ, मावळतवाडी, कुवे येथे दिनांक २ जानेवारी २०१० रोजी ग्रामीण भागातील महिलांसाठी वनौषधी शिवीर आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये १०० ते १५० वनस्पतींची ओळख करुन देण्यात आली. वनस्पतींचे उपयोग व त्यापासून स्वयंरोजगार कसा निर्माण करता येईल याचीही माहिती देण्यात आली. या प्रशिक्षणाला वनौषधी तज्ज्ञ श्री. विनायक वापट यांनी मार्गदर्शन केले. औपधी वनस्पती कोणत्या व त्यांचे महत्व याची माहिती सौ. राजेशिर्के यांनी महिलांना दिली. केंद्रामार्फत रावविण्यात येणा-या विविध उपक्रमांची माहिती कार्यालयीन सचिव श्रीमती प्राची शिंदे यांनी दिली.

**४.१२ - २ जानेवारी २०१० - 'कसे असावे वक्तृत्व' या विषयावर कार्यशाळा शिबीर :-**

कनिष्ठ महाविद्यालयीन मुलांच्या 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण' या विषयावर दिनांक ३१/१/२०१० रोजी 'वक्तृत्व स्पर्धा' संपन्न झाल्या. या वक्तृत्व स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी एकदिवसाची कार्यशाळा दिनांक २ जानेवारी २०१० रोजी डी.वी.जे. कॉलेज चिपळूण येथे विभागीय केंद्र कोकण व डी. बी.जे. कॉलेज चिपळूण यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. ही कार्यशाळा ११ ते २ व ३ ते ५ या दोन सत्रांत घेण्यात आली. या कार्यशाळेला प्रवचनकार श्री. धनंजय चितळे, कथाकथनासाठी श्री. प्रशांत पटवर्धन, वक्तृत्वामध्ये साहित्याचा वापर यावर प्रा. सौ. मिनल ओक, प्रा. सौ. कुलकर्णी, उत्तम सूत्रसंचालन कसे असावे यासाठी सौ. अपर्णा कदम तसेच श्री. मंदार ओक, श्री. शिरीष काटकर या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. चिपळूण व्यतिरिक्त इतर तालुक्यातून आलेल्या मुलांना जाण्या येण्याचे एस.टी. तिकीटाचे पैसे केंद्रातर्फे देण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. बापू काणे व सौ. युगंधरा राजेशिर्के यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना केंद्राचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांचे हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

**४.१३ - फेब्रुवारी २०१० - मत्स्य प्रक्रिया प्रशिक्षण :-**

कोकण विभागीय केंद्र, जिल्हा समिती रत्नागिरी व कोकण कृषी विद्यापीठ दापोली, मत्स्य महाविद्यालय शिरगांव, रत्नागिरी यांचे संयुक्त विद्यमाने 'मत्स्य प्रक्रिया प्रशिक्षण' शिवीर दिनांक ७ फेब्रुवारी २०१० रोजी वेळणेश्वर, तालुका गुहागर येथे

आयोजित करण्यात आले. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली विस्तार शिक्षण विभागाचे संचालक डॉ. अशोक पोवार, कोकण विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, सहयाद्री शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. शेखर निकम, सौ. युगंधरा राजेशिर्के, मत्स्य महाविद्यालय, शिरगांव, रत्नागिरीचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शेखर कोवळे यांनी मार्गदर्शन केले.

या शिबीरात वेळणेश्वर येथील मत्स्य व्यवसाय करणा-या महिलांसाठी खास मच्छीपासून विविध प्रकारचे टिकाऊ पदार्थ बनविण्याचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. मत्स्य महाविद्यालयातील प्राध्यापक वर्गाने हे प्रशिक्षण दिले. यामध्ये जवळा (कोलीम) चटणी, कोळंबीचे टिकाऊ लोणचे, मच्छी बॉल करी, फीश कटलेट या पदार्थांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले व पदार्थ टिकविण्यासाठी काय करावे तेही दाखविण्यात आले. तसेच कोणताही पदार्थ प्रथम नजरेने खरेदी केला जातो यासाठी डेकोरेशनही दाखविण्यात आले. या प्रशिक्षणाचा लाभ १०० ते १२५ स्त्री पुरुषांनी घेतला.

**४.१४ - मा. यशवंतराव चव्हाण यांची २५ वी पुण्यतिथी :-**

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या २५ व्या स्मृतीदिनानिमित्त 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण' या विषयावर सिंधुदुर्ग जिल्हयात वेंगुर्ले येथे जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. विभागीय केंद्र कोकण व एम. के. गावडे प्रबोधिनी यांचे संयुक्त विद्यमाने या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये शिवराज मराठा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, साळगावची कु. रोशनी पालकर 'प्रथम', बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालयाची कु. माधवी गोवेकर 'द्वितीय' व प्रमोद रविंद्र धुरी अध्यापक विद्यालय, साळगावची कु. प्रगती भोसले हिने 'तृतीय' क्रमांक मिळविला. स्पर्धेतील विजेत्यांना मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक व रोख रक्कमेची बक्षिसे देण्यात आली. या स्पर्धेतील स्पर्धकांनी मा. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रासाठी दिलेल्या योगदानाचे वर्णन केले. यामध्ये प्रभावी संसदपटू, शेतकरी, शेतमजूर, तळागाळातील लोकांना दिलेला न्याय, क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक सहकारामध्ये दिलेल्या योगदानाला स्पर्धकांनी उजाळा दिला. त्यांच्या विचाराने चालल्यास राज्याचा विकास हा निश्चित असल्याचे विचार स्पर्धकांनी मांडले. या स्पर्धा ॲड. किशोर शिरोडकर, विभागीय केंद्राचे खजिनदार श्री. एम. के. गावडे, सौ. प्रज्ञा परब यांनी यशस्वी केल्या.

**४.१५ - ८ मार्च २०१० - जागतिक महिला दिन कार्यक्रम :-**

दिनांक ८ मार्च २०१० ते ११ मार्च २०१० या कालावधीत कोकण विभागीय केंद्र व पद्मावती सोशल फौंडेशनच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रत्नागिरीतील माळनाका येथील नगरपरिषदेच्या व्यायाम शाळेच्या आवारात 'जागतिक महिला दिन' साजरा करण्यात आला.

यावेळी वरील कालावधीत बचत गटातील महिलांनी बनविलेल्या मालाचे प्रदर्शन व विक्री स्टॉल उभारण्यात आले होते. तसेच दिनांक ८ मार्च ते ११ मार्च असे चार दिवस महिलांसाठी फनी गेम्स व विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या प्रदर्शनाचे उद्घाटन ८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता दैनिक रत्नागिरी टाइम्स वृत्तपत्राच्या मालक सौ. उर्मिला घोसाळकर यांचे शुभहस्ते दीपप्रज्वलन करुन करण्यात आले. यावेळी सौ. युगंधरा राजेशिर्के, प्रथितयश उद्योजक श्री. महेंद्रशेठ जैन, पद्मावती सोशल फौंडेशनच्या सौ. रचना जैन, श्री. विकी जैन व बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.

दिनांक ११ मार्च २०१० रोजी सायंकाळी ५ वाजता मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. त्यावेळी चिपळूणच्या वैद्यकीय अधिकारी आनंदीबाई पुरस्कार प्राप्त सौ. आरती पंडित प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमामध्ये महिलांसाठी घेण्यात आलेल्या फनी गेम्स व विविध स्पर्धांचा बक्षिस वितरण समारंभ मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. तसेच महिलांच्या दिनांक ११ मार्च २०१० रोजीच्या उपस्थितीवर लकी ड्रॉ काढण्यात आला. कार्यक्रमाचेवेळी मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. तसेच महिला बचत गटातील महिलांनीही आपल्या मालाची विक्री होवून आर्थिक लाभ झाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करुन विभागीय केंद्राकडून मिळत असलेल्या मार्गदर्शन व सहकार्याबद्दल धन्यवाद दिले.

**४.१६ - १२ मार्च २०१० - मा. यशवंतराव चव्हाण जयंती :-**

कोकण विभागीय केंद्र व वराडकर बेलोसे महाविद्यालय, दापोली यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १२ मार्च २०१० रोजी मा. यशवंतराव चव्हाण यांची ९७ वी जयंती दापोली येथील आर.आर. वैद्य इंग्लिश स्कूलच्या सभागृहात संपन्न झाली. या कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक श्री. अरुण साधू यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. प्रथम प्रमुख पाहुण्यांचे हस्ते दीप प्रज्वलन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या फोटोला पुष्पांजली वाहून या थोर लोकनेत्याचे स्मरण केले. प्रमुख अतिथी श्री. अरुण साधू यांचा शाल, श्रीफळ, मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन ॲड. श्री. बाळासाहेब बेलोसे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यानंतर विविध क्षेत्रात प्रावीण्य मिळविणा-या खेळाडूंचा व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मंडणगड शिक्षण प्रसारक मंडळ, दापोलीचे अध्यक्ष ॲड. बाळासाहेब बेलोसे यांनी भूषविले. मान्यवरांच्या गौरव सोहळयानंतर ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक मा. श्री. अरुण साधू यांचे 'यशवंतराव चव्हाण व सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र' या विषयावर व्याख्यान झाले. व्याख्यानात त्यांनी यशवंतरावांचे बालपण, शालेय, महाविद्यालयीन जीवन, त्यांची विचारांची प्रगल्भता, साहित्यिक प्रगल्भता अशा सर्वांगांना स्पर्श केला. आपल्या राज्याची निर्मिती झाल्यानंतर व त्याआधी मोठे राज्य असतानाही मा. चव्हाण यांचा राज्याच्या प्रगतीत सिंहाचा वाटा आहे. परंतु त्यांच्यावर अनेकांनी टीका केली. मात्र सकारात्मक विचार, नम्रपणा, प्रगल्भ बुध्दिमत्ता, अभ्यासू व वैचारिक व्यक्तिमत्त्व या जोरावर त्यांनी राज्याला आदर्श घालून दिला असल्याचे श्री. साधू यांनी सांगितले.

आपल्या अध्यक्षीय समारोपात ॲड. बेलोसे यांनी यशवंतराव चव्हाणांचे अष्टपैलू चौफेर व्यक्तिमत्त्व, पुरोगामी विचार, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान बहुजनांच्या उन्नतीसाठी सतत प्रयत्न हे सर्व आजच्या युवा पिढीसाठी दिपस्तंभाप्रमाणे आहे. भूमिगत चळवळीच्या वेळी यशवंतरावांना प्रत्यक्ष पहाण्याचे भाग्य या दापोली तालुक्यातील पालगड येथील बेलोसे कुटुंबियांना लाभले. त्यामुळे त्यांचे स्मारक दापोली येथे होण्याच्या दृष्टीने मी व माझी संस्था सर्वांना बरोबर घेवून प्रयत्नशील राहू अशा भावपूर्ण शब्दात श्री. बेलोसे यांनी ग्वाही दिली.

सौ. युगंधरा राजेशिर्के यांनी आपल्या मनोगतात यशवंतरावांच्या कार्याची ओळख युवा पिढीला व्हावी यासाठी प्रतिष्ठान अनेक कार्यक्रम राबवित आहे. या कार्यक्रमांना युवा पिढीचा सकारात्मक प्रतिसाद लाभत आहे अशा भावना व्यक्त केल्या.

**४.१७- २ मार्च २०१० - केंद्राच्या चाकोरी बाहेरील कार्य -**

स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत एस.टी. येईल अशा प्रतीक्षेत असलेल्या सातारा जिल्हयातील महाबळेश्वर तालुक्यातील कोयना - कांदाटी खो-यातील १६ गावांत रत्नागिरीच्या खेड डेपोतून एस.टी. गेली आणि तेथे ग्रामस्थांच्या आनंदाला पारावार उरला नाही. सर्वांनी जणू दिवाळी साजरी केली. छोटया मुलांना एस.टी. लाल रंगाची असते याचेच अधिक कुतूहल वाटत होते. हे पाहून उपस्थित पाहुणेही अचंबित झाले. कोकण विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, खेडचे प्रसिध्द उद्योजक श्री. हिराभाई बुटाला, उद्योजक श्री. सुनिल शिर्के, जिल्हाध्यक्षा सौ. युगंधरा राजेशिर्के, सचिव श्रीमती प्राची शिंदे यांनी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे व सततच्या पाठपुराव्यामुळे वन विभागाने आपली जागा वहातुकीस खुली करुन दिली. रत्नागिरी एस.टी. विभाग नियंत्रक श्री. सुहास जाधव व त्यांच्या सहका-यांनी ऐन सुट्टीच्या दिवशीही रस्ता पहाणी करुन एस.टी. या मार्गावर सुरु करण्याचे आदेश २४ तासात दिल्याने गुढीपाडव्याच्या पूर्व संध्येला नव्या वर्ष दिनी या १६ गावांत वहातूक सुरु झाल्याने आनंद संचारला. विभागीय केंद्राच्या पाठपुराव्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्याचे सातारा व रत्नागिरी विभागाचे अधीक्षक अभियंता यांनी संबंधित अधिका-यांना सूचना देऊन रस्त्याची आवश्यकती दुरुस्ती केल्याने वहातूकीचा मार्ग मोकळा होवू शकला.

प्रथमच गांवात आलेल्या एस.टी. च्या स्वागतासाठी सरपंच सौ. निलम जंगम, कोयना - कांदाटी पुनर्वसन सेवासंघाचे अध्यक्ष श्री. हरिश्चंद्र जंगम उपस्थित होते. श्री. जंगम गुरुजी यांनी आयोजित केलेल्या आनंद सोहळयात गावात एस.टी. आणण्यात महत्वाचे योगदान देणा-या सर्वांचे १६ गावांच्यावतीने सत्कार केले. यावेळी १६ गावातील ग्रामस्थ, महाबळेश्वर पंचायत समितीचे सभापती श्री. अमित कदम, ॲड. संजय जंगम व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. यावेळी ११० वर्षांचे श्री. बाबूरावजी चव्हाण यांनी आपण आपल्या हयातीत गावात एस.टी. आलेली पाहिली असे समाधानाचे उद्गार काढले. त्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

**१०.५. विभागीय केंद्र नाशिक :-**

५.१ - **दि. २४ एप्रिल २००९ - 'घाशीराम कोतवाल ते शेवरी' नाटय-चित्रपट प्रवास - डॉ. मोहन आगाशे** -

विभागीय केंद्र, नाशिक व कुसुमाग्रज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने प्रसिध्द अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांचे 'घाशीराम कोतवाल ते शेवरी' नाटय-चित्रपट प्रवास या विषयावर दृकश्राव्य व्याख्यान आयोजित केले होते. याप्रसंगी विभागीय केंद्राचे सचिव ॲड. विलास लोणारी यांनी प्रास्ताविक केले व परिचय कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर यांनी केला. याप्रसंगी अध्यक्ष श्री. विनायकराव पाटील, श्री. माधवराव पाटील, डॉ. श्री. वसंत पवार, श्री. लोकेश शेवडे, डॉ. रामदास बरकले इत्यादी तसेच मोठया संख्येने रसिक उपस्थित होते.

५.२ - **दि. २५ व २६ एप्रिल २००९ - 'वारली चित्रकला' कार्यशाळा :-**

आदिवासींच्या जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या 'वारली चित्रकला' या अनोख्या चित्रशैलीचा परिचय व्हावा यासाठी नाशिक येथे वारली चित्रकला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात प्रात्यक्षिक कार्यशाळा, चित्रप्रदर्शन व मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को.ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, ओकार्ड हॉस्पिटल, शब्दश्री प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा दिनांक २५ व २६ एप्रिल २००९ रोजी कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक येथे संपन्न झाली. कार्यशाळेचे उद्घाटन दिनांक २५ एप्रिल २००९ रोजी विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. विनायकराव पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर व अभिनेत्री श्रीमती इंद्राणी मुखर्जी उपस्थित होत्या. यावेळी वारली चित्रकार श्री. विनू भावर यांच्या चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी श्री. भावर यांनी प्रात्यक्षिकेही सादर केली. या कार्यशाळेत १५० कलाप्रेमींनी सहभाग घेतला

५.३ - **दि. २७ जून २००९ - मा. यशवंतराव चव्हाण फिल्म फेस्टिव्हल :-**

विभागीय केंद्र, नाशिक, फिल्म डिव्हीजन, भारत सरकार व दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ जून २००९ रोजी 'यशवंतराव चव्हाण फिल्म फेस्टिव्हल २००९' संपन्न झाला. मुंबई येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील लघुपट विभागात सन्मानीत करण्यात आलेल्या चित्रपटांचा महोत्सव दि इन्स्टिटयूट ऑफ इंजिनीअर्सच्या उंटवाडी रोडवरील सभागृहात आयोजित करण्यात आला व लघुपटावर मुक्त चर्चाही आयोजित करण्यात आली. फिल्म फेस्टिव्हलमध्ये श्री. धीरज मेश्राम दिग्दर्शित 'हरवलेले इंद्रधनुष्य', श्री. लक्ष्मीकांत शेरगांवकर दिग्दर्शित 'दि सी साईड स्टोरी', श्री. अश्विनकुमार दिग्दर्शित 'लिटल टेररीस्ट' हे चित्रपट दाखविण्यात आले.

५.४ - **दि. ११ व १२ जुलै २००९ - पुस्तक प्रकाशन व व्याख्यान :-**

विभागीय केंद्र, नाशिक, गौतमी प्रकाशन, नाशिक व कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक यांचे संयुक्त विद्यमाने श्रीमती भारती ठाकूर लिखित 'नर्मदा' परिक्रमा : एक अंतर्यात्रा' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा दिनांक ११ जुलै २००९ रोजी संपन्न झाला.

यावेळेस कवयित्री व लेखिका डॉ. अरुणा ढेरे या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. श्रीमती भारती ठाकूर या मनोगत व्यक्त करतांना म्हणाल्या की, 'नर्मदा', तिच्या काठावरची असंख्य माणसे आणि संपूर्ण निसर्ग यांचे मैत्र परिक्रमेमध्ये आम्ही जपले आणि तेच शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न प्रस्तुत पुस्तकात आहे. गौतमी प्रकाशनाचे श्री. निषाद देशमुख यांनी प्रास्ताविक केले. ॲड. विलास लोणारी यांनी स्वागत केले. कार्यक्रमास आ. हेमंत टकले, श्री. विश्वास ठाकूर, श्री. माधवराव पाटील, श्री. लोकेश शेवडे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच दिनांक १२ जुलै २००९ रोजी डॉ. आत्माराम पवार यांचे 'औषधांची ऐशी की तैशी' या विषयावर जाहीर व्याख्यान आयोजित केले होते.

**५.५ - दि. २७ जुलै २००९ - 'गालातील हास्य - गालावरील धारा' कविता मैफल :-**

विभागीय केंद्र, नाशिकतर्फे सुप्रसिद्ध कवी रामदास फुटाणे, कवी फ. मु. शिंदे व कवी सुरेश शिंदे यांच्या 'गालातील हास्य - गालावरील धारा' हा कवितांचा जाहीर कार्यक्रम दिनांक २७ जुलै २००९ रोजी संपन्न झाला.

अवतीभोवती घडणारे राजकारण, समाजकारण, सांस्कृतिक घडामोडी यातील व्यंगावर प्रहार करीत व त्यातील विरोधाभासावर विनोदी भाष्य करुन त्यांनी रसिकांना अंतर्मुख केले. वीजेचे प्रश्न, भारनियमन, खेडयापाडयातील शेतक-यांची हलाखीची परिस्थिती यांचा वेध घेतानाच सरकारचे शिक्षणाचे धोरण आणि त्यामुळे शिक्षणाची झालेली हेळसांड, सामान्य माणसाचे प्रश्न आणि राजकारण्यांना असलेले त्यांचे वावडे यांचा परखड वेधच त्यांनी आपल्या कविता व वात्रटिकांमधून घेतला. याप्रसंगी महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती पुरस्कार विजेती धावपटू श्रीमती कविता राऊत व शासनाचा एकलव्य पुरस्कारप्राप्त जलतरणपटू श्री. हंसराज पाटील यांचा सत्कार कवि रामदास फुटाणे यांच्या हस्ते करण्यात आला. रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हेही या मैफिलीचे वेगळेपण ठरले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन श्री. विश्वास ठाकूर यांनी केले. कार्यकमासाठी विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. विनायकराव पाटील, महाराष्ट्र राज्याच्या आरोग्य राज्यमंत्री ना. डॉ. शोभाताई वच्छाव व केंद्राचे इतर मान्यवर सदस्य उपस्थित होते.

**५.६ - दि. २९ व ३० जुलै २००९ - दोन दिवसीय व्याख्यानमाला -**

**अ) दि. २९ जुलै २००९ श्री. निनाद बेडेकर : नाशिकचं वाढतं महत्व :-**

विभागीय केंद्र, नाशिक, संस्कृति वैभव, कुसुमाग्रज वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. श्री. निनाद बेडेकर यांनी 'नाशिकचं वाढतं महत्त्व' या विषयावर विचार व्यक्त केले.

**ब) दि. ३० जुलै २००९ - बदलती सामाजिक परिस्थिती आणि आपली भूमिका - श्रीमती कुमुदिनी भार्गव :-**

विभागीय केंद्र, नाशिक, संस्कृति वैभव, कुसुमाग्रज वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या व्याख्यानाच्या दुस-या दिवशी श्रीमती कुमुदिनी भार्गव यांनी 'बदलती सामाजिक परिस्थिती आणि आपली भूमिका' या विषयावर आपले विचार व्यक्त केले. या व्याख्यानासाठी श्री. विनायकराव पाटील, पोलीस आयुक्त श्री. विष्णू देव मिश्रा आदी मान्यवर उपस्थित होते.

**५.७ - दि. १५ ऑगस्ट २००९ - वृक्षारोपण :-**

विभागीय केंद्र, नाशिक, कोका-कोला लिमिटेड व विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने अंबड येथील सामाजिक वनीकरण विभागाने कोका-कोला कंपनीला दिलेल्या जागेत स्वातंत्र्यदिना निमित्ताने दिनांक १५ ऑगस्ट २००९

रोजी वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पर्यावरण संतुलनाकडे प्रत्येकाने मूलभूत जाणीवेतून वघणे गरजेचे असून त्यासाठी वृक्षरोपणासारखे उपक्रम हाती घेणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे 'ग्लोबल वार्मिंग' सारख्या संकटावर आपण निश्चित मात करु. म्हणूनच तर पर्यावरण रक्षणाची जनचळवळ उभी राहणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर यांनी केले. याचबरोवर कंपनी आदिवासी खेडयांमध्ये राबवत असलेल्या विविध सातत्यपूर्ण उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. केंद्राच्या सदस्य व नगरसेविका सौ. अश्विनी बोरस्ते यांनी मनोगत व्यक्त केले.

**दि. १५ ऑगस्ट २००९ - 'स्वाईन-फ्लू' अभिनव जनजागृती मोहिम :-**

सर्वत्र भिती निर्माण केलेल्या 'स्वाईन-फ्लू' विषयी सामाजिक भावनेतून या संसर्गजन्य आजाराविषयी शास्त्रीय दृष्टीकोनातून जनहितार्थ माहितीपत्रक विभागीय केंद्र, नाशिक, विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक व कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १५ ऑगस्ट २००९ रोजी प्रकाशित केले. या माहितीपत्रकातून 'स्वाईन-फ्लू' विषयी असलेले गैरसमज दूर होण्यास मदत होईल व खबरदारीचे उपाय म्हणून यातील माहितीचा निश्चितच उपयोग होईल हा या उपक्रमा मागील उद्देश आहे. सुमारे तीन लाख माहितीपत्रके वाटपाचे काम झाले आहे. नाशिकमधील विविध शाळा, महाविद्यालये, डॉक्टर्स, औषधांची दुकाने, एस.टी. स्टॅन्ड, रेल्वे स्टेशन, सामाजिक संस्था यांना याचे वाटप करण्यात आले. यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 'स्वाईन-फ्लू' विषयीच्या जनजागृती चळवळीत जास्तीत जास्त नागरिकांनी सहकार्य करावे तसेच अफवांवर विश्वास ठेऊ नये असे आवाहन विभागीय केंद्र नाशिकचे अध्यक्ष श्री. विनायकराव पाटील, कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे कार्यवाह ॲड. विलास लोणारी व विश्वास को-ऑप. बँकेचे अध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर यांनी केले.

**५.८ - दि. २७ ऑगस्ट २००९ - सुप्रसिध्द अभिनेते अतुल कुलकर्णी यांची मुलाखत - मुलाखतकार अभिनेते श्री. किशोर कदम ऊर्फ कवी सौमित्र -**

विभागीय केंद्र, नाशिकतर्फे गुरुवार दिनांक २७ ऑगस्ट २००९ रोजी सुप्रसिध्द चित्रपट अभिनेते श्री. अतुल कुलकर्णी यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित केला होता. अभिनेते श्री. अतुल कुलकर्णी यांची मुलाखत घेण्यासाठी केंद्राने अभिनेते श्री. किशोर कदम ऊर्फ कवी सौमित्र यांना निमंत्रित केले होते.

विचार हृदयाने नव्हे तर डोक्याने करायचा असतो. मोठयांचा आदर जरुर करावा पण संस्कारांना तार्किकता असली पाहिजे. अध्यात्माचा देवाशी, कर्मकांडाशी अजिबात संबंध नाही. संक्रमणावस्थेत जुनेच पकडून ठेवले तर आपली फरफट होतच राहील, असा जगण्याविषयीचा मोलाचा संदेश त्यांनी आपल्या मुलाखतीद्वारे उपस्थितांना परखडपणे दिला. श्री. अतुल कुलकर्णी म्हणाले की, घरची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल झाल्यामुळे वयाच्या सत्तावीसाव्या वर्षी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामध्ये प्रवश घेऊन डॉक्टर/इंजिनीअर होण्यापेक्षा अभिनयसंपन्न कलावंत होण्याचं शिक्षण घेण्याचं ठरविलं. लौकिकअर्थाने व्यक्तीरेखा रंगविण्यापेक्षा माहित नसलेली व्यक्तीरेखा रंगवणं हे खरं कौशल्य असतं. 'दम' चित्रपटातील एन्काऊंटर शंकरची भूमिका रंगवतांना हे कौशल्य वाढवलं, असे सांगून अभिनेता म्हणून चित्रपटांसह नाटकांत केलेल्या भूमिकांचा प्रवास कथन केला. यावेळी श्री. किशोर कदम यांनी त्यांना कलाप्रवासाबरोबरच राजकारण, समाजकारण, शिक्षण व्यवस्था, संस्कृति इत्यादी विषयांवर बोलते केले.

तत्पूर्वी अतिथींचे स्वागत नाशिक विभागीय केंद्राचे अध्यक्ष विनायकदादा पाटील व सौ. अश्विनी बोरस्ते यांनी केले. प्रा. डॉ. वृंदा भार्गवे यांनी परिचय करुन दिला. सचिव ॲड. विलास लोणारी यांनी केंद्राची माहिती दिली. सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन केंद्राच्या कोषाध्यक्षांनी केले.

**५.९ - दि. ३० ऑगस्ट २००९ - गणेशोत्सव व पर्यावरण जनजागृती छायाचित्र प्रदर्शन व वक्तृत्त्व स्पर्धा :-**

विभागीय केंद्र, नाशिक, विश्वास को-ऑप. बँक लिमिटेड, नाशिक व वन अर्थ फॅमिली, विश्वास ज्ञान प्रबोधिनी अँड रिसर्च इन्स्टिटयूट यांच्या सहकार्याने 'गणेशोत्सव की प्रदूषणाचा उत्सव' या विषयावरील वक्तृत्त्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळाचे प्रादेशिक अधिकारी श्री. जे. एच. पाटील हे होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केंद्राच्या कोषाध्यक्षांनी केले.

प्रदर्शनाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या वक्तृत्त्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण श्री. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. परीक्षक श्री. सतीश गायधनी यांनी स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा सहभाग सकारात्मक जाणीव निर्माण करणारा आहे, स्पर्धकांनी व्यक्त केलेले विचार नव्या पिढीत प्रदुषणाविषयाची तीव्रता किती आहे याची जाणीव करुन देणारे होते असे सांगितले. याप्रसंगी गरीब विद्यार्थ्यांना कोषाध्यक्षांच्या हस्ते वहया व शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विभागीय केंद्र, नाशिकचे सदस्य डॉ. वसंत पवार, श्री. माधवराव पाटील, समन्वयक श्रीमती दिपाली मानकर, छायाचित्रकार श्री. प्रसाद पवार तसेच 'वन अर्थ' च्या श्रीमती शिल्पा मेंदडकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विभागीय केंद्राचे समन्वयक श्री. विनायक रानडे यांनी केले.

**५.१० - दि. २६ सप्टेंबर २००९ - लेखिका मोनिका गजेंद्रगडकर यांची मुलाखत :-**

विभागीय केंद्र, नाशिकतर्फे दिनांक २६ सप्टेंबर २००९ रोजी सायंकाळी ६ वाजता सुप्रसिध्द लेखिका श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम संपन्न झाला.

वडील मा. विद्याधर पुंडलिक यांनी दिलेला लेखन वाचनाचा संपन्न वारसा आणि भवतालच्या पर्यावरणात घडणा-या घटनांची सांगड घालून स्वतःचा शोध घेण्याचा प्रयत्न आपण लेखनातून करीत आलो आहोत, असे प्रतिपादन लेखिका श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर यांनी केले. यावेळी त्यांनी अनेक विषयांवर मत व्यक्त केले. डॉ. वृंदा भार्गवे यांनी मुलाखत घेतली. वडिलांचे लेखन संस्कार, सर्वश्री श्री. पु. भागवत, मंगेश पाडगांवकर, सरोजिनी वैद्य अशा अनेक साहित्यिकांचा सहवास, सतार वादन, वाचन अशा अनेक विषयांवर डॉ. भार्गवे यांनी त्यांना बोलते केले. माणूस घडण्याची प्रक्रिया आणि त्यातील बदल अधोरेखित करतांना सर्जनशील लेखनाचे सूत्र त्यांनी मांडले. लेखन हे वेगळा विचार देणारे असायला हवे. साहित्याची दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, महानगरीय अशा प्रकारची विभागणी करण्याची गरज काय, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. तरुण पिढीमध्ये साहित्याविषयी असलेली अनास्था, वाचन संस्कृती, माध्यमे यावरही भाष्य केले. 'भूप' व 'आर्त' या कथा संग्रहातील काही कथांची निर्मिती प्रक्रियाही त्यांनी सांगितली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. विनायकराव पाटील होते.

**५.११ - दि. १ ऑक्टोबर २००९ - ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा :-**

'विभागीय केंद्र, नाशिक आणि लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंच' यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांच्या आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कुलगुरु डॉ. सुधीर गव्हाणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे विभागीय संघटक श्रीमती अश्विनी बोरस्ते यांनी केले. लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंचचे अध्यक्ष श्री. रमेश देशमुख यांनी ज्येष्ठ नागरिक मेळावा आयोजनामागची भूमिका सांगितली व विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांमधील ज्येष्ठ नागरिकांचे योगदान किती मोलाचे आहे हे विषद केले. त्याचबरोबर ज्येष्ठांसाठी काम करीत असलेल्या विविध संस्था, त्यांचे कामाचे स्वरुप, विभागवार संस्था याविषयीची माहिती दिली. आजच्या बदलत्या गतीमान जीवनशैलीत ज्येष्ठांच्या विचारांची जपवणूक करण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली.

यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या ज्येष्ठांचा सन्मान करण्यात आला. त्यामध्ये सौ. इंदिराबाई दगाजीराव पाटील, श्रीमती संध्या माधव वैद्य, सौ. वसुधा विद्याधर पाध्ये, श्रीमती सुनिता मोरेश्वर गायधनी, श्री. बापूराव धर्मा भामरे,

प्राचार्य चंद्रकांत विनायक तळवेलकर, श्री. पुंडलिक लक्ष्मण घरटे, श्री. अनंत सिताराम साळी, श्री. रमेश बाळाजी जाधव, प्राचार्य श्री. राम क्षीरसागर, श्री. शरद पुरुषोत्तम बुरकुले यांचा समावेश होता. या सर्व सन्मानार्थींच्या परिचयाचे वाचन केंद्राचे कोषाध्यक्षांनी केले. सत्कारार्थींच्या वतीने श्रीमती सुनिता गायधनी व प्राचार्य श्री. राम क्षीरसागर यांनी मनोगत व्यक्त केले. केंद्राचे अध्यक्ष श्री. विनायकराव पाटील यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. आनंद मेळाव्यात सुप्रसिध्द चित्रकार श्री. रमेश जाधव यांनी १८५७ च्या उठावातील क्रांतीकारकांच्या रेखाटलेल्या चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते त्यालाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आनंद मेळाव्याच्या निमित्ताने सुप्रसिध्द गायक श्री. शाम दशपुत्रे व सहकलाकारांनी सादर केलेला 'रसिका तुझ्याचसाठी' या मैफलीने ज्येष्ठांना आपल्या काळातील भावगीतांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यात त्यांनी जुन्या काळातील अनेक लोकप्रिय गीते सादर केली व रसिकांची वाहवा मिळवली. या कार्यक्रमास सुमारे ५०० पेक्षा अधिक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. य. दा. जोशी यांनी केले व आभार श्रीमती दिपाली मानकर यांनी मानले.

**५.१२- दि. १२ ऑक्टोबर २००९ - हरितक्रांतीचे प्रणेते डॉ. नॉर्मन बोरलॉग या विषयावर प्राचार्य डॉ. जयराम पूरकर यांचे व्याख्यान :-**

विभागीय केंद्रातर्फे डॉ. जयराम पूरकर यांचे 'हरितक्रांतीचे प्रणेते डॉ. नॉर्मन बोरलॉग यांचे कृषी क्षेत्रातील योगदान' या विषयावर व्याख्यान झाले. डॉ. बोरलॉग यांनी स्वतःचे गहू, मका यांचे संशोधन केंद्र स्थापन केले. जगभरातील कृषी, विज्ञान आणि अन्न धोरण सुधारण्यासाठी अथक प्रयत्न केले. त्यासाठी अनेक देशांचा प्रवास केला. निफाडच्या गहू संशोधन केंद्रालाही त्यांचे मार्गदर्शन लाभले, असेही डॉ. पूरकर यांनी सांगितले. आधुनिक शेती, वीज तंत्रज्ञान आणि कृषी क्षेत्राशी संबंधित विषयात बोरलॉग यांनी जागतिक पातळीवर कार्य केले आहे. त्यांच्या संशोधनाला व शोधनिबंधांना आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली आहे. बोरलॉग यांनी अन्न सुरक्षेचे मुख्य सत्र सांगितले. जन्मलेल्या प्रत्येकाचा अन्न हा हक्क आहे, या संकल्पनेचा पुरस्कार करताना आदर्श शेती व सुखी शेतकरी हेच स्वप्न त्यांनी आयुष्यभर पाहिले. त्यांच्या संशोधनाचा फायदा अनेक विकसनशील व प्रगत राष्ट्रांनी घेऊन अन्नधान्यात स्वयंपूर्णता मिळवली. त्यांनी शोधलेल्या नव्या वाणामुळे भारतात गव्हाचे दुप्पट उत्पादन झाल्याचे डॉ. पूरकर यांनी स्पष्ट केले. डॉ. पूरकर म्हणाले की, अन्न सुरक्षिततेचे मुख्य सूत्र सांगणा-या आणि शेतात रमणा-या डॉ. बोरलॉग यांनी जागतिक लोकसंख्या आणि गव्हाचे उत्पादन या गोष्टींचाही विचार केला. शेतीमुळे स्वयंरोजगार, दारिद्रय निर्मूलन, सुसंस्कृत जीवनशैली, सुखाची क्रांती होऊ शकते, असे विचार मांडणा-या डॉ. बोरलॉग यांनी मेक्सिकोसारख्या गव्हाचे उत्पादन कमी असणा-या देशात आपल्या संशोधनाद्वारे अधिक उत्पादन देणा-या गव्हाच्या जाती निर्माण करुन, मेक्सिकोला गहू निर्यातक्षम अग्रेसर देश बनविला. गव्हाबरोबरच मका, ज्वारी या पिकांवरही त्यांनी केलेले संशोधन भारतासारख्या विकसनशील देशालाही पूरक असल्याचे डॉ. पूरकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक केंद्राच्या कोषाध्यक्षांनी केले. या कार्यक्रमास अध्यक्ष श्री. विनायकराव पाटील, प्रा. अशोक सोनवणे, नाशिक आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी श्री. संतोष जाधव, श्री. रमाकांत देशपांडे आदि मान्यवर उपस्थित होते.

**५.१३ - दि. १४ व १५ ऑक्टोबर २००९ - यशवंतराव चव्हाण फिल्म उत्सव :-**

मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील लघुपट विभागात सन्मानित करण्यात आलेले चित्रपट पाहण्याची संधी

'यशवंतराव चव्हाण फिल्म उत्सव' मुळे नाशिककरांना मिळाली. दिनांक १४ व १५ ऑक्टोबर २००९ रोजी या महोत्सवाचे आयोजन विभागीय केंद्र, नाशिक व दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी आणि फिल्म डिव्हीजनतर्फे करण्यात आले होते. समाजातील बदलत्या वास्तवाचा, विषयांचा वेध घेणा-या वैशिष्ट्यपूर्ण चित्रपटांची रसिकांना ओळख व्हावी हा फिल्म उत्सव आयोजनामागील केंद्राचा उद्देश आहे. यानिमित्ताने लघुपटांवरील मुक्त चर्चेचेही आयोजन करण्यात आले होते. दोन्ही दिवस सायंकाळी सहा ते नऊ वाजेपर्यंत हा उत्सव केंद्राच्या सावकरनगर येथील सभागृहात संपन्न झाला.

**५.१४ - दि. १४ ऑक्टोबर २००९ -**

श्री. अजय रैना दिग्दर्शित 'टेल देम, टू ट्री हॅड प्लान्टेड, हॅस नाऊ ग्रोन' या लघुपटात १२ वर्षांच्या विजनवासानंतर काश्मिरमध्ये परतलेल्या व्यक्तीचे आत्मकथन आहे. या लघुपटाला २००२ वर्षासाठी 'सुवर्ण शंख' पारितोषिकाने सन्मानित करण्यात आलेले आहे.

'दि लिजंड ऑफ फॅट मामा' या लघुपटाचा विषयही आगळावेगळा आहे. कोलकात्यातील काही चायनीज लोकांचे १९६२ च्या भारत-चीन युध्दानंतर टोरांटोमध्ये स्थलांतर होते. टोरांटोहून कोलकात्यात येऊन आपले हुरहुर लावणारे पूर्वजीवन शोधणा-या एका स्त्रीची ही कहाणी आहे. कोलकात्याच्या प्रसिध्द चायना टाऊनमधील पारंपारिक चिनी लोकसमूहाचा हा अनोखा शोध आपल्याला भावुक करणारा आहे. २००४ चे सर्वोत्कृष्ट लघुपटाचे पारितोषिक या लघुपटाला मिळाले आहे.

'भिवंडी ट्रॅजेडी' मध्ये भिवंडीतील अन्न विषबाधेमुळे आजारी झालेल्या १२० कामगारांची शोकांतिका दाखविण्यात आली आहे. मुंबई लघुपट महोत्सवात १९९८ मध्ये 'सुवर्ण शंख' पुरस्काराने या लघुपटाला सन्मानित करण्यात आलेले आहे.

**५.१५ - दि. १५ ऑक्टोबर २००९ -**

श्री. विजॉय त्रिपाठी दिग्दर्शित 'लडाख-लँड ऑफ मिस्टरी' या लडाखवरील लघुपटात एका आगळया वेगळया विश्वाचा प्रवास आहे. हा लघुपट लडाखचे निसर्ग सौंदर्य, सिंधू नदी, पर्वतरांगा, वन्यजीवन यांचे दर्शन घडवितो. नितांत सुंदर नुब्रा व्हॅली, पेगाँग लेक आणि निर्वासीत तिबेटी लोकांचे दु:ख, बुध्द धर्माचा साधेपणा अशा अनेक वैशिष्टयपूर्ण पैलूंनी युक्त असा हा लघुपट आहे. या लघुपटाला २००४ मध्ये 'रजत शंख' या पारितोषिकाने गौरविण्यात आले आहे.

'राजू ॲन्ड आय' या लघुपटात १० ते १२ वर्षे वयोगटातील निम्नस्तरातील जीवन जगणा-या मुलांचे भावविश्व रंगविले आहे. शहरातील या दोन मुलांच्या परस्परसंबंधाचा शोध घेणारा हा 'ॲनिमेशन लघुपट' आहे. २००४ मध्ये या लघुपटाला 'सुवर्ण शंख' या पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले आहे.

दोन्ही दिवसांच्या फिल्म उत्सवाचे स्वागत व प्रास्ताविक केंद्राच्या कोषाध्यक्षांनी केले. सदर फिल्म उत्सवासाठी कलाक्षेत्रातील मान्यवर रसिक उपस्थित होते.

**५.१६ - दि. २ नोव्हेंबर २००९ - सुप्रसिध्द कवी व नाटककार रॉय किणीकर यांच्या 'उत्तररात्र' या दीर्घ कवितेचे सांगितिक अभिवाचन :-**

जीवनातील विविध प्रसंगांवरील चिंतनशील तत्त्वज्ञान मांडणा-या 'एक उत्तररात्र' या दीर्घ कवितेच्या सांगितिक अभिवाचनाचा कार्यक्रम विभागीय केंद्र, नाशिकतर्फे आयोजित करण्यात आला होता. जीवनाच्या आशयगर्भ तत्त्वज्ञानाचे सार ... माणसाच्या अगम्य जीवनाविष्काराचे अर्थ शोधण्याचा प्रयत्न. त्याच्या मनात उमटणारे तरंग आणि या सा-याचा तरल शब्दवेध घेणारे कलंदर कवी रॉय किणीकर यांच्या 'उत्तररात्र' या दीर्घ काव्यावर आधारित कार्यक्रमाने रसिकांना आनंद दिला. नागपूर येथल कलासाहित्याचे विविधअंगी प्रयोग करणा-या सृजन या संस्थेच्या कलाकारांनी हा अनोखा कार्यक्रम सादर केला. श्याम धोंड,

वैशाली उपाध्ये, शैलेश दाणी, अरविंद उपाध्ये हे कलाकार होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. विनायक रानडे यांनी तर स्वागत श्रीमती दीपाली मानकर यांनी केले. या कार्यक्रमास कवी श्री. किशोर पाठक, ज्येष्ठ पत्रकार श्री. दत्ता सराफ, श्री. चंद्रकांत महामिने, श्री. नरेश महाजन, श्री. शरद पुराणिक आदि साहित्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**५.१७ - दि. शुक्रवार १३ ते बुधवार २५ नोव्हेंबर २००९ - यशवंत रंगोत्सव :-**

विभागीय केंद्र नाशिकतर्फे यशवंतराव चव्हाण यांच्या २५ व्या पुण्यतिथी निमित्ताने १३ ते २५ नोव्हेंबर २००९ या कालावधीत 'यशवंत रंगोत्सवाचे' आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने कलारसिकांना दर्जेदार कार्यक्रमांची अपूर्व मेजवानी मिळाली. चित्रकलेतील सर्व कलाप्रवाह व सर्व माध्यमे यात नाशिककर कलावंतांचे योगदान मोठे आहे याचा प्रातिनिधिक परिचय रसिकांना व्हावा, या उद्देशाने नाशिकमधील पन्नासहून अधिक नव्या जुन्या चित्रकारांच्या कलाकृतींचा आस्वाद घेण्याची दुर्मिळ संधी विभागीय केंद्र, नाशिकने उपलब्ध करुन दिली होती. त्याचबरोबर चित्रकारांना हक्काचे व्यासपीठ म्हणून केंद्राच्या नूतन 'आर्ट गॅलरी' चा शुभारंभही या रंगोत्सवाच्या निमित्ताने झाला.

**५.१८ - दि. १३ नोव्हेंबर २००९ - यशवंत रंगोत्सव उद्‌घाटन समारंभ :-**

शुक्रवार १३ नोव्हेंबर २००९ रोजी सायंकाळी ६.०० वाजता ख्यातनाम चित्रकार श्री. रवी परांजपे यांच्या शुभहस्ते रंगोत्सवाचे उद्‌घाटन सपन्न झाले. याचवेळी चित्रकार श्री. शिवाजी तुपे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांचा नाशिककरांच्यावतीने मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. चित्रकार श्री. रवी परांजपे यांच्या हस्ते हा सत्कार संपन्न झाला. तसेच केंद्राच्या आर्ट गॅलरीचे उद्‌घाटन श्री. परांजपे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रदर्शनाच्या निमित्ताने चित्रकलेविषयक व्याख्याने, स्लाईड-शो, चर्चा, प्रात्यक्षिके, चित्रपट यांचेही आयोजन करण्यात आले होते. या चित्रकलाक्षेत्रातील नामवंत व्यक्ती सहभागी झाले होते.

प्रारंभी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन करण्यात आले. श्री. विनायक रानडे यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. अध्यक्ष श्री. विनायकराव पाटील यांनी यशवंत रंगोत्सवामागील भूमिका स्पष्ट केली. श्रीमती संध्या केळकर यांनी श्री. परांजपे यांचा परिचय करुन दिला. श्री. परांजपे यांचा श्री. विनायकराव पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कलारसिक व चित्रकार मोठया संख्येने उपस्थित होते.

**५.१९ - दि. १४ नोव्हेंबर २००९ - चित्रकार सुहास बहुलकर (मुंबई), विषय : कला-कलेसाठी समाजासाठी स्लाईड शो व व्याख्यान :-**

नाशिक विभागीय केंद्रातर्फे यशवंत रंगोत्सवात 'कला-कलेसाठी, समाजासाठी' या विषयावर प्रसिद चित्रकार श्री. सुहास बहुलकर बोलत होते. यावेळी त्यांनी स्लाईड शोच्या माध्यमातून उपस्थितांशी संवाद साधला. प्रा. अनिल अभंगे यांनी प्रास्ताविक, परिचय सूत्रसंचालन केले. सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**५.२० - दि. १५ नोव्हेंबर २००९ - चित्रकार श्री. संजय शेलार (कोल्हापूर), विषय : व्यक्तिचित्र प्रात्यक्षिक :-**

व्यक्तिचित्राची नेमकी गरज आणि त्या अनुषंगाने त्यासाठी लागणारा नैसर्गिक प्रकाश, व्यक्तीक्षेत्र रेखाटनातील महत्वाच्या बाबी यांचे दर्शन चित्रकार श्री. संजय शेलार यांनी प्रात्यक्षिकातून देऊन कलागुरु श्री. अरविंद मिस्त्री, श्री. रवींद्र मिस्त्री यांचे मार्गदर्शन, भारतीय व पाश्चिमात्य चित्रकारांचे कलेविषयी लेखन, त्यांची चित्रशैली, रंगलेपन त्याचबरोबर व्यक्तिचित्रातील

विविध वयोगटांची मानसिकता, मोजक्या रंगांचा वापर कसा करावा, यासाठी त्यांनी काही मार्गदर्शक सूचना केल्या. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक श्री. विनायकराव रानडे यांनी केले तर चित्रकार श्री. संजय शेलार यांचा सत्कार श्री. नंदू गवांदे यांनी केला परिचय प्रा. अनिल अभंगे यांनी करुन दिला.

**५.२१ - दि. १६ नोव्हेंबर २००९ - चित्रकार श्री. संजय शेलार (कोल्हापूर), विषय : मी व समकालीन कला- स्लाईड शो व व्याख्यान -**

'मी व समकालीन चित्रकला' या विषयावर व्याख्यान व स्लाईड शोमधून चित्रकार श्री. संजय शेलार यांनी व्याख्यान दिले. त्यांचे स्वागत केंद्राचे कोषाध्यक्ष यांनी केले.

**५.२२ - दि. १७ नोव्हेंबर २००९ - आर्किटेक्ट श्री. संजय पाटील (नाशिक), विषय : वास्तुकला व चित्रकला- स्लाईड शो व व्याख्यान -**

वास्तुकला व चित्रकला या दोन्ही कलांनी सामाजिक व्यवस्था आणि परंपरेवर प्रभाव निर्माण केला आहे. यामुळे या दोन्हीत एकसमान धागा असल्याचे प्रतिपादन वास्तूरचनाकार श्री. संजय पाटील यांनी केले. 'वास्तुकला व चित्रकला' या विषयावर ते बोलत होते. ते म्हणाले की, वास्तुकला व चित्रकला यात कल्पकता आहे. या दोन्ही कलांतील सौंदर्याचा चेहरा संपूर्ण जगभर एकसारखाच आहे. या कलेला आपण कसे रंगरुप देतो त्यावर चित्रकार व वास्तुरचनाकाराचे कौशल्य अवलंबून असते. भारतीय पेंटिंग्ज आणि स्वतः श्री. संजय पाटील यांच्या काही वास्तुकलेच्या रचना स्लाईड शो द्वारे दाखविण्यात आल्या. केंद्राचे कोषाध्यक्ष यांनी प्रास्ताविक केले. प्रसिध्द चित्रकार श्री. शिवाजी तुपे यांनी परिचय करुन दिला. श्री. जयंत भातंबरेकर यांनी स्वागत केले.

**५.२३ - दि. १८ नोव्हेंबर २००९ - स्पॅनिश चित्रकार गोया यांचा जीवनपट -**

सुप्रसिध्द स्पॅनिश चित्रकार गोया यांच्या जीवनावर आधारित दीड तासांची चित्रफीत दाखविण्यात आली.

**५.२४ - दि. १९ नोव्हेंबर २००९ - ज्येष्ठ चित्रकार श्री. शिवाजी तुपे यांची प्रकट मुलाखत (मुलाखतकार-कलासमिक्षक श्री. श्रीराम खाडीलकर)**

संपूर्ण जग सुंदर असले तरी माझे गावही सुंदर आहे. या गावाचे सौंदर्य चित्रबध्द करण्यात मला सर्वाधिक आनंद मिळतो. विशेषतः जुन्या नाशकातील वाडे आता नष्ट होत असल्याने त्यांचे जास्तीत जास्त लॅण्डस्केप करुन ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. नव्या पिढीला आपले शहर कसे होते हे समजावे यासाठी हा खटाटोप आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ चित्रकार श्री. शिवाजी तुपे यांनी केले. कलासमीक्षक श्री. श्रीराम खाडीलकर यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना दिलखुलास उत्तरे देत श्री. शिवाजी तुपे यांनी रसिकांसमोर आपल्या कलाजीवनाचा पट मांडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी केंद्राचे कोषाध्यक्ष यांनी प्रमुख पाहुण्यांचे पुस्तक आणि मोरपीस देऊन स्वागत केले.

**५.२५ - दि. २० नोव्हेंबर २००९ - लघुपट - फ्रेंच चित्रकार सेझान यांचा जीवनपट दाखविणारा व व्हॅन गॉग यांच्या जीवनावरील चित्रपट थ्री कलर्स -**

पाश्चिमात्य चित्रकलेचा इतिहास समोर आणणा-या चित्रकलेतील बदलत्या प्रवाहांचा खरा साक्षीदार सेझान होता. इम्प्रेशन जर्नालिझम, मॉडर्न आर्ट, माणसांच्या प्रतिकृती, रंगसंगती यांचा कलात्मक वेध या लघुपटातून घेण्यात आलेला आहे.

चित्रातून आशयाचा वेध घेणारी, चित्रशैली व रंगाचे प्रवाहीपण हे त्याच्या कामाचे वेगळेपण होते. त्यानंतर जागतिक कीर्तीचा चित्रकार व्हॅन गॉग यांची जीवनशैली दर्शविणारा 'थ्री कलर्स' चित्रपट दाखविण्यात आला.

**५.२६ - दि. २१ नोव्हेंबर २००९-कलासमीक्षक श्री. विनायक परब, विषय : अमेरिकन दृक दृश्य कला-स्लाईड शो व व्याख्यान -**

यशवंत रंगोत्सवात 'अमेरिकन दृक दृश्य-कला' या विषयावरील स्लाईड शो व व्याख्यानात अमेरिकेतील दृश्य कलांच्या विकासासाठी तेथील विविध संस्थांनी व चित्ररसिकांनी कलाकृतींची जपणूक अत्यंत जबाबदारीने केल्यामुळे तेथील कला जोपासण्यास महत्वाचा भाग ठरला आहे असे प्रतिपादन कलासमीक्षक श्री. विनायक परब यांनी केले. प्रास्ताविक श्री. विनायक रानडे यांनी केले. श्री. परब यांचा सत्कार श्री. शिवाजी तुपे यांनी केला. परिचय श्री. अनिल अभंगे यांनी करुन दिला.

**५.२७ - दि. २२ नोव्हेंबर २००९ - चित्रकार श्री. संजय साबळे, विषय : कंपोझिशन - प्रात्यक्षिक व व्याख्यान :-**

रचना तंत्रातील रंगसंगती आणि त्या अनुषंगाने येणारे रंगभान यांचा सुंदर अविष्कार चित्रकार श्री. संजय साबळे यांनी प्रात्यक्षिकाद्वारे कंपोझिशनच्या सहाय्याने रसिकांना करुन दिला. बदलते कलाप्रवाह, चित्रकलेतील नवनवीन प्रवाह तसेच नवीन नवीन अविष्कारांची माहिती त्यांनी आपल्या व्याख्यातून दिली. कोषाध्यक्षांनी श्री. साबळे यांचा सत्कार केला.

**५.२८ - दि. २३ नोव्हेंबर २००९ - चित्रकार श्री. शिवाजी तुपे, विषय : स्लाईड शो व व्याख्यान -**

ज्येष्ठ चित्रकार श्री. शिवाजी तुपे यांनी स्लाईड शो व व्याख्यानातून आपल्या सुवर्णमहोत्सवी कला कारकिर्दीचा आढावा रसिकांसमोर मांडला. नाशिकसह भारतभर चित्रे आणि त्यातील आठवणीही त्यांनी जागवल्या. चित्रकलेची उपजत असलेली उर्मी आणि त्यातून निर्माण झालेला कलाविष्कार यांचेही त्यांनी दर्शन घडविले. प्रत्येक चित्राला असलेला संदर्भ, इतिहास याचीही माहिती त्यांनी दिली. नाशिक शहराची आध्यात्मिक ओळख आणि महानगरानंतर त्यात झालेला बदल याचाही वेध त्यांनी घेतला. त्र्यंबकेश्वर, निवृत्तीनाथ यात्रेला जाणारे वारकरी, रामकुंड, मुखपृष्ट यांच्याही त्यांनी आठवणी सांगितल्या. नाशिकची चित्रमय ओळख सर्वांना व्हावी, यासाठी चित्रमय पुस्तक लवकरच प्रकाशित करत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक श्री. विनायक रानडे यांनी केले. चित्रकार श्री. शिवाजी तुपे यांचा सत्कार मुक्ता बालिगा यांनी केला.

**५.२९ - दि. २४ नोव्हेंबर २००९ - चित्रकार श्री. प्रफुल्ल सावंत व श्री. राजेश सावंत विषय : स्लाईड शो व व्याख्यान -**

निसर्गचित्र, कंपोझिशन, व्यक्तिचित्र, स्टील लाईफ अशा विविध चित्रप्रकारातून चित्रांचा अवकाश, प्रकाश विषय, रंगभान व चित्रशैली यांची माहितीपूर्ण ओळखही चित्रकार श्री. प्रफुल्ल सावंत व श्री. राजेश सावंत यांनी आपल्या स्लाईड शोद्वारे दिली. श्रीमती सुषमा दाते व श्री. रामदास महाले यांच्या हस्ते सावंत बंधूंचा सत्कार करण्यात आला.

**५.३० - दि. २५ नोव्हेंबर २००९ - चित्रकार श्री. विजयराज बोधनकर (ठाणे), विषय : कॅरिकेचर प्रात्यक्षिक व व्याख्यान -**

समाजरुपी सागरात घडणा-या अनेकविध घटनांकडे तटस्थपणे व डोळसपणे पाहिल्यास चित्रांसाठी स्वतंत्र भाषा मिळते. चित्रकार रंग रेषेद्वारे विसंगती आणि वेगळया विनोदांवर भाष्य करतो. त्यातून विचार मांडतो असे प्रतिपादन व्यंगचित्रकार श्री. विजयराज बोधनकर यांनी केले. श्री. बोधनकर यांनी कॅरिकेचर विषयावर स्लाईडस्च्या माध्यमातून व्याख्यान दिले. ते म्हणाले जनमानसात चित्रकेलेविषयी समाजात असलेली अनास्था दूर करण्याचे काम चांगली व्यंगचित्रे प्रभावीपणे करतात. अर्कचित्रे म्हणजे काय ? अभिरुची कशी वाढवावी ? कलावंतांनी आत्मकेंद्रीपणा सोडून देण्यासाठी काय करावे ? याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी प्रसिध्द साहित्यिक, अभिनेते आणि गायक यांची अर्कचित्रे सादर केली. याप्रसंगी चित्रकार श्री. शिवाजी तुपे यांच्या हस्ते बोधनकर यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर आकाशाचार्य श्री. रमाकांत देशपांडे यांनी दुर्बिणद्वारे आकाशदर्शन घडवून चंद्रावरील पर्वत, विवरे आदिंची माहिती दिली.

**५.३१ - दि. २९ नोव्हेंबर २००९ - 'स्टोरी ऑफ द स्टफ' माहितीपट -**

विभागीय केंद्र, नाशिक व अभिव्यक्ति मिडिया फॉर डेव्हलपमेंटतर्फे 'स्टोरी ऑफ द स्टफ' हा माहितीपट दाखविण्यात आला. सध्या ग्लोबल वार्मिंग हे खूप मोठे आव्हान आपल्यासमोर उभे आहे. नुकतीच अमेरिकेतील कोपनहेगन येथे तापमानवाढीसंदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर परिषद झाली. यात जगातील अनेक देशांनी सहभाग घेऊन वाढते तापमान मानवाला जगण्यास खूप त्रासदायक ठरते आहे, भविष्यात यावर काहीतरी ठोस पावले उचलली जावी या संदर्भात चर्चा करण्यात आली, तशीच चर्चा आपल्या येथेही व्हावी हा माहितीपट दाखविण्यामागे उद्देश होता. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक श्री. विनायक रानडे यांनी केले व सूत्रसंचालन अभिव्यक्तिच्या श्रीमती संगीता जाधव यांनी केले.

**५.३२ - दि. १ ते ५ जानेवारी २०१० - 'कवडसे' कविता चित्र-प्रदर्शन :-**

घर हरवलेल्या मुलांचे जीवनानुभव; त्यांच्यातील मूलभूत कला जाणिवा यांचा शोध घेण्याचा प्रयत्नातून आकाराला आलेले कविता आणि चित्रांचे 'कवडसे' नावाचे आगळे वेगळे प्रदर्शनाचे उद्‌घाटन विभागीय केंद्र, नाशिकच्या सावरकर नगर येथील आर्ट गॅलरीत ओवी दीक्षित, गौरी दसककर, ईश्वरी दसककर, वैष्णवी भडकमकर, सुरश्री दसककर, प्रतिक पंडित, ऐश्वर्या पवार, श्रेया सावळे, प्रसाद खैरनार व रागेश्री वैरागकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन संपन्न झाले.

'खिडकी' या विषयाशी निगडित सुमारे पन्नासहून अधिक कविता व चित्रे या प्रदर्शनात मांडण्यात आली आहेत. सर्वसामान्य घरापासूनही वंचित असणा-या मुलांच्या भावविश्वाचा वेध घेणारे 'कवडसे' हे प्रदर्शन नवा विचार देणारे आहे. कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी उपस्थित मुलांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी त्यांनी स्वत:चे बालपण व अनाथ, वंचित मुलांच्या जीवनाविषयी आस्था प्रकट केली व आपल्या बालमित्रांचे कौतुकही केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्तविक केंद्राच्या कोषाध्यक्षांनी केले.

प्रदर्शनाचे संकल्पक ज्येष्ठ रंगकर्मी श्री. संजय हळदीकर यांनी प्रदर्शनामागची भूमिका मांडली. याप्रसंगी प्रतिष्ठानचे कार्यकारिणी मंडळाचे सदस्य डॉ. वसंत पवार, डॉ. शोभा बच्छाव, गुरुमित बग्गा तसेच नगरसेवक श्री. शिवाजी गांगुर्डे, श्री. बाबा दातार, श्री. प्रमोद भडकमकर, श्री. सुभाष दससकर, श्री. निलेश चव्हाण, श्री. प्रसाद पाटील, श्रीमती सुधा मेहता, श्री. रघुनाथ फडणीस व श्री. विनायक रानडे आदि मान्यवर उपस्थित होते.

**५.३३ - दि. ८ जानेवारी २०१० - 'खेळ मांडियेला' संतरचनांवर आधारीत मैफलीचे आयोजन -**

विभागीय केंद्र नाशिकतर्फे 'खेळ मांडियेला' या संतरचनांवर आधारीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बेल्जियम येथील गायिका ज्युडी रस्ट व आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पखावज वादक पं. उध्दव शिंदे आपेगांवकर हे या मैफलीचे कलाकार होते. ज्युडी रस्ट ह्या बेल्जियम येथे स्थायिक असलेल्या ऑपेरात गाणा-या गायिका आहेत. युरोपात दहाहून अधिक भाषांमधून त्या ऑपेरा सादर करतात. वारकरी संप्रदायाचा भक्तीभावाचा प्राण असलेल्या अभंग रचनांचा त्यांनी अभ्यास केला आणि त्यातूनच मराठी संतरचना गाण्याची त्यांना आवड निर्माण झाली. अस्खलित मराठीत ओघवत्या शैलीत त्या अभंग सादर करतात. याचाच भक्तीपूर्ण आणि तितकाच सुरेल अविष्कार म्हणजे 'खेळ मांडियेला' आहे. ख्यातनाम पखवज वादक पं. उध्दव शिंदे

आपेगांवकर (आंबेजोगाई) यांचेकडे त्यांनी भक्तीसंगीताचे शिक्षण घेतले. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत मीरावाई, तुकडोजी महाराज, जनावाई अशा अनेक संतरचना ज्युडी रस्ट गातात. मराठी अभंग त्यांना आवडले ते त्यातल्या आशयामुळे त्याचमुळे मराठी भक्ती परंपरेचा नाद त्या जगभर पोहोचवत आहेत. अमेरिका, युरोप तसेच महाराष्ट्रातील अनेक प्रमुख शहरांमध्ये 'खेळ मांडियेला' कार्यक्रमाला रसिकांची प्रचंड दाद मिळाली आहे.

पं. उध्दव शिंदे आपेगांवकर हे पद्मश्री शंकर वापू आपेगांवकर यांचे पुत्र असून त्यांनी पखावजला आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याचे मोलाचे कार्य केले आहे. महाराष्ट्रातील कीर्तन व भजन परंपरेचे वाद्य असलेले पखावज आज जगातील महत्त्वपूर्ण देशात लोकप्रिय आहे. त्याचे सारे श्रेय आपेगांवकरांना जाते.

'अलंकापुरी पुण्यभूमी पवित्र' हे वारकरी संप्रदायातील शुध्द भजन, 'जय जय रामकृष्ण हरी' हा महामंत्र, संत चोखामेळा यांची 'विठ्ठल विठ्ठल गजरी', 'शांती परते नाही सुख' हा तुकोबांचा अभंग, संत मीरावाई यांचे 'नाव किनारे लगायो प्रभूजी' ही रचना अशा संतरचना सादर करत ज्युडी रस्ट यांनी उपस्थितींकडून उत्स्फूर्त दाद मिळविली. संत नामदेवांची व्रज भाषेतील 'दूध पियो मेरे गोविंद लाला' ही अवघड रचनाही त्यांनी तल्लीन होत सादर केली.

**५.३४ - दि. १७ जानेवारी २०१० पासून योगाभ्यास शिबीर -**

सत्यानंद योगाच्या अनुभवी व तज्ज्ञ प्रशिक्षक श्रीमती जानकी राजन यांच्या मार्गदर्शनाखाली स्वास्थ्य योग शिकण्याची सुवर्णसंधी नाशिककरांना केंद्राने उपलब्ध करुन दिली आहे. या योगविषयक शिबीरास नाशिक शहरातील नागरिकांनी प्रतिसाद दिलेला आहे

**५.३५ - दि. ६ फेब्रुवारी २०१० कागदी होडया बनविण्याची कार्यशाळा मार्गदर्शक - श्री. मधुकर आठल्ये**

बालवयापासूनच विद्यार्थ्यांनी आपल्याजवळ असलेल्या उपजत कलेची जपणूक करावी व अभ्यासाबरोवरच कलागुणांचा विकास होण्यासाठी प्रयत्न करावे. त्यासाठी विविध स्पर्धा, शिबीरे यात सहभागी होऊन स्वतःचा अष्टपैलू विकास साधावा तोच खरा आनंदी जगण्याचा मार्ग आहे असे प्रतिपादन सुप्रसिध्द वांधकाम व्यावसायिक श्री. सुनिल कोतवाल यांनी केले.

विभागीय केंद्र, नाशिकतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी सुप्रसिध्द ओरिगामी कलाकार श्री. मधुकर आठल्ये यांच्या 'कागदी होडया' बनविण्याच्या प्रात्यक्षिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केंद्राच्या कोषाध्यक्षांनी केले. या कार्यक्रमाला सुप्रसिध्द बांधकाम व्यवसायिक श्री. सुनिल कोतवाल यांनी आपले विचार मांडले. यावेळी श्री. मधुकर आठल्ये यांनी होडयांच्या गमतीदार जन्मकथा व होडया बनविण्याच्या साध्या, सोप्या पध्दती सांगत उपस्थित विद्यार्थ्यांकडून होडया बनवून घेतल्या. त्यात होडकं, शिकारा होडी, काळू-बाळू होडी, रॉकेट होडी, भरारी होडी, मयूरपंखी होडी, नाग होडी, म्हातारीचा बुट होडी, तरते रंगमंच होडी, फुलपाखरु होडी, राजा-राणी होडी, सुळकाशीड होडी अशा विविध प्रकारच्या होडयांचा समावेश होता. या कार्यशाळेसाठी नाशिकमधील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. श्री. विनायक रानडे यांनी श्री. आठल्ये यांचा परिचय करुन दिला.

**५.३६ - दि. ११ मार्च २०१० - पोलिस प्रशासनाची नवी दिशा -**

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त नाशिक विभागीय केंद्राच्यावतीने केंद्राच्या सभागृहात 'पोलिस प्रशासनाची नवी दिशा' या विषयावर मुंवईचे विशेष पोलिस महानिरीक्षक श्री. सुरेश खोपडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत केंद्राचे कोषाध्यक्षांनी केले. श्री. सुरेश खोपडे यांचा परिचय श्रीमती दिपाली मानकर यांनी करुन दिला. याप्रसंगी केंद्राचे सदस्य श्री. गुरमित बग्गा, श्रीमती अश्विनी बोरस्ते उपस्थित होते.

## १०.६ विभागीय केंद्र, औरंगाबाद

### ६.१ - दि. १८ जून २००९ मराठवाडा विभागीय सर्वांगीण शिक्षण गुणवत्ता विकास कार्यशाळा :-

मराठवाडयातील शालेय स्तरावरील प्राथमिक शिक्षणाच्या दर्जाबाबत विचारमंथन करण्यासाठी औरंगाबाद येथे गुरुवार दिनांक १८ जून २००९ रोजी विभागीय केंद्र, औरंगाबाद व शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठवाडा विभागीय सर्वांगीण शिक्षण गुणवत्ता विकास कार्यशाळेचे' आयोजन करण्यात आले होते. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाशेजारी असणा-या इन्स्टिटयूट ऑफ इंजिनीअर्सच्या स्व. भानुदासराव चव्हाण सभागृहात सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही कार्यशाळा पार पडली.

सकाळी ९ ते १० या वेळेत कार्यशाळेसाठी नाव नोंदणी करण्यात आली. १० वाजता कार्यशाळेचे उद्घाटन खा. सौ. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. वि. वि. चिपळूणकर, प्रमुख अतिथी म्हणून श्री. संजय कुमार, डॉ. कुमुद वन्सल उपस्थित होते. ११.३० ते १२.३० या वेळेत विविध विषयांवर तज्ज्ञांचे सादरीकरण झाले. यामध्ये मराठवाडयातील प्राथमिक शिक्षण - सद्यःस्थिती व पुढील दिशा, मराठवाडयातील प्राथमिक शिक्षणातील गळती, मराठवाडयातील प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता, मराठवाडयातील मुलींचे प्राथमिक शिक्षण, मराठवाडयातील स्थलांतरितांच्या मुलांचे प्राथमिक शिक्षण, अल्पसंख्याक आणि मराठवाडयातील प्राथमिक शिक्षण या विषयांचा अंतर्भाव होता.

दुपारी १२.३० ते १ या वेळेत लोकप्रतिनिधी व मराठवाडयातील जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या प्रतिक्रियांचे सादरीकरण झाले. दुपारी २ ते ४ या वेळेत गटचर्चा पार पडली. यामध्ये मराठवाडयातील प्राथमिक शिक्षणातील गळती, मराठवाडयातील प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता, मराठवाडयातील मुलींचे प्राथमिक शिक्षण, मराठवाडयातील स्थलांतरितांच्या मुलांचे प्राथमिक शिक्षण, अल्पसंख्याक आणि मराठवाडयातील प्राथमिक शिक्षण या विषयांचा समावेश होता. दुपारी ४.०० ते ५.३० या वेळेत गटांच्या अहवालांचे सादरीकरण झाले.

कार्यशाळेमध्ये शासनाच्या विविध अधिका-यांसह स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी व शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संघटनांच्या सुमारे २०० प्रतिनिधींचा सहभाग होता. मराठवाडयातील सर्वच जिल्हयांमध्ये गळतीचा प्रश्न गंभीर प्रमाणात आहे. प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेचाही प्रश्न गंभीर आहे. तसेच स्थलांतरितांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्नही भेडसावतो आहे. या सर्व पार्श्वभूमीवर मराठवाडयातील प्राथमिक शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी आतापर्यंत झालेल्या प्रयत्नांचा आढावा घेण्यात आला. प्राथमिक विद्यार्थ्यांची गळती शून्यावर आणण्यासाठी कार्यशाळेमध्ये उपाययोजना सुचविण्यात आल्या. या कार्यशाळेस शिक्षक, संस्थाचालक, अभ्यासक, संघटनांचे प्रतिनिधी व पालक उपस्थित होते.

### ६.२ - दि. १ नोव्हेंबर २००९ उत्तररात्र :-

विभागीय केंद्र, औरंगाबादच्या वतीने दिनांक १ नोव्हेंबर २००९ रोजी सृजन निर्मित कवी रॉय किणीकर यांच्या कवितांवर आधारित 'उत्तररात्र सांगीतिक कार्यक्रमाचे' आयोजन करण्यात आले होते. गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी, सरस्वती भुवन महाविद्यालय येथे पार पडलेल्या या प्रसंगी मंचावर ज्येष्ठ साहित्यिक श्री. रा. रं. बोराडे, स. भु. शिक्षणसंस्थेच डॉ. अशोक भालेराव, श्री. नीलेश राऊत, श्री. सुहास तेंडुलकर, श्री. सुबोध जाधव यांची उपस्थिती होती.

सृजन ग्रुप, नागपूरच्या श्रीमती वैशाली उपाध्ये, श्री. श्याम धोंड या कलाकारांनी कवी रॉय किणीकरांच्या उत्तररात्र या दीर्घकाव्याचे अभिवाचन सादर केले. एक कलंदर वृत्तीचे कवी म्हणून प्रसिध्द असलेल्या कवी रॉय किणीकर यांच्या काव्याला अभिवाचन तसेच संगीताच्या माध्यमातून रसिकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न या निमित्ताने करण्यात आला.

आत्मशोध घेण्यास प्रवृत्त करणा-या या मैफिलीत श्री. श्याम धोंड यांचे अभिवाचन आणि श्रीमती वैशाली उपाध्ये यांचा सुरेल आवाज रसिकांवर प्रभाव पाडून गेला. श्री. अरविंद उपाध्ये यांनी बासरीवर आणि श्री. शैलेश दाणी यांनी सिंथेसायझरवर

साथसंगत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अभिजित विटोरे यांनी केले. आभार श्री. गणेश घुले यांनी मानले. कार्यक्रमास शहरातील साहित्यिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

**६.३ - दि. २४ नोव्हेंबर २००९ - मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री. सुरेश खोपडे, विशेष पोलीस महानिरीक्षक यांचे विशेष व्याख्यान :-**

विभागीय केंद्र, औरंगाबाद, जनसंवाद, वृत्तपत्रविद्या विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. सुरेश खोपडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विद्यापीठाच्या जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागात आयोजित या कार्यक्रमासाठी केंद्राचे सदस्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते मा. यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन करण्यात आले. श्री. सुरेश खोपडे यांनी त्यांच्या मोहल्ला कमिटी प्रयोगासंदर्भात अनुभव कथन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस श्री. नीलेश राऊत यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. गणेश घुले यांनी केले.

**६.४ - दि. २६ डिसेंबर २००९ - देवगिरी कला महाविद्यालयात खगोलयात्रा कार्यक्रम :-**

विभागीय केंद्र, औरंगाबाद व अंधश्रध्दा निर्मूलन समितीतर्फे देवगिरी कला महाविद्यालय, औरंगाबाद येथे दिनांक २६ डिसेंबर २००९ रोजी 'खगोलयात्रा कार्यक्रमाचे' आयोजन करण्यात आले होते. यावेळी खगोलयात्रेचे संयोजक प्रा. संजय बनसोडे, प्रा. नितीन शिंदे, श्री. शंकर शेलार, प्रा. वी. के. भिल्लारे, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटन श्री. नीलेश राऊत, महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. प्रदीप जवदे यांची विचारमंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्तावित प्राचार्य श्री. जवदे यांनी केले. यानंतर खगोलयात्रेचे संयोजक प्रा. संजय वनसोडे यांनी खगोलयात्रे पाठीमागची भूमिका मांडली. तसेच खगोलशास्त्राचा इतिहास व त्याच्याशी जोडले गेलेल्या श्रध्दा, अंधश्रध्दा या संदर्भात प्रा. नितीन शिंदे, श्री. शंकर शेलार, प्रा. बी. के. भिल्लारे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रसिध्द शास्त्रज्ञ श्री. जयंत नारळीकर यांच्या प्रेरणेने या खगोलयात्रेचे महिन्याभरापासून महाराष्ट्रात भ्रमण सुरु आहे. युवांना अवकाशातील विविध ग्रह, ता-यांच्या बाबतीत वैज्ञानिक माहिती व्हावी या उद्देशाने खगोलयात्रा आयोजित केली जात आहे.

कार्यक्रमासाठी स. भु. शिक्षण संस्थेचे सरचिटणीस डॉ. अशोक भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यावेळी उपस्थित मुलामुलींना त्यांनी खगोलयात्रेसारख्या कार्यक्रमाचे आजच्या युगात किती महत्त्व आहे हे सांगितले. यामुळे उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोपासना होण्यास निश्चितच मदत झाली.

कार्यक्रमासाठी विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. सचिन मुळे, देवगिरी महाविद्यालयाचे प्रा. काशिद सर, स. भु. संस्थेचे श्री. गाजरे, श्री. सुरडकर आदींचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागीय केंद्राच्या सदस्यांनी प्रयत्न केले.

**६.५ - दि. ५ फेब्रुवारी २०१० - मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनकार्यावर आधारित वक्तृत्व स्पर्धा :-**

दि. ५ फेब्रुवारी २०१० रोजी विभागीय केंद्र, औरंगाबाद व नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे शिवछत्रपती महाविद्यालयामध्ये मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनकार्यावर आधारित आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाली. मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्वप्नातला पुरोगामी महाराष्ट्र, संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये मा. यशवंतराव चव्हाण यांचे योगदान आणि यशवंतराव चव्हाण : एक साहित्यिक असे वक्तृत्व स्पर्धेचे तीन विषय होते. प्रथम परितोषिक ३०००, द्वितीय पारितोषिक २०००, तृतीय पारितोषिक १००० व दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी ५०० रु. असे पारितोषिकांचे स्वरुप होते. या वक्तृत्व स्पर्धेसाठी मराठवाडयातून विविध महाविद्यालयांमधील ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

स्पर्धेमध्ये प्रथम व द्वितीय पारितोषिक विभागून देण्यात आले. श्री. सचिन जगताप (महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर) व श्रीमती प्रज्ञा मोरे (शिक्षणशास्त्र महाविद्यालय) यांनी प्रथम, श्रीमती कविता हिवराळे (शिवछत्रपती महाविद्यालय,

औरंगाबाद) व श्री. मनीष बनकर (विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद) यांनी द्वितीय व श्री. निकेश मधारे (देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद) यांनी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. श्री. देवकुमार अहिरे व श्री. माधव सोमवंशी यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले.

पारितोषिक वितरण समारंभाला शिवछत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वलभीम गोरे, उपप्राचार्य श्री. अनिल आर्दड, पूर्णवादी बँकेचे संचालक श्री. सुहास तेंडुलकर, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक स्पर्धेचे समन्वयक प्रा. महेश अचिंतलवार उपस्थित होते. प्रा. वालाजी फड, श्री. श्रीकांत देशपांडे, श्री. सचिन तायडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

**६.६ - दि. १४ फेब्रुवारी २०१० - शाम-ए-गजल उर्दू-मराठी गझल गायन कार्यक्रम :-**

विभागीय केंद्र, औरंगाबादतर्फे दिनांक १४ फेब्रुवारी २०१० रोजी तापडिया नाटयमंदिर येथे 'शाम-ए-गजल' या उर्दू-मराठी गझल गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई येथील गजल गायक श्री. मदन काजळे यांनी उर्दू-मराठी गजला सादर केल्या. त्यांना उस्ताद अलाउद्दीन खान (दिलरुबा), उस्ताद प्रदीप शर्मा (तबला), उस्ताद अबरार अहमद (संतूर) या कलावंतांनी साथसंगत दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. एम. एम. शेख होते. तसेच ज्येष्ठ गजलकार श्री. बशर नवाज, श्री. नाना लोडम, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे विशेष निमंत्रित श्री. राहुल नरवडे, अपंग हक्क विकास मंचचे श्री. सुहास तेंडुलकर, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संघटक, विभागीय संघटक यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. श्री. बशर नवाज यांच्या हस्ते शमा रोशन करुन कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले.

**६.७ - दि. ११ मार्च २०१० - मा. यशवंतराव चव्हाण यांचया ९७ व्या जयंतीनिमित्त प्रा. जयदेव डोळे यांचे व्याख्यान :-**

विभागीय केंद्र, औरंगाबाद व एम.जी.एम. कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आईन्स्टाइन सभागृह, एम.जी.एस. परिसर येथे महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त गुरुवार दिनांक ११ मार्च २०१० रोजी प्रा. जयदेव डोळे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी डॉ. अनिल फळे उपस्थित होते. एम.जी.एम. चे विश्वस्त श्री. अंकुशराव कदम, ज्येष्ठ साहित्यिक श्री. रा. रं. बोराडे, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संघटक, एम.जी.एम. कॉलेज ऑफ जर्नालिझमच्या प्राचार्या श्रीमती रेखा शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. अनिल फळे यांनी अध्यक्षीय समारोप केला. प्रास्ताविक प्राचार्य श्रीमती रेखा शेळके यांनी केले.

**६.८ - दि. २७/२८ मार्च २०१० - नेतृत्व विकास शिबीर :-**

विभागीय केंद्र, औरंगाबाद व 'निर्माण' (गडचिरोली) यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार व रविवार दिनांक २७ व २८ मार्च २०१० रोजी मराठवाडा महसूल प्रबोधिनी येथे युवा नेतृत्व विकास शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्या दिवशी शिबीराचे उद्‌घाटन ज्येष्ठ विचारवंत व पत्रकार प्रा. जयदेव डोळे यांच्या 'आजच्या युवा पिढीसमोरील परिवर्तनाचे आव्हान व आवाहन' या विषयावरील व्याख्यानाने झाले. यावेळी मंचावर नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक श्री. दत्ता वाळसराफ, राज्य संघटक श्री. नीलेश राऊत यांची उपस्थिती होती. यानंतर दुपारच्या सत्रात श्री. अमृत बंग व श्री. उमेश खाडे यांनी 'निर्माण' उपक्रमाची संकल्पना व प्रक्रिया याविषयी विचार व्यक्त केले. श्री. दत्ता बाळसराफ यांनी शिबीरार्थीची मते, प्रतिक्रिया जाणून घेऊन त्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. यावेळी कचराकोंडी हा लघुपट शिबीरार्थीना दाखविण्यात आला. त्यानंतर श्रीमती दीपा देशमुख यांनी कुमार निर्माण याविषयी माहिती दिली.

रात्रीच्या सत्रामध्ये कवी वैभव देशमुख व महेश अचिंतलवार यांच्या कवितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर श्री. बाळसराफ यांनी शिबीरार्थीसोबत संघटन चर्चा केली. दुस-या दिवशी शिवीराची सुरुवात चळवळीच्या गीताने करण्यात आली. श्री. सचिन तिवले यांनी धान्यापासून मद्य निर्मिती विरोधातील भूमिकेची मांडणी केली. झी चोवीसतासचे पत्रकार श्री. दिलीप वाघमारे यांनी दुपारच्या सत्रात 'मराठवाडयाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रश्नांची सद्यःस्थिती व पुढील

काळातील आव्हाने' या विषयावर वास्तव मांडले. निर्माण मराठवाडा स्थानिक गटाच्या पुढील काळाविषयी योजनांसंबंधी श्री. बाळसराफ यांनी दृष्टिक्षेप टाकला. सायंकाळच्या सत्रानंतर शिबीराचा समारोप करण्यात आला. या शिबीरामध्ये सुमारे ६० शिबीरार्थी उपस्थित होते.

**१०.७ विभागीय केंद्र, लातूर :-**

७.१ - दि. ५.४.२००९ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४.०९.२००९ ते ३०.४.२०१० या पंधरवडयात जयंती उत्सवानिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करुन डॉ. बाबासाहेबांचे विचार दलित मागासवर्गीय त्याचबरोबर इतर तळागाळातील लोकांना कसे उपयुक्त आहेत हे समजावून सांगावयाचे ठरले.

७.२ - **डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव - दि. १४.४.२००९ :-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

७.३ - **महाराष्ट्र दिन व कामगार दिन - दि. १ मे २००९ :-**

गेल्या ५० वर्षात महाराष्ट्राने काय कमवले व काम गमवले या विद्वज्जनांच्या चर्चेत सहभाग नोंदवून वर्षभर कार्यक्रम घेण्याचे ठरले. विभागीय केंद्र लातूरच्या वतीने लातूर येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य डॉ. मधुकर मुंडे उपस्थित होते. केंद्राचे विभागीय अध्यक्ष खा. डॉ. जनार्दन वाघमारे हे अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सुशिला पिंपळे, प्रा. डॉ. सुधीर देशमुख व ॲड. मनोहरराव गोमारे आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक श्री. हरिभाऊ जवळगे यांनी केले तर सूत्रसंचालन श्री. रामकुमार रायवाडीकर यांनी व आभार प्रदर्शन श्री. गणपतराव तेलंगे यांनी मानले.

७.४ - **लातूर येथील प्रसिध्द इतिहास लेखक प्रा. डॉ. श्रीराम गुंदेकर यांचा यथोचित सत्कार - दि. १०.५.२००९ :-**

लातूर येथील प्रसिध्द इतिहास लेखक प्रा. डॉ. श्रीराम गुंदेकर यांची सातारा येथे दि. ३० व ३१ मे २००९ रोजी होणा-या अखिल भारतीय सत्यशोधकी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा व त्यांच्या सुविद्य पत्नी यांचा विभागीय केंद्राच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार श्री. शरद कारखानीस उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे प्रमुख श्री. माधव बावगे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. शिवाजी काळे यांनी केले. सूत्रसंचालन प्राचार्य पी. जी. भिसे यांनी केले.

७.५ - **राष्ट्रमाता जिजाऊ यांचा स्मृतीदिन साजरा - दि. १७ जून २००९ रोजी :-**

राष्ट्रमाता जिजाऊ यांचा विभागीय केंद्राच्या वतीने नांदेड शहरात भव्य दिव्य असा स्मृतीदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिध्द लेखिका तथा प्राध्यापिका सौ. सिंधु तिडके या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून या विभागीय केंद्राचे सदस्य तथा नांदेड शहरातील नामांकित पीपल्स कॉलेजचे प्राचार्य श्री. व्ही. एन. इंगोले हे होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. पी. वी. डावळे, प्रा. राम देशमुख, श्री. तानाजी हुस्सेकर, श्री. व्ही. एम. जाधव, श्री. आ. वि. शिंदे, प्राचार्य डॉ. गोपाळराव कदम, डॉ. विकास सुकाळे, प्रा. डी. बी. जांभरुणकर, प्रा. संभाजी तिडके आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रभाकर जाधव यांनी केले.

७.६ - **महिला बचत गटाचा मेळावा - दि. २६.६.२००९ :-**

आखाडा बाळापूर येथे 'महिला बचत गटाचा मेळावा' आयोजित करण्यात आला. या मेळाव्याला मराठवाडयातील प्रसिध्द लेखक व वक्ते प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे उपस्थित होते. त्याचबरोबर प्रसिध्द स्वातंत्र्यसैनिक व कवयित्री श्रीमती शांताबाई शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाला आखाडा बाळापूर, कळमनुरी परिसरांतील बचत गटाच्या महिला मोठया संख्येने

उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मुख्य संयोजक प्रा. उत्तमराव सूर्यवंशी यांनी केले. याप्रसंगी विभागीय केंद्राच्या सचिवांनी सर्वांचे आभार मानले.

**७.७ - राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त युवक मेळावा - दि. २६.६.२००९ :-**

शिवाजी महाविद्यालय, हिंगोली येथे 'राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त' विभागीय केंद्राच्या वतीने आयोजित केलेल्या युवक मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य श्री. सोमनाथ रोडे यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवन चरित्रासोबतच आजच्या युवका समोरील विकट आव्हानांची सविस्तर चर्चा केली. या कार्यक्रमाला हिंगोली शहरातील शाळा व महाविद्यालयांचे विद्यार्थी, प्राध्यापक, पत्रकार उपस्थित होते.

**७.८ - जागतिक डॉक्टर्स डे - दि. १.७.२००९ :-**

'जागतिक डॉक्टर्स डे' या दिवशी तीन हजार मोफत शस्त्रक्रिया संकल्पपूर्तीनिमित्त लातूर येथे डॉ. विठ्ठलराव लहाने यांचा विभागीय केंद्र व एम. डी. प्रतिष्ठान लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. गोपाळराव पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अमरनाथ सोलापुरे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणतज्ज्ञ विचारवंत प्राचार्य श्री. अनिरुध्द जाधव यांची उपस्थिती लाभली.

**७.९ - अहिल्यादेवी होळकर स्मृतीदिन : दि. १९.७.२००९ :-**

अहिल्यादेवी होळकर स्मृतीदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रा. कमलाताई ठकार यांची उपस्थिती होती.

**७.१० - क्रांतीदिन : दि. ९.८.२००९ :-**

ज्ञानेश्वर विद्यालय, लातूर येथे ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोर विभागीय केंद्राच्या वतीने ९ ऑगस्ट या क्रांतीदिनाचे महत्त्व प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी विशद केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी येथील प्राचार्य डॉ. कोमटवार हे होते.

**७.११ - भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त युवकांशी चर्चासत्र : दि. १५.८.२००९ :-**

भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने ध्वजारोहण करुन स्वातंत्र्यदिनानिमित्त युवकांशी चर्चासत्र व आजच्या युवकासमोरील प्रश्न या विषयावर चर्चा झाली. या चर्चासत्रात लातूर शहरातील श्री. जी. एन. लातूरे, श्री. के. ई. हरिदास, प्रसिध्द पत्रकार श्री. अतुल देऊळगावकर इत्यादींनी सहभाग नोंदविला.

**७.१२ - हिंदी साहित्यिक डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांचा सत्कार : दि. ३१.८.२००९ :-**

जिल्हा हिंदी साहित्य परिषद, संत कबीर प्रतिष्ठान व मराठवाडा साहित्य परिषदेच्या जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने २००८-२००९ या वर्षात देशातील चार पुरस्कारांचे मानकरी ठरलेले हिंदी साहित्यिक डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांचा सत्कार साहित्यिक व खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आला. श्री. योगिराज माने व प्रा. विजयकुमार शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. सतीष यादव यांनी आभार मानले.

**७.१३ - बचतगटाचे आयोजन : दि. ५.९.२००९ :-**

मांडवा, तालुका माहूर, जिल्हा नांदेड हे आदिवासी गाव आहे. या छोटया गावात बचतगटाचे काम समाधानकारक चालते. प्राचार्य श्री. बी. के. जावळे यांनी ग्रामस्थांपुढे बचत गटाचे महत्त्व सांगताना बांगलादेशातील बचतगटाच्या चळवळीची सविस्तर माहिती दिली. गावातील महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या. उपसरपंचांनी कार्यक्रमाबद्दल विभागीय केंद्राचे आभार मानले. याप्रसंगी विभागीय केंद्राचे सचिव व सदस्य प्रा. उत्तमराव सूर्यवंशी यांचेही मार्गदर्शन झाले.

**७.१४ - आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त उस्मानाबाद येथे व्याख्यान : दि. ८.९.२००९ :-**

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त प्राचार्य डॉ. एस. जे. देशमुख यांचे 'साक्षरता' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. ए. डी. जाधव हे होते.

**७.१५ - मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा : दि. १७.९.२००९ :-**

लातूर येथील अंधजन विकास मंडळाच्या सभागृहात 'मराठवाडा मुक्ती संग्राम दिन' विभागीय केंद्राच्या वतीने साजरा करण्यात आला. याप्रसंगी थोर स्वातंत्र्यसेनानी सर्वश्री गोविंदराव लांडगे, प्रभाकर कुलकर्णी इत्यादींचा सत्कार अंध अपंग मंडळाचे अध्यक्ष तथा विभागीय केंद्राचे सदस्य अॅड. मनोहरराव गोमारे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अॅड. मनोहरराव पाटील, सामाजिक कार्यकर्ते श्री. शिवदासराव लखादिवे इ. चे मार्गदर्शन लाभले.

**७.१६ - हैद्राबाद मुक्तीसंग्राम व आदिवासी या विषयावर सविस्तर व्याख्यान : दि. १८.९.२००९ :-**

गोडसा हे माहूर तालुक्यातील छोटे गांव. या गावात १९४८ साली रझाकारांनी धुमाकूळ घातला होता. हैद्रावाद मुक्तीसंग्रामाचे अभ्यासक प्रा. उत्तमराव सूर्यवंशी यांचे 'हैद्रावाद मुक्तीसंग्राम व आदिवासी' या विषयावर सविस्तर व्याख्यान झाले. केंद्राचे सचिव या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

**७.१७ - दसरा महोत्सव : दि. २८.९.२००९ :-**

लातूर येथे दसरा महोत्सवानिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने जनतेला हार्दिक शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम विभागीय केंद्राच्या कार्यालयात आयोजित करण्यात आला होता.

**७.१८ - ज्येष्ठ नागरिक दिन : दि. १.१०.२००९ :-**

लातूर येथे ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. हरिप्रसाद सोमाणी हे होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार व शिक्षण महर्षि डॉ. गोपाळरावजी पाटील हे होते. याप्रसंगी विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे यांच्या हस्ते सर्वश्री व्यंकटरावजी कुलकर्णी, हवीव महमदअली, यु. के. कांवळे, सौ. सुजाताताई विरादा यांचा सत्कार करण्यात आला.

**७.१९ - लोकशाही सबलीकरणासाठी मतदार जागृती या विषयावर व्याख्यान : उस्मानाबाद दि. ८.१०.२००९ :-**

लोकशाही सवलीकरणासाठी मतदार जागृती या विषयावर प्रा. ए. डी. जाधव यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्रा. ए. बी. ठोंबरे होते.

**७.२० - स्थानिक जनतेसाठी कार्यक्रम : दि. १५.१०.२००९ :-**

मालागुडा, ता. माहूर, जि. नांदेड येथे विभागीय केंद्र लातूरच्या वतीने स्थानिक जनतेसाठी कार्यक्रम घेण्यात आला. या गावाहून माहूरला जाण्यासाठी वसेस नाहीत. तसेच शासनाने स्वच्छता अभियान या आदिवासी खेडयात राववले पाहिजे, वसेसची सोय करुन दिली पाहिजे इ. ग्रामस्थांच्या गरजांसाठी विभागीय केंद्राच्या वतीने व येथील सरपंचाच्या सहकार्याने वरिष्ठांकडे पाठपुरावा करण्यासाठी या ग्रामस्थांचा, आदिवासींचा मेळावा घेऊन या मेळाव्यात विभागीय केंद्राच्या सचिवांनी व सदस्यांनी येथील ग्रामस्थांच्या सर्व प्रश्नाबद्दल चर्चा केली.

**७.२१ - फटाकेविरहित दीपावली साजरी : दि. १६.१०.२००९ :-**

लातूर येथील विभागीय केंद्र व लातूर जिल्हा शाखा अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या वतीने दीपावलीनिमित्त फटाकेविरहीत दीपावली साजरी करण्यात आली. यासाठी लातूर शहरातून प्रदूषणविरहीत दीपावलीसाठी रॅली काढण्यात येऊन लातूर येथे डॉ. वावासाहेब आंबेडकर पार्क (टाऊन हॉल) येथे लोकांशी सविस्तर संवाद साधण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष खा. डॉ. जनार्दन वाघमारे होते.

**७.२२ - माहूर, जि. नांदेड येथील आश्रमशाळेला विभागीय केंद्राची भेट : दि. २२.१०.२००९ :-**

केंद्राच्या वतीने माहूर येथील आश्रमशाळेला विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे व प्रा. उत्तमराव सूर्यवंशी यांनी भेटी देवून आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना चांगले जेवण मिळते का, वाचनालय व इतर सुविधा या ठिकाणी आहेत का याची वारकाईने चौकशी करुन संस्थाचालकांना विभागीय केंद्राच्या वतीने सूचना व मार्गदर्शन करण्यात आले.

**७.२३ - गुरुनानक जयंती साजरी : दि. २.१०.२००९ :-**

लातूर येथे गुरुनानक यांच्या जयंतीनिमित्त गुरुनानकांनी एकतेचा संदेश या देशाला कसा दिला याबद्दल सविस्तर मार्गदर्शन हिंदी साहित्यिक प्रा. डॉ. सूर्यनारायण रणसूभे यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सदस्य प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार हे होते.

**७.२४ - बालकदिन (जवाहरलाल नेहरु जयंती) : दि. १४.११.२००९ :-**

लातूर येथे विभागीय केंद्राच्या वतीने बालकदिन साजरा करण्यात आला. लातूरातील अंगणवाडी, बालवाडी येथील बालकांना खाऊ वाटप करण्यात आला.

**७.२५ - वैज्ञानिक दृष्टीकोन निर्मितीसाठी अंधश्रध्दा निर्मूलन कार्यक्रम : दि. १८.११.२००९ :-**

विभागीय केंद्राच्या वतीने उस्मानाबाद येथे वैज्ञानिक दृष्टीकोन निर्मितीसाठी अंधश्रध्दा निर्मूलन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या विषयावर श्री. मारुतीराव बनसोडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सदस्य प्राचार्य श्री. रमेशराव दापके हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्राचे सचिव उपस्थित होते.

**७.२६ - यशवंतराव चव्हाण यांचा २५ वा स्मृतीदिन साजरा : लातूर दि. २५.११.२००९ :-**

यशवंतरावानी तळागाळातील जनतेच्या सुखाचा सदैव विचार केला त्यामुळे त्यांना महाराष्ट्रीय जनतेच्या हृदयसिंहासनावर स्थान मिळाले. शिवाय दिल्ली दरबारी महाराष्ट्राचं खरंखुरं भूषण ठरलेले ते एकमेव लोकनेते होते असे मत महाराष्ट्रातील प्रसिध्द साहित्यिक, प्रखर विचारवंत प्रा. वा. ह. कल्याणकर यांनी व्यक्त केले. विभागीय केंद्र लातूरच्या वतीने यशवंतराव चव्हाण यांच्या २५ व्या स्मृतीदिनानिमित्त नगर परिषदेच्या शिवछत्रपती सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. भाऊसाहेब गोरे होते. विशेष अतिथी म्हणून माजी खा. डॉ. गोपाळरावजी पाटील, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांची उपस्थिती होती. समारोप श्री. भाऊसाहेब गोरे यांनी केला. प्रास्ताविक विभागीय केंद्राच्या सचिवानी केले. सूत्रसंचालन प्रा. जोतिराम काटे यांनी तर आभार ॲड. मनोहरराव गोमारे यांनी मानले.

**७.२७ - भारतीय संविधान स्वीकृती दिन साजरा : लातूर दि. २६.११.२००९ :-**

भारतीय संविधान स्वीकृती दिन व मुंबई येथील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले सर्वश्री हेमंत करकरे, अशोक कामटे, विजय साळसकर व इतर १६ पोलीस अधिकारी यांना विभागीय केंद्राच्या वतीने श्रध्दांजली वाहण्यात आली.

**७.२८ - महात्मा फुले यांची पुण्यतिथी साजरी : दि. २८.११.२००९ :-**

महात्मा फुले यांची पुण्यतिथी विभागीय केंद्राच्या वतीने साजरी करण्यात आली.

**७.२९ - माहितीचा अधिकार याबद्दल चर्चासत्र : दि. ४.१२.२००९ :-**

उस्मानाबाद येथे माहितीचा अधिकार याबद्दल चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. प्रमुख उपस्थिती श्री. प्रल्हादराव दापके यांची होती. इतर मान्यवरांचे मौलिक मार्गदर्शन लाभले.

**७.३० - अंधश्रध्दा निर्मूलन शिबीर : दि. ८.१२.२००९ :-**

मौजे शिवणी, ता. कळमनुरी, जि. हिंगोली येथे अंधश्रध्दा निर्मूलन शिबीराचे विभागीय केंद्राच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. केंद्राच्या वतीने प्राचार्य डॉ. गोपाळराव कदम यांनी भानामती, नवस, तंत्रमंत्र या कशा दिशाभूल करणा-या बाबी आहेत यावर प्रकाश टाकला. याप्रसंगी प्राचार्य ए. आर. शर्मा हे अध्यक्षस्थानी होते. मौजे शिवणी येथील ग्रामस्थांचे याप्रसंगी आभार मानले.

**७.३१ - हागणदारीमुक्त गांव : एक विचारमंथन : दि. १०.१२.२००९ : पोहनेर, ता, जि. उस्मानाबाद**

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. वसंतरावजी पाटील, जिल्हा हागणदारीमुक्त समिती सदस्य, अध्यक्ष मा. प्रतापराव देशमुख, सरपंच पोहनेर यांच्या उपस्थितीत वरील विषयावर विचारमंथन करण्यात आले.

**७.३२. जागतिकीकरण - भारतीय शिक्षण : दि. १२.१२.२००९ :-**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. तुकाराम वारवाले होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. जीवन पवार यांची उपस्थिती होती.

**७.३३ - जागतिक एड्स दिनानिमित्त निबंध स्पर्धा : दि. २१.१२.२००९ :-**

जागतिक एड्स दिनानिमित्त उस्मानाबाद येथे विभागीय केंद्राच्या वतीने निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. 'एड्स - एक महाभयंकर रोग' हा विषय होता. या स्पर्धेत १२ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. विजयी स्पर्धक : प्रथम क्रमांक श्री. शेळके समाधान (बी.ए. द्वितीय वर्ष), द्वितीय क्रमांक कु. जयदाळे किरणब ाई (बी.ए. तृतीय वर्ष). विजयी स्पर्धकांचा प्रमाणपत्र देऊन यथोचित गौरव करण्यात आला.

**७.३४ - विद्यार्थी समुपदेशन व व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर व्याख्यान : दि. ४.१.२०१० :-**

उस्मानाबाद येथे विद्यार्थी समुपदेशन व व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर प्रा. अर्जुन जाधव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. अध्यक्षस्थानी श्री. विश्वासराव शिंदे (अध्यक्ष, उस्मानाबाद जनता सहकारी बँक) होते. याप्रसंगी विभागीय केंद्राचे सदस्य उपस्थित होते.

**७.३५ - स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त युवक मेळावा : दि. १२.१.२०१० :-**

लातूर येथे स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त युवक मेळावा व राष्ट्रमाता जिजाऊ यांना त्यांच्या जयंतीनिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

**७.३६ - रक्तदान शिबीर व तीळगुळ कार्यक्रम : दि. १८.१.२०१० :-**

विभागीय केंद्र लातूरच्या वतीने उस्मानाबाद येथील जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या सहकार्याने सकाळच्या सत्रात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. दुपारच्या सत्रात सायं. ५ वा. उस्मानाबाद जिल्हा कारागृहातील कैद्यांना विभागीय केंद्राच्या वतीने तिळगुळ वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. भालेराव (जिल्हा कारागृह अधीक्षक) तर प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय केंद्राचे सदस्य श्री. रमेशराव दापके होते.

**७.३७ - श्यामची आई' या पुस्तकावर चर्चासत्र : दि. २४.१.२०१० :-**

शिवाजी महाविद्यालय, हिंगोली येथे 'श्यामची आई' या पुस्तकावर विभागीय केंद्राच्या वतीने चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सदस्य श्री. बुद्रुक पाटील हे होते. या चर्चासत्रात अनेक विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी झाल्या.

**७.३८ - भारतीय प्रजासत्ताक दिन : दि. २६.१.२०१० :-**

भारतीय प्रजासत्ताक हा खरच यशस्वी झाला आहे का ? या विषयावर लातूर येथे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रात प्रा. डॉ. शेषेराव मोहिते, प्रा. डॉ. श्रीराम गुंदेकर, प्रा. श्री. एस. आर. कुलकर्णी इ. मान्यवरांनी सहभाग नोंदविला.

**७.३९ - निलंगा दि. २.२.२०१० ते दि. ९.२.२०१० :-**

निलंगा येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे विश्वस्त माजी मुख्यमंत्री आ. शिवाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या ७९ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या प्रबोधनपर महाराष्ट्रातील प्रसिध्द अशा प्रवचनकार, किर्तनकार या प्रवर्चन किर्तन महोत्सवात विभागीय केंद्राचा मौलिक सहभाग होता.

**७.४० - येडशी ता. जि. उस्मानाबाद दि. १०.२.२०१० ते ११.२.२०१० :-**

येडशी येथे आर्य समाजाने आयोजित केलेल्या योग शिबीरात विभागीय केंद्राचा सहभाग होता.

**७.४१ - शिवजयंतीनिमित्त राजा शिवछत्रपती यांना अभिवादन : दि. १९.२.२०१० :-**

या जयंती उत्सवानिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. भाऊसाहेब गोरे, सदस्य ॲड. मनोहरराव गोमारे, प्राचार्य श्री. नागोराव कुंभार इत्यादींनी राजा शिवछत्रपतीच्या पुतळयाला अभिवादन केले.

**७.४२ - उस्मानाबाद येथे यशवंतराव चव्हाण यांचा लाभलेला सहवास या विषयावर चर्चासत्र दि. २२.२.२०१० :-**

रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबादच्या भव्य प्रांगणावर 'लोकनेते यशवंतराव चव्हाण यांचा लाभलेला सहवास' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. प्रमुख वक्ते म्हणून माढयाचे माजी आमदार मा. श्री. विनायकरावजी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व उस्मानाबादचे माजी नगराध्यक्ष मा. श्री. नानासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत आगळा वेगळा असा हा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार विनायक पाटील म्हणाले की, यशवंतरावासारख्या महान माणसाच्या सहवासात आम्ही मोठे झालो यावर आमचाही विश्वास बसत नाही. साहेबाच्या आठवणी सांगत असताना मा. पाटील साहेब यांचे दुःख अनावर झाले. त्यांना त्यांच्या डोळयातील अश्रु आवरता आले नाही. याप्रसंगी मा. यशवंतरावाच्या अंतःकरणातील माणुसकीची ज्योत किती महान होती याबद्दल अनेकांनी आठवणी सांगितल्या.

**७.४३ - संत गाडगेबाबा यांना विनम्र अभिवादन : दि. २३.२.२०१० :-**

स्वच्छतेचे महामेरु, महान संत गाडगेबाबा यांना विभागीय केंद्राच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

**७.४४ - राष्ट्रीय विज्ञान दिन : दि. २८.२.२०१० :-**

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त दयानंद महाविद्यालय, राजर्षी महाविद्यालय, बसवेश्वर महाविद्यालयातील विज्ञान विभागाच्या प्राध्यापकांनी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विभागीय केंद्राने आयोजित केलेल्या चर्चासत्रात आपला सहभाग नोंदविला.

**७.४५ - जागतिक महिला दिन : दि. ८.३.२०१० :-**

जागतिक महिला दिनानिमित्त स्त्रीसुधार मोहिमेत सहभागी असणा-या व बचतगटात काम करणा-या लातूर शहर व परिसरातील अनेक महिलांचा विभागीय केंद्राच्या वतीने सत्कार करण्यात आला.

**७.४६ - यशवंतराव चव्हाण यांचा ९७ वा जयंती कार्यक्रम : दि. १२.३.२०१० :-**

यशवंतराव चव्हाण यांचा ९७ वा जयंती कार्यक्रम विभागीय केंद्राच्या वतीने साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्रातील प्रसिध्द साहित्यिक प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर होते. अध्यक्षस्थानी लातूरातील जेष्ठ विधिज्ञ ॲड. मनोहरराव गोमारे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. काटे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी मानले.

याप्रसंगी विभागीय केंद्राच्या वतीने महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवी वर्ष २०१० व आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार भारताचे उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या ९७ व्या जयंती उत्सव प्रीत्यर्थ 'महाराष्ट्राच्या तरुणां समोरील भविष्यातील आव्हाने' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. या निबंध स्पर्धेत अनेक तरुण तरुणींनी तसेच जेष्ठ बंधू-भगिनींनी सहभाग घेऊन आपली श्रध्दा व निष्ठा व्यक्त केली. या निबंध स्पर्धेचे १५५१ रु. चे प्रथम पारितोषिक श्री. प्रकाश नारायणराव पतंगे रा. मसोड, ता. कळमनुरी, जि. हिंगोली यांनी जिंकले. रु. ११५१ चे द्वितीय पारितोषिकाच्या मानकरी कु. जयश्री राम भोसले रा. मुदगड, ता. निलंगा, जि. लातूर या आहेत. ७५१ रुपयांचे तृतीय पारितोषिक विभागून श्री. विजयकुमार भिकुसिंग पवार, रा. जिंतूर, जि. परभणी व श्री. नुतनकुमार भागवत बनसोड, रा. लातूर यांना देण्यात आले. या पारितोषिकाचे वितरण प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

## १०.८ विभागीय केंद्र अमरावती :-

**८.१ यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी दि. २५ नोव्हेंबर २००९ :-**

दि. २५ नोव्हेंबर २००९ रोजी श्री क्षेत्र रिध्दपूर काशी, तालुका मोर्शी, जि. अमरावती येथे श्री. गोविंद गुरुकुल आश्रमशाळा येथे श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मा. यशवंतराव चव्हाण यांच्या

जीवन कार्यावर प्रा. श्री. पुरुषोत्तमराव नागपूरे यांचे अतिशय अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. या कार्यक्रमाला परिसरातील असंख्य विद्यार्थी व गणमान्य नागरिकांची उपस्थिती होती.

**८.२ मा. यशवंतराव चव्हाण यांची जयंती दि. १२ मार्च २०१० व नवमहाराष्ट्र युवा अभियान :-**

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती निमित्त विभागीय केंद्राचे वतीने श्रीमती विमलाबाई देशमुख सभागृह, अमरावती येथे युवा मेळावा आयोजित करण्यात आला. त्याप्रसंगी डॉ. मनोज तायडे, मराठी विभाग प्रमुख, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती यांचे 'पंडित नेहरुंच्या दूरदृष्टीचे प्रतिबिंब यशवंतराव चव्हाण' या विषयावर व्याख्यान ठेवण्यात आले होते. सदर कार्यक्रमात बहुसंख्य युवक व युवतींची उपस्थिती होती. तसेच शहरातील गणमान्य अतिथी सौ. कांचनमाला गावंडे, अध्यक्षा, अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, आमदार श्री. हर्षवर्धन प्र. देशमुख, श्री. रमेशपंत वडस्कर, अध्यक्ष, जिल्हा परिषद, अमरावती श्री. विलासराव इंगोले, अध्यक्ष, अमरावती जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, श्री. तुषार भेटाळू संघटक नवमहाराष्ट्र युवा अभियान अमरावती, श्री. सुभाष पावडे इत्यादी उपस्थित होते.

**८.३ किसान गोष्टी :-**

विभागीय केंद्र अमरावती व महाराष्ट्र राज्य संत्रा उत्पादक संघ, वरुड यांचे संयुक्त विद्यमाने 'किसान गोष्टी' या कार्यक्रमांतर्गत 'केळी व कापूस परिसंवाद' अध्यापक विद्यालय, जरुड येथे आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास जैन इरिगेशनचे केळी विशेषज्ञ श्री. अग्रवालसाहेव तसेच शेडनेट वावत श्री. वडेसाहेव यांनी शेतक-यांना मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे संत्रा पिकाबाबत श्री. सुधीर जगताप, संत्रा विशेषज्ञ यांनी सखोल मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून विभागीय केंद्राचे कार्याध्यक्ष श्री. हर्षवर्धन देशमुख, संत्रा उत्पादक संघाचे श्री. रमेश जिचकार, सौ. निर्मलाताई देशमुख तसेच परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

**८.४ रक्तदान शिबीर :-**

विभागीय केंद्राचे वतीने कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारात रक्तदान शिवीर व रक्तगट तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात येऊन असंख्य रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच याच कार्यक्रमात मोर्शी व जरुड परिसरातील नवनिर्वाचित सरपंच, उपसरपंच यांचा सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. तुकारामजी बिडकर, अध्यक्ष, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपूर, मा. श्री. हर्षवर्धन देशमुख, कार्याध्यक्ष विभागीय केंद्र अमरावती, श्री. संतोष महात्मे, उपाध्यक्ष जि.प. अमरावती, श्री. रमेशपंत वडस्कर, माजी अध्यक्ष, जि.प. अमरावती, श्री. दिलीपराव काळबांडे, समाजकल्याण सभापती, जि.प. अमरावती, श्रीमती मालतीताई चौधरी, महिला व बालकल्याण सभापती जि. प. अमरावती, सौ. अचलाताई यावले, सभापती पंचायत समिती वरुड, श्री. विजयराव काळे, अचलपूर, भास्करराव ठाकरे, अमरावती, श्री. रमेशपंत देशमुख, श्री. सुरेशराव विधाते, चांदूरबाजार, श्री. श्रीपाद पाटील, श्री. प्रकाशराव अढाऊ, मोर्शी तसेच जिल्हयातील अनेक गणमान्य नागरिकांची वहुसंख्येने उपस्थिती होती.

**८.५ शेतकरी मेळावा :-**

विभागीय केंद्र अमरावती व संत्रा उत्पादक संघाचे वतीने सौ. निर्मलाताई देशमुख जरुड यांचे मळयात जिल्हयातील शेतक-यांसाठी शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये केळी, कापूस व संत्रा उत्पादकांना कृषि विभागाचे श्री. किसन मुळे, अधिक्षक कृषि अधिकारी, अमरावती, जैन इरिगेशनचे श्री. बाळकृष्ण जळे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचा परिसरातील बहुसंख्य शेतक-यांनी लाभ घेतला.

मुंबई
दिनांक : २० सप्टेंबर २०१०

**विश्वस्त मंडळ/कार्यकारिणी मंडळ**
**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई**



मा.यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्यानंतर सर्वश्री, मा.डॉ.रवि बापट,कोषाध्यक्ष, मा.प्रो.यश पाल, मा.श्री.शरद काळे,सरचिटणीस, मा.सौ.यश पाल.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कृत न्यायमूर्ती वाय.व्ही.चंद्रचूड पारितोषिक विजेते श्री.अफरोज शहा,मुंबई यांना पारितोषिक वितरीत करतांना मा.ना.आर.आर.पाटील, गृहमंत्री,महाराष्ट्र राज्य.





मा.यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमात व्यासपीठावर उपस्थित मा.ना.आर.आर.पाटील,गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य. मा.न्यायमूर्ती (निवृत्त) श्रीमती सुजाता मनोहर, मा.ना.छगन भुजबळ,उपमुख्यमंत्री. श्रीमती किशोरी आमोणकर, श्री.अफरोज शहा, मा.श्री.हुसेन दलवाई,उपाध्यक्ष व मा.श्री.शरद काळे,सरचिटणीस,

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई

## प्रतिष्ठानची प्रकाशने

| | | किंमत रुपये |
|---|---|---|
| ०१ | यशवंतराव चव्हाण : विधी मंडळातील निवडक मराठी भाषणे भाग-१<br>संकलन : डॉ.व्ही.जी.खोबरेकर | २००.०० |
| ०२ | वाय.बी.चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस-विधीमंडळ भाग-२ संकलन : डॉ.व्ही.जी.खोबरेकर | २५०.०० |
| ०३ | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट--वाय.बी.चव्हाण भाग १ ते ४ संकलन : राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ०४ | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन-ना.धों.महानोर | ३.५० |
| ०५ | सह्याद्रीचे वारे-यशवंतराव चव्हाण | ३०.०० |
| ०६ | म.ज्योतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन-प्रा.गजमल माळी | १२.०० |
| ०७ | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास-संपादक-वि.स.पागे | ३५.०० |
| ०८ | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन-संपादन- अण्णासाहेब शिंदे | १६०.०० |
| ०९ | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन-शरदराव पवार- भाषणसंग्रह-संपादन दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १० | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास संपादन-पी.बी.पाटील | १००.०० |
| ११ | नवभारत : परिवर्तनाची दिशा- संपादन-पी.बी.पाटील | १००.०० |
| १२ | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास-संशोधक/लेखक-लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३ | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिध्दतेकडे वाटचाल-डॉ.नीलम गो-हे | १५.०० |
| १४ | यशवंतराव चव्हाण-चरित्र लेखन-अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५ | शब्दांचे सामर्थ्य-संपादन-राम प्रधान | ३७५.०० |
| १६ | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी)<br>(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७ | बाऊंटीफूल बनियन-डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र खंड- १ ते ४ (इंग्रजी)-बॅ.पी.जी.पाटील | ८००.०० |
| १८ | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९ | अजिंठा-(काव्यसंग्रह) लेखक-ना.धों.महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | ई-बुक (मराठी/इंग्रजी) यशवंत साहित्य/फोटो भाग - १ | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | ई-बुक (मराठी/इंग्रजी) पुस्तके भाग - २ | १५०.०० |

## व्हिडीओ कॅसेटस्

२३. मी एस.एम : एस.एम.जोशी यांचा जीवनपट
२४. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
२५. प्रवासी पक्षी : सुप्रसिध्द साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
२६. पु.ल.वृत्तांत : पु.ल.देशपांडे यांचा जीवनपट
या चारही व्हिडीओ कॅसेटस्‌ची निर्मिती यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने केली असून दिग्दर्शनाची जबाबदारी सुप्रसिध्द दिग्दर्शक डॉ.जब्बार पटेल यांनी पार पाडली.
२७. कॉ.केशवराव जेधे : कॉ.केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शक-श्री.राम गवाले.
२८. येस्, आय एम कम्युनिस्ट : कॉ.श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट दिग्दर्शन-विनय नेवाळकर